CMYK



विनम्र अभिवादन

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा आज स्मृतीदिन


सोलापूर

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शुक्रवार, १८ जुलै २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक २४९ | पाने १२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com


## विचारपुष्प



निसभ्यतेच्या विकासातून संस्कृतीचा विकास होत असतो. जेव्हा दान, दया, शुचिता, विद्यादान हे गुण केवळ वैयक्तिक राहतात तेव्हा त्या व्यक्तीची दृष्टी परोपकार करून पुण्य कमावण्याकडे असते. दान देऊन स्वर्गप्राप्तीची इच्छा असते. पण जेव्हा त्यासाठी केलेली व्यवस्था व्यापक होते, त्यावेळी सामूहिक सहकारितेचा उदय होतो तेव्हा त्यात सहभागी झालेल्या व्यक्तींचा दृष्टिकोन व्यक्तिगत पुण्याहून उच्च असणाऱ्या व्यक्तिनिरपेक्ष समष्टीच्या पुण्याचा होतो आणि तेव्हा समष्टीचा उद्धार होतो.

**- रंगा हरी**
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. बौद्धिक प्रमुख

## महत्त्वाचे

### निवृत्तीपूर्वीच पूर्ण पीएफ काढता येणार?

**नवी दिल्ली :** पगारदार कर्मचारी लवकरच निवृत्तीपूर्वी त्यांच्या पीएफ निवृत्ती निधीतून संपूर्ण रक्कम किंवा त्याचा मोठा भाग काढू शकतील. केंद्र सरकार पीएफ काढण्याच्या नियमांमध्ये मोठा बदल करण्याची योजना आखत आहे. नवीन नियम लागू झाल्यानंतर, कर्मचारी दर १० वर्षांनी त्यांच्या पीएफचा मोठा भाग काढू शकतील. सध्याच्या नियमांनुसार, संपूर्ण ईपीएफ रक्कम निवृत्तीनंतर किंवा दोन महिने बेरोजगार राहिल्यानंतरच काढता येते. सरकार संपूर्ण रक्कम काढण्यासाठी नियम किंवा मर्यादा लागू करण्याचा विचार करत आहे. उदाहरणार्थ, दर १० वर्षांनी ६० टक्क्यांपर्यंत काढण्याची परवानगी दिली जाऊ शकते.

### राज ठाकरेंची आज मीरा-भाईंदरमध्ये सभा

**मुंबई :** मीरा-भाईंदरमध्ये मराठी आणि हिंदी भाषेच्या वादातून निर्माण झालेल्या तणावपूर्ण वातावरणाच्या पृष्ठभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे १८ जुलै रोजी या भागात सभा घेणार आहेत. यासंदर्भात मनसेकडून पोस्टरही शेअर करण्यात आले आहे. अलिकडे मिरा- भाईंदरमध्ये मराठीच्या मुद्यावरून एका अमराठी व्यापाऱ्याला मनसे कार्यकर्त्यांनी मारहाण केली होती. त्याच्या निषेधार्थ अमराठी व्यापाऱ्यांनी मोठ्या संख्येने मोर्चा काढला होता. ''मराठी शिकणार नाही'' असे म्हणत संबंधित मनसे कार्यकर्त्यांवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी अमराठी व्यापऱ्यांनी केली होती.

### राज्य शिक्षक पुरस्कारासाठी आता नवे निकष

**पुणे :** समर्पित वृत्तीने काम करणाऱ्या शिक्षकांचा गौरव करण्यासाठी शिक्षण विभागातर्फे दिल्या जाणाऱ्या क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कारासाठीचे निकष बदलण्यात आले आहेत. या पुरस्कारासाठी पूर्वी १७ निकष निश्चित करण्यात आले होते. पूर्वीच्या निकषांतील काही निकष कायम ठेवून आता काही नव्या निकषांचा समावेश करण्यात आला आहे. शालेय शिक्षण विभागाने या बाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला. २८ जून २०२२ च्या शासन निर्णयाद्वारे राज्य आदर्श शिक्षक पुरस्काराचे नाव बदलून क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार असे करण्यात आले. तसेच पुरस्कारांसाठीचे निकषही बदलण्यात आले होते. आता तीन वर्षांनी पुन्हा या निकषांत बदल करण्यात आले आहेत.

### पंढरपुरातील सफाई कामगारांना घरे

**मुंबई :** सुधारित पंढरपूर तीर्थक्षेत्र विकास आराखडा तयार करण्याची प्रक्रिया सुरू असून त्यामध्ये पंढरपूर शहरातील सफाई कामगारांसाठी सदनिका बांधकामांचा समावेश आहे. या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह काही लोकप्रतिनिधींकडून सूचना प्राप्त झाल्या आहेत. त्यानुसार पंढरपूर शहरातील २१३ सफाई कामगारांना प्रत्येकी ६०० चौरस फूट क्षेत्रफळाच्या सदनिका देण्यात येतील.

# वैभवसंपन्न राष्ट्राच्या उभारणीत उद्योगवर्धिनीचा सिंहाचा वाटा

## सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत : अशा उद्योगवर्धिनी सर्वत्र व्हाव्यात

- रुढींच्या जाळ्यातून महिलांनी मुक्तपणे काम केल्यास समाजाचा उध्दार
- समाजाचे दु:ख आणि शुध्द व सात्विक कार्य हीच संघाची प्रेरणा आहे





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ जुलै-**

समाजातील दुःख ही राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्याची प्रेरणा आहे. हीच धारणा घेऊन स्त्री सक्षमीकरणासाठी प्रचंड मोठे कार्य करणाऱ्या उद्योगवर्धिनी संस्थेचा वैभवसंपन्न राष्ट्राच्या उभारणीत सिंहाचा वाटा ठरणार आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी गुरुवारी सोलापुरात केले. अशा उद्योगवर्धिनी सर्वत्र निर्माण व्हाव्यात, अशीही अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

उद्योगवर्धिनी संस्थेचा परिवार उत्सव कार्यक्रम हुतात्मा स्मृती मंदिरात उत्साही वातावरणात झाला. महिला सक्षमीकरणासाठी अखंड कार्यरत असलेल्या उद्योगवर्धिनी संस्थेला २१ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. भागवत म्हणाले, राष्ट्राला मोठे करण्यासाठी सर्व समाजाने स्वार्थ, भेद विसरून एकत्र काम करण्याची आवश्यकता आहे. सेवा करणारा नेहमी दु:खी व्यक्तीला दु:खातून बाहेर काढून त्याला दुसऱ्याला मदत करण्यासाठी प्रवृत्त करतो. उद्योगवर्धिनीचे दु:ख निवारणाचे कामही असेच अहंकार विरहित, सहजकर्तव्य भावनेचे आणि आपलेपणाचे आहे. समाजाच्या प्रगतीत महिलांचा वाटा सर्वात मोठा असतो. महिला घटक उन्नत होणे ही राष्ट्राच्या उत्कर्षासाठी आवश्यक बाब आहे. तर संपूर्ण समाजाचा उद्धार करते उद्योगवर्धिनी हे त्याचे उत्तम उदाहरण आहे, असेही सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत म्हणाले.

### चंद्रिकाभाभींनी सरसंघचालकांसह उपस्थितांची मने जिंकली



उद्योगवर्धिनी संस्थेच्या संस्थापिका अध्यक्षा चंद्रिका चौहान म्हणाल्या, समाजातील वंचित शोषितांची सेवा ही करण्याची नव्हे तर अनुभवायची बाब आहे. प्रचंड क्षमता असूनही सोलापूरकरांचा कल पुणे, मुंबईकडे वाढत आहे. त्यामुळे सोलापुरातील मुलींना आणि महिलांना सोलापुरातच प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून रोजगार, व्यवसायाचे प्रशिक्षण देण्याचा मानस आहे. त्यासाठी जागेची आवश्यकता आहे. गेली २१ वर्षे उद्योगवर्धिनीच्या माध्यमातून महिलांना स्वावलंबी व सक्षम बनविण्यासाठीचे प्रामाणिक प्रयत्न केले. वृध्दांना त्यांची मुले सोडतात तेंव्हा मन दुःखी होते हे सांगताना चंद्रिकाभाभींना गहिवरून आले. उद्योगवर्धिनीच्या कार्याचा आढावा घेताना अनेक अनुभव कथन करून चंद्रिकाभाभींनी सरसंघचालकांसह सर्व उपस्थितांची मने जिंकली.

आमच्या समाजाचे दु:ख हिच आमची प्रेरणा आहे. परिवाराचा आणि समाजाचा उध्दार करण्याची शक्ती महिलांमध्ये आहे. रुढींच्या जाळ्यातून मुक्त होवून महिलांना काम करू देण्याची गरज असल्याचेही श्री. भागवत म्हणाले.

याप्रसंगी व्यासपीठावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, बालाजी अमाईन्सचे व्यवस्थापकीय संचालक डी. राम रेड्डी, सेवाभारतीचे सोलापूर शहर अध्यक्ष राजेश पवार, उद्योगवर्धिनी संस्थेच्या संस्थापिका अध्यक्षा चंद्रिका चौहान, सचिवा मेधा राजोपाध्ये उपस्थित होते. प्रारंभी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांच्या हस्ते भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन करून आणि रोपाला पाणी घालून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी उद्योगवर्धिनीच्या कार्यावर आधारित 'उद्योगवर्धिनी की सेवाव्रती' या नयनबेन जोशी यांनी लिहिलेल्या आणि जेष्ठ पत्रकार अरुण करमरकर यांनी संपादित केलेल्या पुस्तकाचे प्रकाशन सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांच्या हस्ते झाले.

तसेच अखंड यात्रा या माहितीपटाचेही उद्घाटन सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांच्या उपस्थितीत झाले.याप्रसंगी डॉ. भागवत यांना उद्योगवर्धिनीच्या महिलांनी बनविलेल्या दोहड, विलायची हार, वॉल हँगिंग, श्री शुभराय महाराजांवरील पुस्तक, पूजा भूमकर यांनी भरतकामाच्या माध्यमातून साकारलेली सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांची प्रतिमा देऊन सन्मानित करण्यात आले.

(उर्वरित वृत्त पान ३ वर)

# विधानसभेत गद्दार म्हटल्याने सेनेच्या दोन्ही गटात हमरीतुमरी

## ▸▸ सभागृहात गदारोळ; आदित्य ठाकरेच्या निलंबनाची मागणी

**तभा वृत्तसेवा | विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १७ जुलै:**

विधानपरिषदेत बुधवारी उद्धव ठाकरे व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात झालेल्या कलगीतुऱ्याचा पुढचा अंक आज विधानसभेत पहावयास मिळाला. युवासेनेचे प्रमुख आदित्य ठाकरे यांनी शिंदे यांना उद्देशून गद्दार असा उल्लेख केल्याने शिंदे गटाचे मंत्री व आमदार खवळले.

दोन्ही शिवसेनांमध्ये जोरदार खडाजंगी झाल्याने कामकाज दहा मिनिटासाठी तहकुब करावे लागले. या वादाच्या केंद्रस्थानी होते उपमुख्यमंत्री शिंदे आणि आदित्य ठाकरे. शिंदे यांनी २९३ च्या चर्चेला उत्तर दिले. यावरून आपल्याला बोलायचे असल्याचे ठाकरेंच्या शिवसेनेचे आमदार भास्कर जाधव यांनी म्हटले. मात्र विधानसभा अध्यक्षांनी तुम्हाला तसे करता येणार नाही,असे म्हटल्यानंतर विधानसभेत गदारोळ झाला. त्यावेळीच आदित्य ठाकरे सदनात आले आणि त्यांनी शिंदे आणि



त्यांच्या आमदारांकडे पाहात आता या गद्दारांचे ऐकायचे का? असा प्रश्न विचारला. त्यामुळे शिंदें गटाचे आमदार आक्रमक झाले.गोधळमुळे सदनाचे कामकाज १० मिनिटांसाठी तहकूब करावे लागले.

एकनाथ शिंदे यांनी २९३ च्या प्रस्तावावर बोलताना ठाकरेंच्या शिवसेनेला झोंबतील असे मुद्दे मांडत राज आणि उद्धव ठाकरे यांचे नाव न घेता म्हटले की, मतदानाआधी म्हणायचे मराठी मराठी, आणि मतदान झाले की कोण रे तू अशी भूमिका तुमची. कोविड काळात खिचडी घोटाळा आणि डेडबॉडी बॅग चोरणारे सत्ताधारांवर भ्रष्टाचाराचे आरोप करतायत? मिठी नदीगाळ उपसा घोटाळ्याप्रकरणी अभिनेता दिनो मोरिया याची चौकशी सुरू आहे. जर त्याने तोंड उघडले तर अनेकांचा मोरया होईल, असा टोलाही आदित्य ठाकरेंचे नाव न घेता लगावला.शिंदे यांनी उत्तर दिल्यानंतर भास्कर जाधव आणि ठाकरे गटाच्या आमदारांनी त्यावर बोलण्यासाठी उभे राहिले. मात्र तसे करता येणार नाही,असे विधानसभा अध्यक्षांनी नियमाचा हवाला देत सांगितले. यावरून गदारोळ सुरू असताना आदित्य ठाकरे सदनात आले आणि त्यांनी शिंदेंच्या आमदारांना पाहून आता गद्दारांचे ऐकायचे का? असा प्रश्न विचारला.त्यामुळे चिडलेल्या शंभूराज देसाई यांनी आदित्य ठाकरे आणि भास्कर जाधव यांच्या वर्तनावर आक्षेप नोंदवला. विधानसभा अध्यक्षांकडे पाहून हातवारे करणे, इशारे करणे हे चुकीचे असून भास्कर जाधव आणि आदित्य ठाकरे यांनी गैरवर्तन केले असून त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी देसाई यांनी केली .

### डॉ. नारळीकरांच्या नावे प्रत्येक जिल्ह्यात विज्ञान केंद्र : शेलार


मुंबई : शालेय विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची आवड व कुतूहल वाढवण्यासाठी २३ जिल्ह्यांमध्ये शास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांच्या नावे विज्ञान केंद्रे, एसआयसी केंद्रे व २८ तंत्रज्ञानावर आधारित प्रयोगशाळा उभारण्यात येणार असल्याची माहिती मंत्री आशिष शेलार यांनी गुरुवारी विधानसभेत दिली. त्यासाठी राज्य शासन अंदाजे १९२ कोटी रुपयांचा खर्च करणार असल्याचे यावेळी ते म्हणाले. राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगामार्फत २०१५ पासून राज्यात काही जिल्ह्यांमध्ये विज्ञान व नावीन्यता उपक्रम केंद्र अर्थात् एसआयएसी केंद्र स्थापन केले आहेत.

### रॉबर्ट वढेराविरुद्ध पुरवणी आरोपपत्र

**नवी दिल्ली, १७ जुलै-**

हरयाणातील शिकोहपूर येथील जमिनीच्या सौद्याशी संबंधित मनी लॉंड्रिंग प्रकरणात काँग्रेस महासचिव प्रियांका वढेरा यांचे पती रॉबर्ट वढेरा आणि अन्य काही जणांविरुध्द अंमलबजावणी संचलनालयाने आज पुरवणी आरोपपत्र दाखल केले. सप्टेंबर २०१८ मधील हे प्रकरण आहे. त्यावेळी या प्रकरणी रॉबर्ट वढेरा, हरयाणाचे तत्कालिन मुख्यमंत्री भूपेंद्रसिंह हुडा, रिअल इस्टेट कंपनी डीएलएफ तसेच एका प्रॉपर्टी एजंटविरुध्द भ्रष्टाचार, फसवणूक आणि घोटाळ्याविरुध्द आरोपपत्र दाखल करण्यात आले होते. रॉबर्ट वढेरा यांच्या स्कायलाईट हॉस्पिटॅलिटी प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीने ओंकारेश्वर प्रॉपर्टीजकडून ७.५ कोटीत ३.५ एकराचा भूखंड खरेदी केला होता.

या भूखंडाचे म्युटेशन असामान्य जलदगतीने करण्यात आले होते. हुडा सरकारने यातील २.७० एकर जागेवर व्यावसायिक पध्दतीने एक कॉलनी विकसित करण्याची परवानगी वढेरा यांच्या कंपनीला दिली, तसा परवानाही त्या कंपनीला देण्यात आला. भूखंडावर निवासी कॉलनीला परवानगी मिळाल्यानंतर या भूखंडाची किंमत वाढली. त्यानंतर वढेरा यांच्या कंपनीने भूखंड डीएलएफ कंपनीला ५८ कोटीत विकला.



मुंबई : शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि पक्षाच्या आमदारांनी गुरुवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. 'आपल्याला हिंदीची गरज आहे का?' या विषयावरील लेखांचा समावेश असलेले पुस्तक त्यांनी मुख्यमंत्र्यांकडे सादर केले.

# विधानभवनाच्या लॉबीमध्ये हाणामारी

- जितेंद्र आव्हाड- गोपीचंद पडळकर यांचे कार्यकर्ते भिडले
- राहुल नार्वेकरांनी मागितला अहवाल, घटनेचा सर्वत्र निषेध



**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जितेंद्र आव्हाड व सत्ताधारी भाजपाचे आमदार गोपीचंद पडळकर यांच्यातील वादाचे गुरुवारी विधानभवन परिसरात तीव्र पडसाद उमटले. या दोन्ही नेत्यांचे समर्थक सायंकाळी विधानभवनाच्या लॉबीत एकमेकांना भिडले.

(सविस्तर वृत्त पान ३ वर)

# मोहोळचे ग्रामदैवत नागनाथ मंदिरात चोरी

## ● सोन्याच्या १८ चकत्या गायब

**मोहोळ, दि.१७ जुलै-**

मोहोळचे ग्रामदैवत श्री नागनाथ मंदिरातील देवाच्या मूर्तीवरील रुद्राक्ष माळेतील ४० पैकी १८ सोन्याच्या चकत्या चोरीस गेल्याने त्या अज्ञात चोरट्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मोहोळ पोलीस ठाण्यातून मिळालेल्या माहितीनुसार २५ जून रोजी देवस्थान पंच कमिटीचे अध्यक्ष आणि सदस्याने वार्षिक पूजा करण्यासाठी सालकरी पुजारी म्हणून नागेश शिवदास स्वामी आणि प्रसाद अण्णा खरगे (दोघे रा.नागनाथ गल्ली मोहोळ) यांची नियुक्ती केली. या पुजाऱ्यांच्याकडेच देवाचे दैनंदिन पूजा मंदिरातले नित्य व्यवहार कार्य यांची जबाबदारी असते. देवाच्या अंगावर चांदीचा किरीट, सोन्या-चांदीचे दागिने, ४० सोन्याच्या चकत्या असलेली १ रुद्राक्षाची माळ, दोन ओम पेंडल आणि इतर सोन्याचांदीचे दागिने असतात. श्रावण महिना सुरू होत असल्यामुळे नित्याप्रमाणे दागिन्यांची डागडुजी करण्यासाठी देवस्थान कमिटीचे अध्यक्ष प्रकाश देशमुख आणि पदसिद्ध सदस्य ओंकार देशमुख, राजेंद्र कुर्डे आणि सोमेश वाले यांनी दि.१५ जुलै रोजी पुजारी प्रसाद खरगे यांच्याकडून चावी घेऊन दागिन्यांची पाहणी केली. त्यामध्ये त्यांना ४० सोन्याच्या चकत्या असलेल्या रुद्राक्ष माळेतील १८ चकत्या गायब असल्याचे दिसून आले. याबाबत विचारणा केली असता संबंधिताने आपल्याला माहीत नसल्याचे सांगितले. यामुळे अज्ञात चोरट्याने ४० पैकी १८ चकत्या अंदाजे वजन नऊ ग्रॅम किंमत ९० हजार रुपये चोरून नेल्याची फिर्याद मोहोळ पोलीस ठाण्यात दाखल झाली आहे. दोघा पुजाऱ्यांना ताब्यात घेऊन चौकशी सुरू असल्याचे समजते. या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक केसरकर करत आहेत.

# धर्मांतर करणाऱ्यांना आरक्षणाचा लाभ नाही

## ● प्रमाणपत्रे तपासली जाणार ● मुख्यमंत्री फडणवीसांची विधानसभेत माहिती




◆ **मुंबई, १७ जुलै**

ख्रिश्चन धर्मात धर्मांतरण करणाऱ्या अनुसूचित जाती जमातीच्या लोकांना आरक्षणाचा लाभ मिळणार नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी विधानसभेत स्पष्ट केले.

राज्यात क्रिप्टो ख्रिश्चनांकडून धर्मस्वातंत्र्याचा दुरुपयोग केला जात आहे. त्यांच्याकडून हिंदू धर्मातील अनुसूचित जाती आणि जमाती प्रवर्गातील लोकांना गुप्तपणे ख्रिश्चन धर्म स्वीकारण्यास भाग पाडले जात आहे. अशा लोकांकडून या धर्माच्या प्रथा, परंपरा आणि प्रार्थना पद्धती छुप्या पद्धतीने पाळल्या जात आहेत. अन्त्यविधीही ख्रिश्चन पद्धतीने होत असून, त्यावेळी त्यांचा खरा धर्म दिसून येत आहे. या लोकांनी अनुसूचित जातीच्या आरक्षणाचा लाभ घेत नोकरी पटकावली असून, निवडणूकही लढवली आहे. राज्यातील नंदुरबार, सांगली आणि अहल्यानगर जिल्ह्यात अशी प्रकरणे समोर आल्याचा मुद्दा भाजपाचे आ. अमित गोरखे यांनी लक्षवेधीद्वारे उपस्थित केला होता. त्याला देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर दिले.

२६ नोव्हेंबर २०२४ रोजी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार अनुसूचित जातीचे आरक्षण हे केवळ हिंदू, बौद्ध आणि शीख धर्मीयच घेऊ शकतात. इतर धर्मीय ते आरक्षण घेऊ शकत नाहीत, असे फडणवीस यांनी सांगितले. यापैकी इतर धर्मातील लोकांना आरक्षण घेण्याचा अधिकार राहणार नाही. न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार इतर धर्मीयांनी अनुसूचित जातीचे आरक्षण घेतल्यास, त्यांचे जात प्रमाणपत्र आणि जात पडताळणी प्रमाणपत्र रद्द करण्यात येईल.

*(वृत्तसंस्था)*

### धर्मांतरानंतर नोकरी मिळविल्यास नियमानुसार कारवाई

**»» आरक्षणाच्या माध्यमातून कुणी सरकारी फायदा किंवा नोकरी मिळवली असल्यास त्यांचे प्रमाणपत्र रद्द झाल्यानंतर नियमानुसार कारवाई केली जाईल. खोटे प्रमाणपत्र सादर करून किंवा धर्मांतर करून आरक्षित गटात निवडणूक लढवली असेल, तर अशी निवडणूक रद्द करण्याची कायद्यातच तरतूद आहे. त्यामुळे निवडणूकही रद्द केली जाईल. अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी आणखी काही करता येईल का, याचाही विचार केला जाईल, असे उत्तर फडणवीस यांनी दिले.**

### उच्चशिक्षित घरातील मुलीची फसवणूक

»» भाजपाच्या आमदार चित्रा वाघ यांनीही यावर प्रश्न विचारला. सांगलीतील कुपवाड तालुक्यात एका उच्चशिक्षित घरातील मुलीची क्रिप्टो ख्रिश्चन गटातील मुलाकडून फसवणूक करण्यात आली. खोटे सांगून लग्न केल्यानंतर मुलाचे कुटुंब ख्रिश्चन असल्याचे समजले. लग्नानंतर मुलीचा छळ करण्यात आला. या छळामुळे सात महिन्यांच्या गर्भवती मुलीला जीव गमवावा लागला, अशी माहिती देताना धर्मांतराचा कायदा कधीपर्यंत अमलात येणार, असा प्रश्न चित्रा वाघ यांनी उपस्थित केला.

### अभ्यास करून तरतुदी करणार

»» देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्याच्या पोलिस महासंचालकांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली आहे. फसवणूक किंवा बळजबरीने धर्मांतराविरोधात कडक कायदा करण्यासंदर्भात शिफारशी करण्यास सांगितल्या होत्या. या समितीने राज्य सरकारला अहवाल पाठवला आहे. राज्य सरकार या अहवालाचा अभ्यास करून तरतुदी तयार करेल.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत

## महत्त्वाचे...

### लहान मुलांच्या भांडणातून तरुणीला मारहाण

**सोलापूर, दि.१७ जुलै-**

घराजवळ लहान मुलांची खेळण्यावरून तक्रार झाली. यातून तरुणीला चार जणांनी लाकडाने आणि सळईने मारहाण केली. हा



प्रकार बुधवारी सकाळी दहाच्या सुमारास मंगळवेढा तालुक्यातील बठाण येथे घडला. निशा पांडुरंग हेगडे (वय २३, रा. बठाण ता मंगळवेढा) असे मारहाण झालेल्या तरुणीचे नाव आहे. सकाळी दहाच्या सुमारास राहत्या घराजवळ लहान मुलांची खेळण्याची कारणातून तकार झाली. या तक्रारीच्या कारणातून खंडू नामदेव हेगडे व इतर तीन यांनी लाकडाने तसेच सळईने निशा हिला मारहाण केली. यात सर्वांगास मुकामार लागल्याने रात्री ८.३० वाजता निशा स्वत : शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### फवारणीचे औषध तयार केलेल्या तांब्यातून पाणी प्राशन; तरुणी अत्यवस्थ

**सोलापूर, दि.१७ जुलै-**

शेतातील पिकावर फवारणी करण्यासाठी ज्या तांब्यात औषध तयार केले होते, त्याच तांब्याने पाणी पिल्याने तरुणी अत्यवस्थ झाली. हा प्रकार मोहोळ तालुकयातील देगाव वाळूज येथे बुधवारी सांयकाळी सहाच्या सुमारास घडला. समिना सादिक शेख (वय ३२, रा. देगाव वाळूज ता मोहोळ) असे तरुणीचे नाव आहे. बुधवारी सायंकाळी समिना ही तिच्या शेतातील पिकावर फवारणी करत होती. त्यासाठी तिने पाणी पिण्याच्या तांब्यात औषध तयार केले होते. त्याच तांब्यातून तिने पाणी पिल्याने तिला त्रास होऊ लागल्याने उपचारास रात्री ९ च्या सुमारास भाऊ एजाज शेख यांनी दाखल केले. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### फिनाईल पिल्याने तरुण रुग्णालयात दाखल

**सोलापूर, दि.१७ जुलै-**

घरी पैशाच्या कारणातून झालेल्या वादातून तरुणाने फरशी पुसण्याचे फिनेल पिल्याने तरुणाला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. हा प्रकार बुधवारी सायंकाळी सातच्या सुमारास मोहोळ येथे घडला. अरबाज अजु शेख (वय २६, रा. मोहोळ) असे तरुणाचे नाव आहे. बुधवारी सायंकाळी सातच्या सुमारास अरबाजच्या राहत्या घ्ररात पैशाच्या कारणातून वाद झाला. या वादातून अरबाज याने घरातील फरशी पुसण्याचे फिनेल प्राशन केले. यात त्याला त्रास होऊ लागल्याने मोहोळ येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून रात्री ८.२५ वाजता सलमान कुरेशी याने शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### दुचाकी घसरल्याने एकजण जखमी

**सोलापूर, दि.१७ जुलै-**

टाकळी-सिकंदर ते मोहोळ जाताना पाटकूल पासून एक किलोमीटर अंतरावर दुचाकी घसरल्याने एकजण जखमी झाला. हा अपघात बुधवारी दुपारी १२ च्या सुमारास घडला. शिवाजी संभाजी गायकवाड (वय ५०, रा. टाकळी सिकंदर ता. मोहोळ) असे जखमीचे नाव आहे. शिवाजी हे बुधवारी दुपारी बाराच्या सुमारास दुचाकी चालवित टाकळी सिकंदर ते मोहोळ असे जात होते. पाटकूलपासून एक किलोमीटर अंतरावर ते जात असलेली दुचाकी अचानक घसरली. यात खाली पडल्याने शिवाजी यांच्या चेह-याला जखम झाली. दुपारी ३.३० वाजता मावशी लाडुबाई यांनी शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे. शिवाजी हे बुधवारी दुपारी बाराच्या सुमारास दुचाकी चालवित टाकळी सिकंदर ते मोहोळ असे जात होते.

# गावस्तरीय पाणी व स्वच्छता समिती बळकट करा

- पाणी व स्वच्छता सल्लागार शिष्यपाल सेठी यांचे मत
- केंद्रीय पथकाकडून अकोलेकाटी व कारंबामधील कामांची पाहणी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ जुलै-**

जिल्ह्यात जलजीवन मिशनची चांगल्या पद्धतीने अंमलबजावणीसाठी गावस्तरीय पाणी व स्वच्छता समिती बळकट करणे गरजेचे असल्याचे मत केंद्र शासनाचे पाणी व स्वच्छता सल्लागार शिष्यपाल शेठी यांनी व्यक्त केले.

जिल्ह्यात पाहणी दौऱ्यावर आलेले शिष्यपाल शेठी यांनी गुरूवारी जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन ग्रामीण -२ अंतर्गत अकोलेकाटी व कारंबा ग्रामपंचायतीस भेट दिली. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी पाणी व स्वच्छता अमोल जाधव, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी, उत्तर सोलापूरचे गट विकास अधिकारी राजाराम भोंग, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव, उपअभियंता योगीराज बेंबळगी, नाबार्डचे महेश शिरपूर, पी.एच.कुलकर्णी, संवाद सल्लागार सचिन सोनवणे, क्षमता बांधणी सल्लागार शंकर बंडगर, शाखा अभियंता जयवंत जाधव उपस्थित होते.

यावेळी अकोलेकाटी व कारंबा या ग्रामपंचायत मध्ये ग्रामस्थांशी संवाद साधला.अकोलेकाटी येथे यावेळी सरपंच अंजली क्षिरसागर, उपसरपंच सतिश लामकाने, सदस्य सर्जेराव पाटील, नंदा अष्टले, सुरेखा गोरे, दिपक डांगे, राजेंद्र घाटे, उर्मिला शिंदे, प्रज्ञा पवार, ज्ञानेश्वर गवळी, कांचन लामकाने, अंबिका मस्के, ग्रामपंचायत अधिकारी भालचंद्र काळे, मिरा पिटले तसेच ग्रामपंचायत कारंबा येथे सरपंच तुकाराम चव्हाण, उपसरपंच ज्योती भोरे,सदस्य ज्ञानेश्वर जगताप, शिवबाई काळे, स्नेहल मस्के, तकदीर शेख, ज्योती भोरे, विनायक सुतार, कमल पाटील, जयश्री शिराळ, दत्ता पवार, जयश्री कांबळे, दिव्या कोकरे, महिबूब शेख, विस्तार अधिकारी सोमनाथ शिंदे, ग्राम पंचायत अधिकारी मनिषा देशमुख,रेश्मा नागटिळक, नंदकुमार पाटील, गंगाधर कांबळे उपस्थित होते. यावेळी पाण्याची विहीर व पाईपलाईन तसेच पाण्याच्या टाकीची पाहणी केली.स्वच्छ भारत मिशन ग्रामीण -२ अंतर्गत सार्वजनिक शौचालय व वैयक्तिक शौचालयांची पाहणी केली. तसेच ग्रामपंचायतीस पाणी पुरवठा करणाऱ्या योजनेची पाहणी शिष्यपाल शेठी यांनी केली. सी.आर.सी.मोनिका दिनकर, आम्रपाली गजघाटे यांनी पाणी व स्वच्छता समितीची माहिती दिली.

**▸▸जेसीबीने चारी खोदून केली पाईपची पाहणी**

केंद्रीय पथकाचे शिष्यपाल सेठी यांनी लोकांच्या सुचने नुसार पाईपलाईनची चारी जेसीबीच्या सहाय्याने खोदून पाईपच्या गुणवत्तेची पाहणी केली.अपुर्ण कामे पुर्ण करणेसाठी संबंधित ठेकेदारांकडून लेखी घेऊन काल मर्यादेत काम पुर्ण करण्याच्या सूचना दिल्या. पाईपचा दर्जा व टाकीच्या कामाची गुणवत्ता चांगली ठेवण्याची सूचना केंद्रीय समितीचे सेठी यांनी दिल्या.

**▸▸निधीअभावी जल जीवन मिशनची कामे रेंगाळली**

ठेकेदारांना निधी वेळेत मिळत नसल्याने जलजीवन मिशनची कामे खोळंबली असल्याचे ग्रामपंचायत सदस्य चंद्रकांत मस्के यांनी केंद्रीय पथकाच्या निदर्शनास आणून दिले.

**▸▸त्रुटी असलेल्या ठेकेदारांवर दंडात्मक कारवाईच्या सूचना**

पाणी पुरवठा विहिरींच्या ठिकाणी जाण्यासाठी रस्ता नसल्याने पायी चालत विहिरींच्या कामांची गुणवत्ता पाहिली. विहीरीचे व पाण्याचे टाकीचे मोजमापे घेऊन लोकांच्या शंकाचे समाधान केले. तर अनेक ठिकाणी पाईप खोदाई करून कामे वेळेत पूर्ण करण्याच्या सुचना दिल्या. त्रुटी असलेल्या ठेकेदारां वर दंडात्मक कारवाईच्या सूचना दिल्या. काळ्या यादीत टाकायला देखील मागे पुढे पाहू नका अशा सूचना दिल्या.

## सांगोला अर्बन बँकेची आर्थिक क्षेत्रात मोठी झेप : डॉ. माळी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १७ जुलै-**

सांगोला अर्बन को-ऑप. बँकेने आर्थिक क्षेत्रात मोठी झेप घेत रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या सुपरवायझरी अॅक्शन फ्रेमवर्क मधून यशस्वीपणे बाहेर पडली आहे. ३० जून २०२५ रोजी रिझर्व्ह बँकेकडून अधिकृत पत्र प्राप्त झाले असून, बँकेने सर्व आवश्यक अटींची पूर्तता केल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे अशी माहिती बँकेचे संस्थापक चेअरमन डॉ. प्रभाकर माळी यांनी आयोजित पत्रकार परिषदेमध्ये दिली.



यावेळी बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे चेअरमन सीए के.एस.माळी, व्हा. चेअरमन राजन चोथे, संचालक मारुती बनकर, विष्णू लांडगे, रामचंद्र जाधव, सुरेश माळी, शिवाजीराव गायकवाड, गोविंद माळी, संतोष बालटे, संजय खडतरे, डॉ.संगीता पिसे अॅड. चैत्रजा बनकर उपस्थित होते. गेल्या दोन वर्षांत थकीत कर्जे आणि एनपीए च्या वाढीमुळे बँकेला अडचणींचा सामना करावा लागला होता. मात्र, बँकेने कडक आर्थिक धोरणं राबवत कायदेशीर कारवायांच्या माध्यमातून थकबाकीदारांकडून वसुली केली. या प्रयत्नांना यश मिळाल्याने बँकेची आर्थिक स्थिती भक्कम झाली आहे. ३१ मार्च अखेर बँकेची भांडवली पुरेशीता १४.४० टक्के इतकी असून, नेट एनपीए ४.९९ टक्के पर्यंत खाली आली आहे. बँकेने ८.१४ कोटी रुपयांचा ढोबळ नफा आणि ४.२४ कोटी रुपयांचा निव्वळ नफा नोंदवला आहे. त्यामुळे बँकेस 'ऑडिट वर्ग अ' हा दर्जा प्राप्त झाला असून, यंदा सभासदांना लाभांश देण्याचे अभिवचनही पूर्ण करण्यात आले आहे. बँकेने डिजीटल बँकिंगच्या दिशेनेही पावले उचलली असून, लवकरच मोबाइल बँकिंग, नेट बँकिंग, यूपीआय, आयएमपीएस यासारख्या आधुनिक सेवा सुरू करण्यात येणार आहेत. यामुळे सांगोला अर्बन बँक सोलापूर जिल्ह्यातील इतर नागरी बँकांच्या तुलनेत आघाडीवर राहील, असा विश्वास डॉ. प्रभाकर माळी आणि सीए के. एस. माळी यांनी यावेळी व्यक्त केला.



### १६ वर्षाच्या मुलीचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि.१७ जुलै-**

आई वडीलांनी मोबाईल विकत घेऊन न दिल्याने १६ वर्षाच्या मुलीने आत्महत्येचा प्रयत्न केला. हा प्रकार दक्षिण सोलापूर तालुकयातील माळकवठे येथे गुरुवारी सकाळी ९ च्या सुमारास घडली.

पद्मश्री महासिध्द कोरे (वय १६, रा. माळकवठे ता. द. सोलापूर) असे मुलीचे नाव आहे. पदुमश्री हिने तिच्या आई वडीलांकडे मोबाईलची मागणी केली होती. परंतु आई वडीलांनी तसे केले नसल्याने पद्मश्रीने रागाच्या भरात शेतातील पिकावर मारण्याचे औषध प्राशन केले. यात तिला त्रास होऊ लागल्याने सकाळी ११.२० वाजता सोमनिंग कोरे यांनी उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे. हा प्रकार दक्षिण सोलापूर तालुकयातील माळकवठे येथे गुरुवारी सकाळी ९ च्या सुमारास घडली.

# दीड महिन्यांच्या विश्रांतीनंतर पुनर्वसू पाऊस बरसला

### मंद्रुप परिसरात पावसाची दमदार हजेरी, शेतकऱ्यांमध्ये समाधान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ जुलै**

मे महिन्यात अवकाळी पावसाने दमदार हजेरी लावल्यानंतर बळीराजांने पावसाच्या भरवशावर खरीप हंगामातील पिकांची पेरणी केली. मात्र भरवशाची रोहीणी, मृग व आद्रा नक्षत्रे वाया गेल्यानंतर बळीराजा हवालदिल बनला होता. दीड महिन्यांच्या विश्रांतीनंतर अखेर पुनर्वसू नक्षत्राच्या पावसाने गुरूवारी दमदार हजेरी लावल्याने बळिराजांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

मंद्रुप, भंडारकवठे, कंदलगाव, निंबर्गी, बसवनगर, हत्तूर, वडकबाळ, वांगी, मनगोळी, माळकवठे , औराद यासह इतर अनेक गावात पावासने हजेरी लावल्याचे दिसून आले. यावर्षी अवकाळी पावसाने अनेकांचे अंदाज चुकवत १५ मे पासून ३० मेपर्यंत हजेरी लावली. अनेक शेतकऱ्यांनी पेरणीपूर्व मशागत केली नसल्याने



शेतकऱ्यांमधून चिंता व्यक्त करण्यात येत होती. मात्र जून महिन्यापासून पावसाने विश्रांती घेतली. त्यामुळे खरीप हंगामातील तूर, मूग, मटकी, बाजरी, मका, सोयाबीन, उडीद यासह इतर पिकांची पेरणी केली. पेरणी केल्यानंतर मात्र पावसाने पाठ फिरविली. त्यामुळे शेतकऱ्यांची भरवशाची रोहीणी, मृग व आद्रा नक्षत्रे वाया गेल्याने शेतकऱ्यांच्या नजरा आभाळाकडे लागले होते. पेरणी केलेली पिके पावसाअभावी करपून जात असल्याने दुबार पेरणीची शक्यता वर्तविण्यात येत असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडण्याची भीती व्यक्त करण्यात येत होती. अखेर वरूणराजा प्रसन्न होऊन पुनर्वसू नक्षत्राने शेवटच्या टप्यात दमदार हजेरी लावत बरसला. त्यामुळे पिकांना जीवदान मिळणार आहे. शिवाय जनावरांच्या चारा पाण्याचा प्रश्न सुटणार आहे. त्यामुळे पुनर्वसू नक्षत्राने शेतकऱ्यांमध्ये ऊत्साह निर्माण केला आहे.

**पुनर्वसू नक्षत्राच्या पावसाने पिकांना जीवदान**

दीड महिन्यांच्या विश्रांतीनंतर गुरूवारी रात्री पुनर्वसू नक्षत्राचा जोरदार पाऊस बरसला. त्यामुळे खरीप हंगामातील तूर, मूग, उडीद, मका व बाजरी यासह इतर पिकांना जीवदान मिळणार आहे. शिवाय दुबार पेरणीचे संकटही टळणार आहे. पुनर्वसू नक्षत्राच्या पावसाने पिकांच्या उत्पन्नाची हमी निर्माण झाली आहे.

- **राधाकृष्ण गोसावी,** शेतकरी मंद्रुप

**भूईमूग पेरणीस होणार सुरूवात**

पुनर्वसू नक्षत्राच्या पावसाने खरीप हंगामातील पिकांना जीवदान मिळणार आहे. पुष्य नक्षत्रामध्ये भूईमूग पेरणी करण्यासाठी पोषक वातावरण निर्माण होणार आहे. त्यामुळे भूईमूगाची पेरणी करण्यास मदत होणार.

- **मलकारसिध्द शेंडगे,** शेतकरी बसवनगर

# खत दुकानदारांकडून लिंकिंगच्या नावाखाली शेतकऱ्यांची पिळवणूक

### संभाजी ब्रिगेडचे करमाळा कृषी विभागाला निवेदन



**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि. १७ जुलै-**

करमाळा तालुक्यातील खत दुकानदारांकडून लिंकिंग च्या नावाखाली शेतकऱ्यांची पिळवणूक होत आहे. प्रत्येक दुकानदारांनी नो लिंकिंग बोर्ड निके नावालाच लावले आहेत आहे. तसेच दररोजचे विक्री दर आणि साठा व किमतीचे संदर्भातील माहिती फलक लावणे बंधन कारक आहे. व तसेच युरिया खताची साठवणूक करून मालाची कमतरता करून चढ्या दराने विक्री केली आहे.

शेतकऱ्याची पिळवणूक केली जात आहे. प्रत्येक दुकानदाराकडून खत विक्री वेळेस अधिकाऱ्याच्या उपस्थितीत खत वाटप करावे. अन्यथा कृषी आयुक्तांना घेराव घालणार याची दखल न घेतल्यास संभाजी ब्रिगेड च्या वतीने तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल. यावेळी उपस्थित संतोष वारे ,सचिन काळे नितीन खटके जमीर सय्यद, विकास गुंड, सुहास पोळ, काकासाहेब गुंड, अतुल निर्मळ, आदिनाथ माने, सोमनाथ जाधव, अर्जुन नाईकनवरे, अमोल पोळ, सागर बनकर, हनुमंत पांढरे, उमेश मोहिते, मयूर सरक उपस्थित होते.

# घरफोडी प्रकरणाचा बार्शी पोलिसांकडून छडा

### दोन आरोपी अटकेत, चार लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १७ जुलै-**

शहरात नुकत्याच घडलेल्या घरफोडी प्रकरणाचा छडा लावत बार्शी शहर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेने दोन आरोपींच्या मुसक्या आवळल्या असून, चोरीस गेलेल्या १६.५ तोळे सोन्याचे दागिने व ९७,५०० रुपयांची रोकड असा एकूण ३,४५,००० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे.



ही घटना कसबा पेठ, बार्शी येथे घडली होती. फिर्यादी दुर्गा नारायण पौळ यांच्या राहत्या घरातील कपाटातून अज्ञात चोरट्याने ३,९७,५०० रुपयांची चोरी केल्याची फिर्याद १७ जून २०२५ रोजी दाखल झाली होती. पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक उमाकांत कुंजीर यांच्या पथकाने तपासाची चक्रे फिरवली आणि आरोपींचा शोध सुरु केला. तपासादरम्यान ही घरफोडी फिर्यादी यांच्या घरात भाड्याने राहणाऱ्या सुरज बाळासाहेब हारकर आणि त्याच्या साथीदार माधव सोनाजी कुलकर्णी यांनी केल्याचे उघडकीस आले. पोलिसांनी दोघांना अटक करुन त्यांच्या ताब्यातून १६.५ तोळे सोन्याचे दागिने व ९७,५०० रुपयांची रोकड हस्तगत केली आहे.

ही कामगिरी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुल, आणि पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या कारवाईत उमाकांत कुंजीर, अजित वरपे, अमोल माने, बाळकृष्ण दबडे, बाबासाहेब घाडगे, संगाप्पा मुळे, अंकुश जाधव, धनराज फत्तेपुरे, सचिन देशमुख, राहुल उदार, सचिन नितनात, अवि पवार, प्रल्हाद अकुलवार, इसामियाँ बहिरे, रामेश्वर मस्के, वेतन झाडे, आणि सायबर पोलीस ठाण्याचे रतन जाधव आदींचा मोलाचा सहभाग होता.गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक उमाकांत कुंजीर हे करत आहेत. बार्शी शहर पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेची ही कार्यक्षमता निश्चितच कौतुकास्पद आहे.

# आता थांबायचं नाय..!

### ● लाड कमिटी वारसांच्या हक्कासाठी धोरणात्मक निर्णयाची गरज!




महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या १३ ऑक्टोबर २०२४च्या शासन निर्णयानुसार दि. १२ ऑगस्ट १९७५ ते २३ फेब्रुवारी २०२३ या कालावधीतील लाड कमिटी अंतर्गत सर्व प्रलंबित प्रकरणांना या तरतुदी लागू राहणार आहेत.

या निर्णयानुसार संबंधित कालावधीतील सोलापूर महापालिकेतील सफाई कामगारांच्या वारसांकडून अर्ज मागविण्यात आले होते. महापालिका प्रशासनाने ३० जून २०२५ अखेरची एकूण ५१२ अर्जदारांची प्रारूप यादी तयार केली आहे. महाराष्ट्र शासनाने सफाई कामगारांच्या वारसांना न्याय देण्याच्या दृष्टीने दृष्टिकोनातून घेतलेल्या धाडसी निर्णयाचे स्वागत होत आहे. या सर्व वारसांना नोकरीचा हक्क मिळण्यासाठी शासन आणि महापालिकास्तरावर धोरणात्मक ठोस निर्णय आणि अंमलबजावणी होण्याची गरज आहे. तरच हा निर्णय वास्तवात येऊ शकेल. महापालिकेतील ठराव क्र. ६५ दि. १६ ऑगस्ट १९९६च्या ठरावानुसार सफाई कामागारांना व त्यांचे वारसांना लाड कमिटी शिफारसी लागू करण्यात आल्या. १४ ऑक्टोबर २०११ रोजीच्या सर्व साधारण सभेच्या निर्देशाप्रमाणे झाडुवाले, बिगारी, कचरा बिगारी व ड्रेनेज बिगारी या सेवकांना व त्यांचे वारसांना राज्य शासनाच्या निर्णयानुसार नोकरी व त्या अनुषंगाने सर्व लाभ लाड कमिटीप्रमाणे लागू करणेचे निर्देश देण्यात आले आहेत. २१ ऑक्टोबर २०११च्या राज्य शासनाच्या आदेशास अनुसरून सेवकांना, वारसाना लाड कमिटी राज्य शासनाच्या निर्देशानुसार नोकरी व इतर सर्व लाभ सोलापूर महापालिका यांच्या दि. ९ जानेवारी २०१४च्या मान्यतेने१ जानेवारी २०१३ पासून लागू करण्यात आले. वास्तविक पाहता हे सन १९७५ सालापासून लागू व्हायला पाहिजे होते. पण सुमारे ३८ वर्षानंतर लागू झाले. महाराष्ट्र शासनाने महापालिकेसाठी २८ डिसेंबर २०२१ रोजी आकृतीबंध मंजूर केला. शासन निर्णयानुसार एकूण आस्थापना ४ हजार ६१२ पदांना मंजुरी देण्यात आली. यामध्ये अ - वर्ग ११२, ब - २६३, क - १३४२ आणि ड- २ हजार ८९५ असे एकूण ४ हजार ६१२ पदांना मंजुरी देण्यात आली. यापैकी अ, ब, क, ड या वर्गातील सुमारे १ हजार पदे रिक्त आहेत तर ३ हजार ४४७ अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत. सुमारे २० ते २५ टक्के कर्मचारी-अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत. आकृतीबंधात उलट पदे कमी झाली. पूर्वी ५ हजार ८३० असणारी पदे कमी होऊन ४ हजार ६१२ पदे कायम ठेवण्यात आली. सुमारे १०५० पदे कमी केली. आकृतिबंध हा कर्मचाऱ्यांसाठी लोकसंख्येच्या प्रमाणात असणे गरजेचे आहे. लोकसंख्या व शहराची भौगोलिक स्थिती यानुसार आकृतिबंधात वास्तविक पाहता कर्मचारी यांची संख्या वाढणे गरजेचे होते परंतु त्या उलट कर्मचाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात कमी करून अधिकाऱ्यांची पदे मोठ्या संख्येने वाढवण्याचा विरोधाभास दिसून येतो. यामुळे आकृतीबंध जरी मंजूर झाला असला तरी तो लाभकारक ठरला नाही. केवळ मंजुरीचा दिलासा मिळाला होता. दरम्यान महापालिकेने ३०२ पदाची भरती प्रक्रिया राबवली. त्यातीलही निम्म्याहून अधिक कर्मचाऱ्यांनी राजीनामे देऊन इतरत्र सेवा करणे पसंत केले आहे.

महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या १३ ऑक्टोबर २०२४च्या शासन निर्णयानुसार १२ ऑगस्ट १९७५ ते २३ फेब्रुवारी २०२३ या कालावधीतील सर्व प्रलंबित प्रकरणांना या लाड कमिटीच्या तरतुदी लागू राहणार आहेत. या निर्णयानुसार संबंधित कालावधीतील महापालिकेतील सफाई कामगारांच्या वारसांकडून अर्ज मागविण्यात आले होते. त्या अर्जाची पडताळणी करून सोलापूर महापालिका प्रशासनाने ३० जून २०२५ अखेरची एकूण ५१२ अर्जदारांची प्रारूप यादी तयार केली आहे. महापालिका आयुक्त डॉ. ओम्बासे यांच्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त रवी पवार आणि सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सामान्य प्रशासन विभागाचे अधीक्षक रजाक पेंढारी यांच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांनी अर्ज तपासणी आणि पात्र उमेदवारांची प्रारूप यादी तयार करण्यात आली. महापालिका प्रशासनाने समाधानकारक काम केले आहे.

दरम्यान, महापालिका प्रशासनाने लाड समितीच्या शिफारशीच्या अनुषंगाने सफाई कामगारांच्या वारसांची यादी महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाकडे पाठविली आहे. या जागा कशा भरावयाच्या? वेतन तरतूद यासह इतर मुद्द्याबाबत नगर विकास विभागाकडे मार्गदर्शन मागविले आहे. शासनाचे मार्गदर्शन आल्यानंतर या प्रकरणी पुढील कार्यवाही होणार आहे. त्याची प्रतीक्षा संबंधित सेवकांच्या वारसांना आहे.

शासन आणि महापालिकेने लाड कमिटी अंतर्गत सेवकांच्या वारसांना न्याय देण्याचे ठरविले आहे. भविष्यात सेवानिवृत्त सेवक आणि एकूणच नव्या शासन निर्णयानुसार प्राप्त झालेले वारसांचे अर्ज याचा सांगोपांग विचार करून सफाई कामगारांची पदसंख्या वाढविणे आवश्यक आहे. शासन स्तरावरही धोरणात्मक निर्णय महत्त्वाचा आहे. यासाठी कामगार हितदक्ष महापालिका आयुक्त डॉ. ओम्बासे हे शासनाकडे पाठपुरावा करून सफाई कामगारांच्या वारसांना शहर विकासाच्या दृष्टीने न्याय देतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. त्यासाठी ''आता थांबायचं नाय...!''

# विधिमंडळ आवारात पडळकर-आव्हाड समर्थकांमध्ये हाणामारी

तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी
**मुंबई, दि. १७ जुलै -**

भाजपाचे आमदार गोपीचंद पडळकर व शरद पवार गटाचे नेते आ. जितेंद्र आव्हाड यांच्यात गेल्या काही दिवसापासून सुरु असलेला शाब्दिक वाद गुरुवारी हाणामारीवर आला. साध्या व खाकी वर्दीत शेकडो पोलिस बंदोबस्त तैनात असलेल्या चक्क विधानभवनाच्या लॉबीत पडळकराच्या समर्थकांनी आव्हाड यांच्या कार्यकर्त्यांवर धाव घेत मारहाण केली. त्यांच्यात झालेल्या राड्यामुळे मोठा गदारोळ उडाला. पोलिसांना त्यांना बाजूला करताना मोठी धावपळ करावी लागली. अत्यंत अर्वाच्य शिवीगाळ व आरडाओरड करीत ऐकमेकांशी झोंबत असल्याची महाराष्ट्र विधिमंडळाच्या इतिहासात पहिल्यादाच घडली.



या हाणामारीचे पडसाद सभागृहात उमटले. महाविकास आघाडीच्या नेत्यांनी त्याबाबत तातडीने कारवाई करण्याची मागणी केली. आ.आव्हाड यांनी आपल्याला जीवे मारण्याचा कट होता, असा आरोप केला. तर पडळकर यांनी घडलेल्या प्रकाराबाबत अनभिज्ञ असल्याचे सांगत दिलगिरी व्यक्त केली. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी हा गंभीर प्रकार असून या प्रकरणाचा अहवाल मागविला आहे. त्यानंतर कारवाई करणार असल्याचे जाहीर केले. जयंत पाटील आणि आ. आव्हाड यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन पडळकर यांच्याबाबत तक्रार केली. विधिमंडळाचचे अधिवेशन शुक्रवारी संपणार असून,बुधवारी विधानसभेत विरोधी पक्षांचा अंतिम आठवडा प्रस्ताव जितेंद्र आव्हाड यांनी मांडला. त्यामध्ये त्यांनी विधान मंडळाच्या आवारात पडळकर यांच्या गाडीने आपल्याला धडक देण्याचा प्रकार, त्यानंतर झालेला वाद, आलेल्या धमक्यांसंदर्भात माहिती दिली. यानंतर थोड्याच वेळात ते सभागृहातून बाहेर निघून गेले. त्यावेळी विधानभवनाच्या लॉबीत पडळकर हे ऋषिकेश टकले व अन्य काही कार्यकर्त्यासमवेत विधिमंडळाच्या पायऱ्यांवर बोलत होते. अचानक त्यांनी लॉबीत प्रवेश करत आव्हाडांचे कार्यकर्ते नितीन देशमुख यांच्या दिशेने धाव घेतली. त्यांच्यात झटापट सुरु झाली. शिवीगाळ व अंगावर धावून जात मारहाण आणि कपडे फाडण्यात आली. तुम्हारे पाच मिनटाच्याया राड्यानंतर पोलिसांना मोठ्या शर्थीने त्यांना बाजूला करण्यात यश आले.

**घडलेली घटना अतिशय चुकीची आहे : मुख्यमंत्री**

विधिमंडळाच्या लॉबीत घडलेल्या घटना अतिशय चुकीची आहे, अशा प्रकारे घटना घडणे बिल्कूल योग्य नाही,असे सांगून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, या ठिकाणी माननीय अध्यक्ष विधानसभा, सभापती विधानपरिषद यांच्या अंतर्गत हा परिसर येतो. त्यांनी याची गंभीर दखल घ्यावी. यासंदर्भात कडक कारवाई अध्यक्षांनी करावी, अशी विनंती केलेली आहे. मला असं वाटतं की अशा प्रकारे एकतर याठिकाणी इतक्या मोठ्या प्रमाणात लोकं जमा होतात आणि मारामारी करतात हे या विधानसभेला शोभणारं नाही, यामुळं कारवाई तर झालीच पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

**सखोल अहवाला मागविला : अध्यक्ष नार्वेकर**

ही घटना अत्यंत दुर्भाग्यपूर्ण व गंभीर असून याबाबत आपण सुरक्षा विभागाकडून सखोल अहवाल मागीतला आहे. तो आल्यानंतर आपण योग्य ती कारवाई करू, असे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सांगितले.

### तर आमदार म्हणून का राहायचे : आव्हाड

या घटनेनंतर जितेंद्र आव्हाड अधिक आक्रमक झाले. त्यांनी सभागृहात आणि त्यानंतर बाहेर पत्रकारांशी बोलताना संताप व्यक्त केला. ते म्हणाले, पडळकरांच्या कार्यकर्त्यांनी हल्ला हे संपूर्ण महाराष्ट्राला समजलं पाहिजे. विधानसभेत जर तुम्ही गुंडांना प्रवेश देणार असाल आणि ते हल्ले करणार असतील तर आमचे जीव सुरक्षित नाहीत. मला आई बहिणीवरुन शिव्या दिल्या आहेत. कुत्रा, डुक्कर अजून काय काय लिहिलं आहे. भाषण करुन बाहेर आलो होतो, मोकळी हवा खाण्यासाठी बाहेर गेलो होतो.हे सगळे मलाच मारण्यासाठी आले होते. विधानसभेत विधिमंडळाच्या पायऱ्यांवर भवनात आमदार सुरक्षित नसतील तर कशाला राहायचं आमदार?, काय गुन्हा आहे आमचा, कुणीतरी मवाल्या सारखा येतो, आई बहिणींवरुन शिव्या देतो, त्याला पार्लमेंटरी शब्द करुन टाका, अनपार्लमेंटरी शब्द वापरतात, ते पार्लमेंटरी करुन टाका, सत्तेचा एवढा मुजोरपणा, सत्तेचा एवढा माज, असा तीव्र संताप आव्हाड यांनी व्यक्त केला.

### जयंत पाटील, जितेंद्र आव्हाड यांच्याकडून देवेंद्र फडणवीसांची भेट

विधानभवनाच्या लॉबीत जो प्रकार घडला त्याबाबत राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील,जितेंद्र आव्हाड यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. या भेटीत घडलेल्या घटनेबाबत तक्रार करण्यात आल्याची माहिती आहे. चंद्रशेखर बावनकुळे यांची देखील भेट घेत तक्रार करण्यात आल्याची माहिती आहे.

### पडळकर यांच्याकडून दिलगिरी

विधानसभेच्या प्रांगणात घडलेली घटना अत्यंत दुर्दैवी आहे, याचं अतीव दुःख विधानसभेचा सदस्य म्हणून मला आहे. विधानसभा अध्यक्ष, विधानपरिषद सभापती हा आवार त्यांच्या कक्षेत असल्यानं दिलगिरी व्यक्त करतो. याविषयी आमच्या नेते मंडळींशी चर्चा करून तुम्च्या सगळ्यांशी बोलतो, असे पडळकर यांनी सांगितले.

---

## महत्त्वाचे...



### नांदेड सहकारी बँकेच्या माजी अध्यक्षाचा भाजपामध्ये प्रवेश

**मुंबई, दि. १७ जुलै-**

नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष व जिल्हा परिषदेचे माजी बांधकाम सभापती दिनकर दहिफळे, किनवट बाजार समितीचे सभापती गजानन मुंडे तसेच ८ संचालकांनी गुरुवारी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. प्रदेश कार्यालयात झालेल्या पक्षप्रवेश कार्यक्रमात भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी माजी मुख्यमंत्री खा. अशोक चव्हाण, प्रदेश सरचिटणीस आ. विक्रांत पाटील, आ. तुषार राठोड, नांदेड जिल्हाध्यक्ष अमरनाथ राजूरकर, नांदेड उत्तर अध्यक्ष संतुकराव हंबर्डे, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी उपस्थित होते.

### गायकवाड हल्ला; दिपक काटेस जामीन मंजूर

**अक्कलकोट दि १७ जुलै-**

संभाजी ब्रिगेड प्रदेश अध्यक्ष प्रविण गायकवाड यांच्यावर शाईफेक मारहाण हल्ला प्रकरणी संशयित दिपक काटे यांच्या दोन दिवसाच्या पोलीस कोठडी नंतर गुरुवारी अक्कलकोट न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने १४ दिवसाची न्यायालयीन कोठडी सुनावली. संशयित आरोपी दिपक काटे यांच्या वकिलांनी जामीनासाठी न्यायालयात आर्ज सादर केला. यावेळी न्यायालयाने २० हजार रुपयाच्या वैयक्तीक जात मुचलक्यावर जामीन मंजूर केल्याची माहिती अक्कलकोट उत्तर पोलीसांनी दिली.

### अकरावीची दुसरी प्रवेश यादी जाहीर; १८ जुलै ते २१ जुलै प्रवेश घेण्यासाठी मुदत

**सोलापूर, दि. १७ जुलै**

अकरावीची पहिली प्रवेशयादी २८ जूनला जाहीर झाल्यानंतर १७ जुलैला दुसरी कॅप कोट्यातील यादी जाहीर करण्यात आली आहे. यादीतील विद्यार्थ्यांना १८ जुलै ते २१ जुलै पर्यंत प्रवेश निश्चित करावे लागणार आहे. अकरावी प्रवेशप्रक्रिया ऑनलाईन झाल्यानंतर पहिली यादी जाहीर करण्यात आली होती. त्यानंतर रिक्त जागांकरीता कॅप कोट्यातील दुसरी यादी गुरूवारी १७ जुलैला जाहीर करण्यात आली आहे. यादीमधील विद्यार्थ्यांनी संबंधित महाविद्यालयात १८ जुलै ते २१ जुलै दरम्यान प्रवेश निश्चित करण्याचे आवाहन शिक्षण विभागाकडून करण्यात आला आहे. रिक्त जागांसाठी २३ जुलै रोजी तिसरी यादी जाहीर करण्यात येणार असून २८ जुलैपर्यंत प्रवेश निश्चित होणार आहे. त्यानंतर ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यात महाविद्यालय सुरू होणार असल्याचे सांगण्यात येत आहे.



### लोकसभेत हरलो जरी तरी मी विझलो नव्हतो : ॲड. उज्वल निकम

**मुंबई, दि. १७ जुलै-**

फेक नेरीटिव्हमुळे जरी मी लोकसभा निवडणूक हरलो होतो तरी मी विझलो नव्हतो, पण त्यांना हे कळले नाही,अशा भावना राज्यसभेचे नवनियुक्त सदस्य ॲड. उज्वल निकम यांनी व्यक्त करीत विरोधकांना टोला लगावला. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या १२ किल्ल्यांना युनोस्कोचा जागतिक मानांकन मिळण्याच्या कार्यात वकिलांनी योगदानाबद्दल सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड आशिष शेलार यांचा आणि राज्यसभेत नियुक्ती झाल्याबद्दल निकम यांचा बुधवारी संध्याकाळी सांताक्रूझ येथे भाजपा उत्तर मध्य मुंबई जिल्ह्यातर्फे जाहीर सत्कार करण्यात आला.यावेळी निकम यांनी सांगितले की, मुंबई महापालिकेची निवडणूक आपल्याला जिंकायची आहे. पण कार्यकर्त्यांनी सावध राहायला हवे, रात्र वैऱ्याची आहे. कारण फेक नेरेटीव्ह आणि खोट्या अफवा पसरवणाऱ्यांपासून आपल्याला सावध रहायला हवे. भाषेच्या नावाने असेच फेक नेरेटीव्ह पसरवले जात आहे, असे सांगताना लोकसभेच्या वेळी आपण या फेक नेरेटीव्हचे बळी पडलो. मला तर कॉंग्रेसने निवडणूकीत देशद्रोही ठरवले. माझ्यासाठी हा धक्काच होता.देशाच्या विरोधात मी विचार ही करु शकत नाही. मला त्या रात्री झोप लागली नाही. मी न्यायालयात जाऊन त्यांच्या विरोधात लढलो असतो पण त्याने आरोप करणाऱ्यांनाच अधिक प्रसिद्ध मिळाली असती म्हणून मी टाळले. त्यामुळे अशा लोकांपासून भाजपा कार्यकर्त्यांनी सावध रहायला हवे, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी मंत्री ॲड. शेलार म्हणाले की, राज्यसभेवर पाठवण्याची वेळ आली त्यावेळी शरद पवार यांच्या पक्षाने त्यांना मुंबईकरांसाठी लढण्याचा वकिलाला पाठवले नाही. मुंबई बॉम्बस्फोटातील आरोपी याकूब आणि अन्य देशविरोधी खटल्यातील आरोपींची बाजू घेऊन लढण्याचा वकिलाला पाठवलेत. भाजपाने याकूब, कसाबला फाशीची शिक्षा व्हावी म्हणून लढणाऱ्या मुंबईकरांच्या वकिल निकम यांना भाजपाने पाठवले हा फरक आहे.

### वैभवसंपन्न राष्ट्राच्या उभारणीत...

पान १ वरून

बालाजी अमाईन्सचे व्यवस्थापकीय संचालक डी. राम रेड्डी म्हणाले, महिलांचे जीवन प्रकाशमय करण्याचे अखंड कार्य उद्योगवर्धिनी करत आहे. हजारो महिलांना आर्थिक स्वावलंबी, सक्षम करून कौशल्य प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगार व्यवसाय उपलब्ध करून दिला आहे. द्योगवर्धिनी संस्थेच्या संस्थापिका अध्यक्ष चंद्रिका चौहान यांनी प्रास्ताविक केले. अपर्णा सहस्रबुद्धे यांनी सूत्रसंचालन तर डॉ. माधवी रायते यांनी आभार प्रदर्शन केले.

**उद्योगवर्धिनीच्या महिला प्रशिक्षण केंद्राच्या स्वप्नपूर्तीसाठी करणार सहकार्य**

उद्योगवर्धिनी संस्थेच्या संस्थापिका अध्यक्ष चंद्रिका चौहान यांनी प्रास्ताविकात महिला प्रशिक्षण केंद्र उभारण्यासाठी समाजाने योगदान देण्याचे आवाहन केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत डी. राम रेड्डी यांनी उद्योगवर्धिनीच्या महिला प्रशिक्षण केंद्राच्या स्वप्नपूर्तीसाठी आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

**१०० टक्के पर्यावरणपूरक कार्यक्रम**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या नित्य कार्यात पर्यावरण रक्षण आणि संवर्धनाचा आग्रह धरला जातो, याची प्रचिती पुन्हा एकदा सोलापूरकरांना आली. हुतात्मा स्मृती मंदिरात झालेल्या कार्यक्रमात व्यासपीठावर लावलेला फलक, सजावट आणि इतर सर्व वस्तू पर्यावरणपूरकच वापरण्यात आल्या होत्या.

---



## सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांची उद्योगवर्धिनी संस्थेस सदिच्छा भेट

**शून्यातून विश्व उभारलेल्या कर्तृत्ववान महिलांची जाणून घेतली यशोगाथा**

तभा वृत्तसेवा,
**सोलापूर, दि. १७ जुलै-**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी गुरुवारी उद्योगवर्धिनी संस्थेस सदिच्छा भेट दिली. यावेळी संस्थेच्या कार्याची माहिती घेऊन त्यांनी महिला सक्षमीकरणाच्या या प्रकल्पाचे कौतुक केले. शून्यातून विश्व उभारलेल्या उद्योगवर्धिनीच्या कर्तृत्ववान महिलांची यशोगाथा त्यांनी जाणून घेतली.

प्रारंभी संस्थेच्या संस्थापिका अध्यक्षा चंद्रिका चौहान आणि संस्थेच्या महिला सेवाव्रतींच्या हस्ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांचे औक्षण करून स्वागत करण्यात आले. यानंतर अध्यक्षा चंद्रिका चौहान यांनी उद्योगवर्धिनी संस्थेतर्फे चालणाऱ्या शिलाई, सेवापाथेय, शांतसंध्या, अन्नपूर्णा योजना, महिलांचे समुपदेशन, महिला रोजगार विषयक उपक्रमांची माहिती सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांना दिली.

उद्योगवर्धिनीने गेल्या २१ वर्षांमध्ये १० हजारांहून अधिक महिलांना संपर्क करून त्यांना व्यवसाय, रोजगार, समुपदेशनाच्या माध्यमातून मार्गदर्शन केले आहे. तसेच उद्योगवर्धिनीने आजपर्यंत ३५० उद्योजिका घडविल्या आहेत. याबद्दल सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी समाधान व्यक्त केले.

याप्रसंगी सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत म्हणाले, महिलांचा आर्थिक पाया पक्का होणे आवश्यक आहे. आर्थिक स्वावलंबी होताना येणाऱ्या समस्यांवर उपाय शोधावा. स्त्री सक्षमीकरणाच्या कार्यातील प्रत्येक कृती आणि परिश्रम राष्ट्रासाठी असतील याची काळजी घेतली पाहिजे. माझे भले नाही झाले तरी चालेल पण राष्ट्राचे भले व्हावे, हा विचार प्रत्येकाच्या मनात रुजवण्याची आवश्यकता आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक डॉ. केशव हेडगेवार, स्वामी विवेकानंद अशी जीवनचरित्रे आपल्यासाठी आदर्शवत असल्याचेही सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत म्हणाले.

यावेळी आनंद जोशी, कल्पेश जव्हेरी, सतीश मालू, उद्योगवर्धिनी संस्थेच्या सचिवा मेधा राजोपाध्ये, उद्योगवर्धिनीच्या उपाध्यक्षा शोभा श्रीवास्तव, खजिनदार वर्षा विभुते, संचालिका ड. गीतांजली चौहान, शांताबाई टाके, सुलोचना भाकरे, दिपाली देशपांडे, सिद्धरामय्या हिरेमठ, राजू गवळी, अजय सिंग तसेच उद्योगवर्धिनीच्या सेवाव्रती कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

## पाठखळ प्रकरणातील प्रेमीयुगुलास ६ दिवसांची पोलीस कोठडी

**प्रेम प्रकरण लपवण्यासाठी वेडसर महिलेचा जाळून केला खून**

तभा वृत्तसेवा,
**मंगळवेढा दि. १७ जुलै**



पाठखळ येथे स्वतःचे प्रेम संबंध लपविण्यासाठी अन्य एका अज्ञात वेडसर महिलेचा खून करुन स्वतः मीच असल्याचा बहाणा केल्याप्रकरणी पोलीसांनी किरण नागेश सावत (वय-२३) या विवाहितेसह तिचा प्रियकर निशांत सतिश सावत (वय-२०) या दोघा प्रेमविरांना पोलीसांनी अटक करुन मंगळवेढा न्यायालयात उभे केले असता सहा दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

या घटनेची हकीकत अशी, दि.१४ जुलै रोजी रात्री २.३०च्या पूर्वी वरील आरोपीने गोपाळपूर येथील एका अज्ञात वेडसर महिलेला पाठखळ येथील सावत वस्तीवर आणून गळा आवळून खून करुन तो मृतदेह कडब्याच्या गंजीमध्ये टाकला. त्यानंतर आरोपी निशांत सावत याने प्रेयसी किरण सावत हिला फोन करुन राहते घरातून बाहेर बोलावून घेतले. किरण हिचा वापरता मोबाईल मृतदेहावर ठेवून किरण ही तेथून पळून गेली. आरोपी निशांत याने कडब्याच्या गंजीला आग लावून पेटवून देवून त्याचे घरी निघून गेला. लागलेल्या आगीमुळे लोक जागे झाल्यानंतर सुरुवातीला आरोपी निशांत याने आग विझविण्यासाठी अन्य लोकांना मदत केली. त्यानंतर दोघे आरोपी तथा प्रियकर व प्रेयसी मोटार सायकलने कराडला जाण्यासाठी सांगोलामार्गे विटा (जि. सांगली) हद्दीत सोडले. तेथून आरोपी किरण सावत ही कोणत्यातरी वाहनाने आगाशीव नगर झेडपी कॉलनी कराड येथे ठरल्या ठिकाणी निघून गेली. आरोपी निशांत याने कोणाला काही संशय येऊ नये म्हणून त्याच्या राहत्या घरी पाठखळ येथे सावत वस्तीवर परत आला होता. या नाट्यमय घडामोडीनंतर पोलीसांनी सुतावरुन स्वर्ग गाठत मोबाईल लोकेशन काढून सत्य घटना उघडकीस आणली. तत्काळ मंगळवेढा पोलीसांची टीम रातोरात कराड येथे गेली. त्यांनी आरोपी किरण हिस ताब्यात घेवून पहाटे मंगळवेढा पोलीस स्टेशन मध्ये हजर केले. दुसऱ्या दिवशी दोन्ही आरोपींना तपासिक अंमलदार तथा पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे यांनी अटक करुन न्यायालयात उभे केले. यावेळी सदरची वेडसर महिला कुठली आहे? तिच्या नातेवाईकांचा शोध घेणे व अन्य इतर या घटनेत कोण आहे का? याचा तपास करणेकामी सात दिवसांच्या पोलीस कोठडीची मागणी केली असता न्यायालयाने सहा दिवस म्हणजेच दि.२१ जुलै पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. सरकार पक्षाच्यावतीने ॲड.अमोल क्षिरसागर यांनी तर आरोपीच्यावतीने ॲड.दत्तात्रय माने यांनी काम पाहिले.

---

## नंदुरबारमधील मदरशाला ७२८ कोटींचे 'फॉरेन फण्डिंग'

**चौकशी 'ईडी'कडे सुपूर्द करण्याचे मुख्यमंत्र्यांनी दिले निर्देश**

तभा वृत्तसेवा,
**मुंबई, दि. १७ जुलै-**



अक्कलकुवा (जि. नंदुरबार) येथील जामिया इस्लामिया इशातूल उलुम या मदरशाला ७२८.६१ कोटी रुपयांचा विदेशी निधी (फॉरेन फण्डिंग) मिळाल्याची धक्कादायक माहिती गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी बुधवारी विधानसभेत दिली. या प्रकरणाची दहशतवादविरोधी पथकामार्फत (एटीएस) चौकशी सुरू असून इतक्या मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल झाल्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हे प्रकरण 'ईडी'कडे सुपूर्द करण्याचे निर्देश दिले आहेत, तसेच धर्मादाय आयुक्तांकडेदेखील योग्य ती कारवाई करण्याचा प्रस्ताव गृहविभागाने दिल्याचेही त्यांनी सांगितले.

भाजप आ. देवेंद्र कोठे यांनी लक्षवेधी सूचनेद्वारे हे प्रकरण सभागृहात मांडले. त्यांनी सांगितले की, या मदरशात येमेनच्या काही व्यक्तींनी व्हिसाची मुदत (दि. १९ फेब्रुवारी २०१६) संपल्यानंतरही बेकायदेशीरपणे वास्तव्य केले. या व्यक्तींनी आधारकार्ड, पॅनकार्ड, जन्मदाखला आणि शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र यांसारखी बनावट कागदपत्रे तयार केली. याप्रकरणी दि. ११ फेब्रुवारी रोजी अक्कलकुवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून मदरशाचे संस्थापक आणि अध्यक्ष यांना अटकपूर्व जामीन मिळाला आहे. या संस्थेने आदिवासींच्या जमिनी बळकावल्याचा आणि शिष्यवृत्ती घोटाळ्याचा आरोप आ. कोठे यांनी केला. तसेच या प्रकरणी चौकशी विशेष तपासपथकामार्फत (एसआयटी) करावी, संस्थेची मान्यता रद्द करावी आणि बळकावलेली जमीन परत कराव्या, अशी मागणी त्यांनी केली. महाराष्ट्रात अफझल गुरू, अजमल कसाब तयार होण्याची वाट पाहणार का? असा सवालही त्यांनी केला.

### कारवाईचे आश्वासन

वैद्यकीय महाविद्यालयाच्या मान्यतेबाबत वैद्यकीय शिक्षण विभागाला कळवले जाईल आणि योग्य कारवाई होईल. तसेच, राज्यातील मदरशांमध्ये परदेशी नागरिकांचे बेकायदेशीर वास्तव्य आहे का, याची गृहविभागामार्फत तपासणी केली जाईल, असे गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी सांगितले.

### मदरशांमध्ये 'कोम्बिंग ऑपरेशन' राबवा : गोपीचंद पडळकर

या संस्थेवर मध्य प्रदेशातही गुन्हा दाखल असल्याचे आ. अनुप अग्रवाल यांनी निदर्शनास आणून दिले. या संस्थेला मिळणाऱ्या राजकीय पाठबळाचे पुरावे असल्याचा दावा करत त्यांनी देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा आणि 'ईडी' मार्फत चौकशी करावी, अशी मागणी केली. तसेच, मदरशांमध्ये मराठी शिकवणे बंधनकारक करावे, असे सूचवले. परदेशी नागरिकांना सहज कागदपत्रे मिळतात, तर मूळ भारतीय नागरिकांना त्यासाठी संघर्ष करावा लागतो.

### येमेनचे काहीजण व्हिसा संपला तरी भारतातच

गृहराज्यमंत्री भोयर यांनी सांगितले की, येमेनच्या व्यक्तींचा व्हिसा २०१६ मध्ये संपला होता, तरीही ते परत गेले नाहीत. याप्रकरणी पोलिसांनी स्वतः हुन गुन्हा दाखल करून कारवाई केली. या संस्थेला 'विदेशी निधी नियमन कायदा' मार्फत ७२८.६१ कोटी मिळाले. याबाबत केंद्र सरकारला तक्रार केली असून कायदेशीर सल्लागार नियुक्त केले आहेत. आदिवासींची जमीन बळकावणे, शिष्यवृत्ती घोटाळ्याच्या आरोपांचीही चौकशी होईल. दोषी आढळल्यास कठोर कारवाई केली जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले.



## आळंदीत वारकरी कीर्तनकार गोलमेज परिषद

**एमआयटी व राष्ट्रीय सरपंच संसदेचे आयोजन**

**६० कीर्तनकार व १५० सरपंच होणार सहभागी**

तभा वृत्तसेवा,
**पुणे, दि. १७ जुलै-**

'एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या स्कूल ऑफ एज्युकेशन, पुणे' व 'एमआयटी-राष्ट्रीय सरपंच संसद' यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवशीय 'महाराष्ट्र वारकरी कीर्तनकार गोलमेज परिषद'१९ व २० जुलै २०२५ रोजी हनुमानवाडी आळंदी (देवाची) येथील डॉ. विश्वनाथ कराड वर्ल्ड पीस स्कूल येथे आयोजित करण्यात आली आहे. या परिषदेत संपूर्ण महाराष्ट्रातील ६० कीर्तनकार आणि १५० सरपंच सहभागी होणार आहेत. अशी माहिती परिषदेचे प्रमुख समन्वयक योगेश पाटील, हभप यशोधन महाराज साखरे आणि एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे प्र कुलगुरु डॉ. मिलिंद पांडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कार्याध्यक्ष डॉ. राहुल विश्वनाथ कराड यांच्या संकल्पनेतून ही गोलमेज परिषद होत आहे. या परिषदेचा शुभारंभ शनिवार, १९ जुलै रोजी दुपारी ३.०० वा. होणार आहे. या समारंभासाठी राज्याचे अन्न व औषधे प्रशासन विभागाचे मंत्री श्री.नरहरी झिरवाळ प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच या सत्रात विधान परिषदेचे सदस्य श्री. श्रीकांत भारतीय, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, खांडबहाले डॉट कॉमचे निर्माते डॉ. सुनिल खांडबहाले हे सन्माननीय वक्ते म्हणून उपस्थित राहतील. अध्यक्षस्थानी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड हे असतील. तसेच एमआयटी डब्ल्यूपीयूचे कार्याध्यक्ष डॉ. राहुल कराड यांची विशेष उपस्थिती राहणार आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी,
हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## अग्रलेख...

# खेळीमेळीतील पेचप्रसंग!

भारतीय जनता पार्टी हा केवळ सत्ताकारण करणारा नव्हे, तर माणसे जोडणारा पक्ष आहे, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. तसे नसते, तर गेल्या सहा वर्षांत महाराष्ट्राच्या राजकारणात जे काही घडले त्यामुळे या पक्षास जबर फटका सोसावा लागला, ते सारे विसरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उबाठा गटाचे नेते उद्धव ठाकरे यांना विधिमंडळात दिलेल्या ऑफरची चर्चा सुरू झाली नसती. सहा वर्षांपूर्वी उद्धव ठाकरे यांनी जनादेश नाकारून, युती धर्मास तिलांजली देऊन भाजपाला सोडचिठ्ठी दिली आणि काँग्रेस-राष्ट्रवादीशी संगनमत करून महाविकास आघाडी या नावाने अनैतिक सरकार स्थापन केले. भाजपावर विरोधात बसण्याची वेळ आली. देवेंद्र फडणवीस हे विरोधी पक्षनेते म्हणून विधिमंडळात दाखल झाले. 'पार्टी विथ डिफरन्स' असे भाजपाच्या राजकारणाचे वर्णन केले जाते. अनेकदा विरोधक त्याची खिल्ली उडवितात. पण भाजपा हा सूडाच्या आणि कुरघोडीच्या अलिकडच्या राजकारणाहून वेगळाच पक्ष आहे. या पक्षात मतभेदास जागा नाही, हे फडणवीस यांनी बुधवारी विधिमंडळात दाखवून दिले. सहा वर्षांपूर्वी युतीला सोडचिठ्ठी देऊन महाविकास आघाडीच्या मुख्यमंत्रिपदाच्या मोहास बळी पडणाऱ्या उद्धव ठाकरे यांनी विश्वासघात केला, त्याचा विसर आपल्याला कधीही पडणार नाही, असे देवेंद्र फडणवीस यांनी त्यानंतर कितीतरी वेळा सांगितले असले, तरी उद्धव ठाकरे यांचे टोमणे, आरोप, आव्हाने आदी सारे काही विसरून फडणवीस यांनी बुधवारी सभागृहात दाखविलेला दिलदारपणा पक्षाचे वेगळेपण अधोरेखित करणारा ठरतो. भाजपाचा कार्यकर्ता माणसे जोडतो, हे त्यांनी त्या वक्तव्यातून दाखवून दिले. आता भाजपाच्या नेतृत्वाखालील महायुतीकडे भक्कम बहुमत असल्याने व जनादेशाचा कौलही महायुतीच्याच पाठीशी असल्याचे वारंवार स्पष्ट होत असल्याने, भाजपा वा महायुतीस विरोधात बसण्याची वेळ येण्याची शक्यता नाहीच; मात्र विरोधात बसलेल्या कोणासही भाजपासोबत येण्याची व पर्यायाने सत्तेत सहभागी होण्याची संधी आहे, हे फडणवीस यांचे वक्तव्य राजकीयदृष्ट्या मिश्कीलपणाचा अस्सल वैदर्भीय ठसका असला, तरी ठाकरे यांच्यासाठी ते नेमके वर्मावर ठेवले गेलेले बोटच होते, यात शंका नाही. विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या सदस्यत्वाची मुदत २९ ऑगस्ट रोजी संपत आहे. त्याआधीच्या अधिवेशनाच्या अखेरच्या सत्रात दानवे यांना निरोप देण्याचा कार्यक्रम सभागृहात संपन्न झाला. त्या निमित्ताने दानवे यांच्या कार्यशैलीची स्तुती करताना फडणवीस यांनी जुन्या घडामोडींच्या आठवणी पुसून टाकत खेळीमेळीच्या वातावरणात त्यांना शुभेच्छा दिल्या आणि विरोधात असलेल्यांना सत्तेसोबत येण्याची संधी असते, या वास्तवाची खुमासदार आठवण करून देत ठाकरे यांना महायुतीसोबत येण्याचे आमंत्रण दिले. माध्यमांत आणि राजकीय वर्तुळात त्याची जोरदार चर्चा सुरू झाली आणि ठाकरे यांना त्यावर प्रतिक्रिया देणे भागच पडले, तेव्हा अशा गोष्टी खेळीमेळीने घ्यायच्या असतात, अशी सारवासारव करणारे प्रत्युत्तर ठाकरे यांनी दिले. मात्र, फडणवीस यांच्यावरील पक्षाच्या वेगळेपणाचे संस्कार आणि ठाकरे यांच्या राजकारणाचा इतिहास पाहता, फडणवीस यांनी दिलेले आमंत्रण ही त्यांच्या वैरभावरहित राजकारणाची अभिनंदनीय बाजू आहे, असेच म्हणावे लागेल. दुसऱ्या बाजूने ठाकरे यांच्या वाटचालीचा इतिहास पाहता ते तडजोड करणारच नाहीत, असे कोणीच छातीठोकपणे सांगू शकणार नाही, हेही वास्तव आहे.

ठाकरे यांच्या शिवसेनेत गेल्या चार-पाच दशकांत अनेकदा फूट पडली. बाळासाहेबांवर निष्ठा असलेले अनेक कट्टर कार्यकर्ते पक्षाबाहेर पडले. राज ठाकरे, छगन भुजबळ, गणेश नाईक, नारायण राणे, एकनाथ शिंदे यांच्यासारखे बिनीचे मोहरे पक्षाबाहेर पडले, पण प्रत्येक फुटीमागे केवळ सत्तालोभाचे कारण नव्हते. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वशैलीवरील नाराजी आणि नेतृत्वावरील अविश्वास हेच प्रत्येक फुटीमागचे कारण होते, हा इतिहास आहे. तरीही एकनाथ शिंदे यांच्या बंडाने पक्षाची पुरती वाताहत झाल्याने, त्याचे खापर फोडण्यासाठी निमित्त शोधणे सुरू होते. त्यातूनच त्यांचा 'खोके सिद्धान्त' जन्माला आला. उलट नारायण राणे यांच्यासारख्या नेत्याने तर मातोश्रीवरच खोक्यांचा आरोप करून खळबळ उडवून दिली होती. आम्ही खोके आणि पाकिटे दिली नसती तर मातोश्री उभी राहिली नसती, असा थेट आरोप त्यांनी एका जाहीर सभेत केला होता. त्यामुळे पक्षातील नेत्यांना भाजपाने पळविले हा केवळ कांगावा होता. उद्धव ठाकरे यांच्या कार्यशैलीस कंटाळूनच हे नेते बाहेर पडले ही वस्तुस्थिती होती, हे लपून राहिलेले नाही. या संदर्भाचाच धागा पकडून बुधवारी विधान परिषदेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गमतीने ठाकरे यांना चिमटा काढला. आता तुम्हालाही इकडे येण्याची संधी असून तुम्ही आलात तर वेगळा विचार करू, अशी थेट ऑफरच फडणवीस यांनी दिल्याने, भविष्यातील राजकारणाचा मागोवा घेण्याची चढाओढ राजकीय वर्तुळात आणि विश्लेषकांत सुरू झाली आहे. फडणवीस यांनी गमतीने दिलेला हा देकार ठाकरे मात्र गांभीर्याने घेणार का, यावरही चर्चा सुरू झाली आणि ठाकरे यांच्या सत्तेच्या तडजोडींचा इतिहासही उगाळला गेला. तसे नसते, तर सत्तेचा स्पष्ट जनादेश असतानाही, केवळ मुख्यमंत्रिपदाचा देकार मिळाला म्हणून युतीचे संकेत धाब्यावर बसवून उद्धव ठाकरे महाविकास आघाडीसोबत गेले असते का, असा प्रश्नही या चर्चेच्या निमित्ताने अधोरेखित झाला आहे.

केवळ उद्धव ठाकरेच नव्हे, तर महाराष्ट्राच्या राजकारणातील भाजपेतर पक्षांमधील फुटीच्या इतिहासालाही सत्ताकारणाचीच किनार आहे. ज्या राजकीय पक्षांतून अन्य महत्त्वाचे नेते जेव्हा जेव्हा बाहेर पडले तेव्हा त्यांनी सत्तेच्या वळचणीचाच आसरा घेतल्याची अनेक उदाहरणे महाराष्ट्राने अनुभवलेली आहेत. राष्ट्रीय राजकारणात राहिलेले काही प्रादेशिक नेतेही सत्तेच्या तडजोडी करताना महाराष्ट्राने पाहिले आहे. भाजपा हा अशा राजकारणातील अपवाद आहे असे म्हणावे लागेल. सत्ता गमावल्यानंतर अनेक नेते तळ्यात-मळ्यात करू लागतात, सत्तेच्या सोबतीने राहण्यासाठी वैचारिक तडजोडी करतात, असेही दिसते. भाजपाचे वैचारिक संस्कार असलेल्या कार्यकर्त्यांमध्ये मात्र सत्तेसोबत किंवा सत्तेविना अशा कोणत्याही राजकीय परिस्थितीचा परिणाम होत नाही, हे या पक्षाचे वेगळेपण आहे. सत्ता नसतानाही भाजपाचे कार्यकर्ते पक्षाशी एकनिष्ठ राहतात, राष्ट्रहितासाठी सत्ता हे या पक्षाच्या कार्यकर्त्यांवरील संस्कार असल्याने, माणसे जोडणे व माणसांचे धागे जोडत पक्ष मजबूत करणे ही या पक्षाची राजनीती आहे. म्हणूनच विपरीत परिस्थितीतही भाजपाचे कार्यकर्ते किंवा नेत्यांमध्ये अन्य नेत्यांप्रमाणे पक्षांतराच्या प्रवाहात वाहून गेलेले सहसा दिसत नाहीत. त्यामुळेच भाजपा हा 'पार्टी विथ डिफरन्स' या बिरूदास पात्र असलेला पक्ष ठरतो. सत्ता हे या पक्षाच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांचे अंतिम ध्येय नसते. म्हणूनच विरोधी पक्षात राहूनही देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या पदास न्याय देत राज्याच्या हितासाठी सरकारशी केलेला संघर्ष महाराष्ट्रास पाहावयास मिळाला. सत्तेविना राहूनही राष्ट्रकार्य करता येते, हा या पक्षाचा संस्कार त्यांनी अंमलातही आणला. सत्ता नसलेल्या, विरोधात असणाऱ्या अन्य पक्षांना सत्तेसोबत येण्याची संधी असते, हे त्यांचे उद्धव ठाकरे यांना उद्देशून केलेले विधान शंभर टक्के सत्यच आहे. पण भाजपामध्ये तसे राजकारण करणारा नेता अभावानेच आढळतो. उलट, सत्तेशी जवळीक साधण्यासाठी कोणत्याही वैचारिक तडजोडी करण्यास अनेक नेते मागेपुढे पाहात नाहीत, अशीही अनेक उदाहरणे असून खुद्द ठाकरे यांच्या राजकारणातही याचेच प्रतिबिंब दिसते. कदाचित हे ओळखूनच देवेंद्र फडणवीस यांनी ठाकरेंनाच सत्तेसोबत येण्याचे आमंत्रण दिले असावे. फडणवीस यांच्या या वक्तव्याची अनेक उलटसुलट अंगांनी चर्चा होईल. ठाकरे यांनी केलेल्या विश्वासघाताच्या राजकारणाचा विसर पडला का, असा प्रश्नही अनेकांस पडू शकेल, पण भूतकाळावर पांघरूण घालून भविष्यकाळाला वळण देण्याची ही कथित खेळीमेळीची खेळी अनेकांना बुचकळ्यात पाडणारी ठरेल, हे मात्र खरे आहे. फडणवीस यांनी टोलविलेल्या या चेंडूवर खेळायचे की तो सोडून द्यायचा, हे ठरविण्यासाठी राजकीय अनुभव पणाला लावावा लागेल, हे मात्र खरे.

## प्रासंगिक

# कट्टरपंथीयाचे वाढते बळ हा धोका

**प्रा. जयसिंग यादव**

आरक्षणाच्या आंदोलनानंतर हसीना शेख यांचे सरकार उलथवून टाकल्यानंतर हंगामी सरकारचे प्रमुख डॉ. युनूस यांनी सहा महिन्यांमध्ये निवडणूक घेण्याचे आश्वासन दिले होते. आता एक वर्ष झाले, तरी निवडणुका झालेल्या नाहीत. युनूस यांच्या हाती बांगलादेशचा कारभार सोपवणारेच आता त्यांच्यावर नाराज झाले आहेत. 'आधी सुधारणा, नंतर निवडणुका' असा युनूस यांचा प्रयत्न होता; परंतु विरोधी पक्षांनीच आता त्यांच्यावर दबाव आणायला सुरुवात केली आहे. बांगलादेशवर १६ वर्षे सत्ता राखणाऱ्या अवामी लीगच्या नेत्या हसीना बांगलादेशमध्ये परतू शकत नाहीत. एका आदेशाद्वारे १४०० आंदोलकांची हत्या केल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. त्यांना त्यासाठी दोषी धरले असून, फाशीची शिक्षाही सुनावली जाण्याची शक्यता आहे. बांगलादेशची न्यायव्यवस्था आता कट्टरपंथीयांच्या हाती आहे. तिथले सरकार त्यांच्याच हातचे बाहुले बनले आहे. हसीना यांचा पक्ष निवडणुकीच्या रिंगणातून बाहेर फेकला गेल्यासारखी स्थिती आहे. आपल्या काळात त्यांनी पाकिस्तानशी संबंध असलेल्या कट्टरपंथीयांच्या पक्षावर बंदी घातली होती. बांगलादेशचे हंगामी सरकार आणि तिथल्या सर्वोच्च न्यायालयाने बंदी उठवल्याने त्या निवडणुकीला सामोऱ्या जाऊ शकतात. किंबहुना, तशी तयारी त्यांनी सुरू केली आहे. त्यामुळे बांगलादेशमधील वातावरण तापले आहे. देशातील सार्वत्रिक निवडणुकांसाठी सर्व राजकीय पक्षांनी तयारी सुरू केली आहे. १६ वर्षांनंतर शेख हसीना यांच्या वर्चस्वाखाली न होणाऱ्या या निवडणुकीत कोण सत्ता मिळवेल असा प्रश्न प्रत्येक जण विचारत आहे. देशातील वर्तमानपत्रांनीही यावर सर्वेक्षण सुरू केले आहे.

अशाच एका सर्वेक्षणामुळे मुख्य सल्लागार मोहम्मद युनूस यांची चिंता वाढली आहे. सर्वेक्षणात 'बांगलादेश नॅशनल पार्टी' (बीएनपी) च्या खालिदा झिया यांच्या पक्षाला सर्वाधिक मते मिळताना दिसून आली आहेत, तर युनूस यांच्या जवळच्या आंदोलकांनी स्थापन केलेल्या राष्ट्रवादी पक्षाला तिसऱ्या क्रमांकावर स्थान मिळताना दिसत आहे. 'सानेम' या वृत्तपत्राने देशातील तरुण मतदारांची मते आजमावून केलेल्या या सर्वेक्षणात 'बीएनपी'ला ३९, जमात पक्षाला २२ तर राष्ट्रवादी पक्षाला १६ टक्के मते मिळताना दिसून आली आहेत. याशिवाय, इतर धार्मिक पक्षांना ४.५९ टक्के, जातीय पक्षाला ३.७७ टक्के आणि इतर पक्षांना ०.५७ टक्के मते मिळण्याचा अंदाज आहे. सर्वेक्षणामध्ये ५० टक्के तरुण देशाच्या आर्थिक स्थिरतेबाबत समाधानी आहेत तर ३५ टक्के तरुण देशाच्या कायदा आणि सुव्यवस्थेबद्दल चिंतेत आहेत. तथापि, राजकीय बदलाच्या शक्यतांबद्दल तरुण निराश आहेत. देशात सत्ता हाती घेताना मोहम्मद युनूस यांनी सहा महिन्यांमध्ये निवडणुका घेण्याबद्दल म्हटले होते. वाढत्या दबावामुळे, युनूस यांनी निवडणुका घेण्याचा निर्णय घेतला; परंतु त्यांच्या जवळच्या सहकाऱ्यांनी स्वतःचा राजकीय पक्ष काढला. गेल्या वर्षी विद्यार्थी चळवळींचा चेहरा असलेले युनूस यांचे जवळचे सहकारी नाहिद इस्लाम यांनी राष्ट्रवादी पक्ष स्थापन केला असून निवडणुका लढवण्याची तयारी करत आहेत. त्यानंतर मानले जात होते की, राष्ट्रवादी जिंकली तर देशाची सत्ता सध्याच्या अंतरिम सरकारकडेच राहील; परंतु सर्वेक्षणात तरुणांना राष्ट्रवादी पक्ष आवडत नाही, असे दिसून आले. देशातील 'जमात-ए-इस्लामी' या कट्टरपंथी संघटनेची नोंदणी पुनर्संचयित होणे आणि तिला निवडणूक लढवण्याचा मार्ग मोकळा होणे ही भारतासाठी चिंतेची बाब आहे. बांगलादेशमधील शेख हसीना सरकारच्या बंडानंतर एकापाठोपाठ घडणाऱ्या घटना भारतासाठी सकारात्मक नाहीत. बांगलादेशचे काळजीवाहू सरकार केवळ पाकिस्तान आणि चीनशी संबंध वाढवण्यात गुंतलेले नाही, तर त्यांच्या देशात कट्टरपंथी घटकांना प्रोत्साहन देण्यातही गुंतले आहे. याचे ताजे उदाहरण म्हणजे 'जमात-ए-इस्लामी'ला निवडणूक लढवण्याची परवानगी मिळणे. ह० स्पष्ट झाले आहे की, सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीश काळजीवाहू सरकारशी सहमत होण्यास तयार आहेत. वस्तुस्थिती अशी आहे, की 'जमात-ए-इस्लामी'ने विद्यार्थ्यांच्या चळवळीला पूर्ण पाठिंबा दिला होता. ही तीच संघटना आहे, जिच्यावर बांगलादेश मुक्ती युद्धादरम्यान पाकिस्तानला मदत केल्याचा आणि मानवतेविरुद्धच्या गुन्ह्यांचा आणि नरसंहाराचा आरोप होता. या आरोपांमुळे तिच्या सहा प्रमुख नेत्यांना फाशी देण्यात आली होती. बांगलादेशचे लष्करप्रमुख अंतरिम सरकारचे प्रमुख मोहम्मद युनूस यांच्यावर लवकरच निवडणुका घेण्यासाठी दबाव आणत आहेत, यावर समाधान मानता येत नाही, कारण बांगलादेशमध्ये एकामागून एक कट्टरपंथी व जिहादी विचारसरणीच्या संघटनांवरील बंदी उठवण्यासोबतच दहशतवादी कारवायांसाठी तुरुंगात शिक्षा झालेल्यांनाही सोडून देण्यात येत आहे. यावरून स्पष्ट होते की, लष्करप्रमुखांना कट्टरपंथी घटकांनी डोके वर काढण्याबाबत कोणतीही अडचण नाही.

शेख हसीना यांनी कट्टरपंथी 'जमात-ए-इस्लामी'वर बंदी घातली होती; परंतु युनूस यांनी गेल्या वर्षी सत्ता हाती घेताच ही बंदी उठवली. शेख हसीनांविरुद्धच्या तथाकथित विद्यार्थी चळवळीत 'जमात'ने मोठी भूमिका बजावली. या संघटनेवर चळवळीतील हिंदूंना लक्ष्य करण्याचाही आरोप होता. हे आरोप दूर करण्यासाठी जमात स्वतःचे नाव बदलत आहे. यापूर्वी बांगलादेशी न्यायालयाने संघटनेचा प्रमुख नेता अझहरुल इस्लाम याला सुनावलेली शिक्षा रद्द केली. २०१४ मध्ये त्याला मृत्युदंडाची शिक्षा सुनावण्यात आली होती; परंतु युनूस सत्तेत आल्यानंतर त्याच्यावरील खटला नव्याने चालवून शिक्षा रद्द करण्यात आली. भारताचा विरोधक म्हणून 'जमात-ए-इस्लामी बांगलादेश'ची ओळख आहे. १९७१ च्या युद्धात पाकिस्तानी सैन्याने बंगालींवर अत्याचार केले असूनही या संघटनेने पाकिस्तानला पाठिंबा दिला. इतकेच नाही, तर त्यांनी पाक सैन्याला नरसंहार आणि बलात्कार करण्यात मदत केली. सत्तेत येताच शेख हसीना यांनी 'जमात'वर दहशतवादी कारवायांमध्ये सहभागी असल्याचा आरोप करत चौकशी सुरू केली. हसीना यांचे आरोप खरे ठरले आणि 'जमात'वर बंदी घालण्यात आली. आता, बांगलादेशमध्ये हसीना यांचे राज्य नसताना 'जमात'राजकारणात वर्चस्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करत आहे. या कामी त्यांना पाकिस्तानकडून पाठिंबा मिळत आहे. युनूस सत्तेत येताच पाकिस्तानशी सौहार्दपूर्ण आणि मजबूत संबंधांचा पुरस्कार करत आहेत. त्यांचीही भूमिका पाकिस्तानच्या समर्थनाची आहे. अशा परिस्थितीत युनूस आपली सत्ता वाचवण्यासाठी 'जमात'ने दाखवलेल्या मार्गाचे अनुसरण करत आहेत; जेणेकरून त्यांना 'जमात'चा पाठिंबा मिळत राहील.

(लेखक राज्यशास्त्राचे प्राध्यापक आहेत.)

## वेध

**प्रफुल्ल क. व्यास**

# विळखा ओळखा...

जग वेगाने बदलत आहे, तंत्रज्ञान गतीने प्रगत होत आहे, इंटरनेटने माहितीचे दरवाजे उघडले. मात्र, या सगळ्याच्या केंद्रस्थानी असलेली नवी पिढी हळूहळू अनेक विळख्यात अडकते आहे. हे विळखे फक्त आर्थिक किंवा सामाजिक नाहीत तर मानसिक, भावनिक, तात्त्विक, तांत्रिक, कौटुंबिक, नैतिकही आहेत. शाळा किंवा कुटुंबातून जे शिकवले जात होते, ते आणि त्यापेक्षा नको तेही समाज माध्यमातून मिळते आहे. चॅट जीटीपी तुम्हाला काय हवंय ते तुम्ही विचार करण्यापूर्वी तुमच्या पुढे वाढून ठेवते. मेंदूचे काम आता फक्त हातातील मोबाईलला जपून ठेवण्यापर्यंतच मर्यादित झाले आहे. नवीन पिढी आपसूकच नव्या विळख्यात अडकते आहे. अलिकडच्या काही वर्षांमध्ये वर्धेसारख्या शांत जिल्ह्यात गुन्हेगारी प्रवृत्तीने तोंड वर काढले आहे. सात-आठ वर्षांपूर्वी वर्धेतील प्रसिद्ध औषध विक्रेत्याच्या अल्पवयीन मुलाचा गांजा ओढण्याच्या कारणातून खून झाला होता. गेल्या दोन महिन्यात 'गांजा' आणि 'एमडी' विक्री करणाऱ्यांवर कारवाई सुरू झाली आहे. यात बऱ्याच जणांवर गुन्हे दाखल झाले, अटकही झाली. गंभीर विषय पुढे आहे- या गांजा विक्री करणाऱ्यांमध्ये अटक झालेल्यांमध्ये दोन-तीन युवक हे महाविद्यालयीन असून चोरीत अल्पवयीन मुलांचा वापर केला गेला. महाविद्यालयीन युवकांवर गांजा विक्रीची वेळ का यावी किंवा अल्पवयीन मुलांना चोरीसारख्या घटनांमध्ये सहभाग का घ्यावा वाटला, याचे चिंतन होईल तेव्हा होईल. पण, निष्कर्ष काढण्याची वेळ उंबरठ्यावर आलेली आहे. आता काही कुटुंबांनाही हा विळखा बसला आहे. तो श्रीमंतांपासून सुरू झाला. गरिबांमध्ये पोहोचला आणि आता मध्यमवर्गीयांना आवळतो आहे. समाज दुभंगला (मतलबी झाला) आणि आता विळख्याचे प्रकारही वाढू लागले आहे. आधी दारू वगैरे हेच व्यसन होते; आता हा विळखा करकचल्या जातोय. तंत्रज्ञान अपरिहार्य आहेच; पण त्याचे दुष्परिणामही नाकारता येणार नाहीत. मोबाईल आणि समाज माध्यम एक व्यसन झाले आहे. लहान वयातच मोबाईल मिळतात. संवाद, शिकणे, करमणूक, फेसबुक, इन्स्टाग्राम, रील्स, टिक-टॉक यांसारख्या माध्यमांमुळे बाह्य जगापेक्षा आभासी जगात जास्त वेळ घालवू लागले. मुलं शांत बसावी, न रडता जेवावी यासाठी त्यांच्या डोळ्यापुढे मोबाईल दिला गेला. आता तो त्यांच्या हातात आणि डोक्यात गेल्याने लहान मुलंही विळख्यात अडकू लागले आहेत. समाजमाध्यमांचे खूळ डोक्यात गेलेल्यांना लोक काय पोस्ट करतात, कसे दिसतात, किती लाईक्स मिळतात, हे महत्त्वाचे झाल्याने तोही एक विळखाच! १५ ते २५ वयोगटातील मुलांमध्ये नैराश्य वाढू लागल्याने आत्महत्येचे प्रमाण वाढते आहे. तज्ज्ञांच्या मते घरात कुटुंबामध्ये संवाद कमी झाले. दोन दिवसांपूर्वीच नागपुरातील घटना समाज व्यवस्थेच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालणारी आहे. घरात सासू नकोच या शब्दावर सून बाहेर निघाली आणि सासू कायमची घराच्या बाहेर निघाल्यानंतरच ती घरात पोहोचली. हा अजून नवीन विळखा समाज व्यवस्थेचा कणा मोडणारा ठरत आहे. या सर्व विळख्यात सर्वात जीवघेणा विळखा कोणता असेल तर तो शिक्षण! आपली शिक्षण पद्धती परीक्षा आणि गुणांच्या विळख्यात अडकली असल्याने विद्यार्थ्यांना त्यातून फटकताच येत नाही आणि आमची शैक्षणिक संस्था कशी दर्जेदार शिक्षण देते यातच गुरफटली म्हणजेच विळख्यात सापडलेली आहे. पालकांना अतिशय महत्त्वाकांक्षांनी विळखा घातला. त्यामुळे हव्या नको त्या शिकवण्यांवर भर दिला जातो. मुलांना स्वतःच्या आवडी, कलांचा शोध घेण्याची संधीच मिळत नाही आणि पालकही त्यांच्या मनाचा विचारही करीत नाहीत. पालक आपल्या इच्छा त्यांच्यावर थोपतात. शिकवण्या, हॉस्टेल, आदींवर प्रचंड खर्च होतो. शैक्षणिक संस्था दुकानदारी झाल्याने त्यांना पालकांच्या खिश्यांचा अंदाज येत नाही. शैक्षणिक, सामाजिक स्पर्धेतून पुढे आर्थिक विळखा आवळला जातो. विचार, भाषा, तंत्रज्ञानातील फरकामुळे संवाद कमी झाल्याने पिढ्यांमध्ये एक दरी निर्माण झाली. त्यातून दुरावा, मतभेद निर्माण होऊन विभक्त कुटुंब ही एक समस्याही समाज व्यवस्थेच्या उद्ध्वस्तकरणाला विळखाच म्हणावा लागेल. संयुक्त कुटुंबातून विभक्त आणि आता ती अणू कुटुंब तयार होऊ लागले. आता समाजात नवीन एक फंडा आलेला आहे. तो कदाचित बॉलिवूडमधून आलेला दिसतो. दोन-चार वर्षांत विवाहबंधनात असलेल्या दाम्पत्याला 'लेकुरवाळे' व्हायचे नसल्याचीही बाब गंभीर आहे. आधी 'हम दो हमारे दो' नंतर 'एक' आता तर 'मूल नकोच'चा विळखा समाजाला आवळतो आहे. कुटुंब व्यवस्थेला छेद देणारा आहे. विभक्त कुटुंब पद्धतीमुळे वडीलधाऱ्यांचा सल्ला संपला. आधाराची कोणालाच गरज राहिली नाही. जिव्हाळा पैशांमध्ये मोजला जाऊ लागला. त्यातून नैतिक विळखा वाढत चालला आहे. पालक, शिक्षक, समाज, शासन आणि युवकांनी वेळेवरच विळखा ओळखण्याची गरज आहे. कचरा जसा वाऱ्यासोबत उडतो तसेच काही लोकं ज्या दिशेला वारा वाहतो त्याच दिशेला पळताना दिसतात. प्रत्येक वाहून नेणारी नदी नसते, कधी कधी तो नालाही असतो... नदी-नाल्यातले अंतर ओळण्याची क्षमता निर्माण करा...

९८८१९०३७६५

## दखल

# शरद पवारांनी भाकरी फिरवली

**मोरेश्वर बडगे**

शरद पवारांनी आपल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात अखेर भाकरी फिरवली आहे. राष्ट्रवादीचे प्रदेश अध्यक्ष जयंत पाटील यांच्या जागी विधानपरिषदेचे आमदार शशिकांत शिंदे यांची नियुक्ती केली आहे. तसं पाहिलं तर हे अपेक्षितच होतं आणि आवश्यकही होतं. गेली सात वर्षे जयंत पाटील पक्ष सांभाळत आहेत. अलिकडच्या लोकसभा निवडणुकीत त्यांच्या राष्ट्रवादीने आठ जागा जिंकल्या होत्या. मात्र विधानसभेत त्यांना अवघ्या दहा जागांवर समाधान मानावे लागले होते. जयंत पाटील पवारांचे खास विश्वासू असले, तरी अलिकडे पक्षातल्या तरुण रक्ताकडून त्यांना त्रास सुरू झाला होता. 'जयंत पाटील भाजपाला अंगावर घेत नाहीत, गुडीगुडी करतात' असे सांगत रोहित पवारांचा त्यांच्याशी सुप्त संघर्ष सुरू होता. पाटीलही वैतागले असणार. 'मला मोकळं करा' असं जयंत पाटलांनी शरद पवारांना मागेच पक्षाच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात म्हटलं होतं. पण हे एवढं सोपं नव्हतं. पाटील नाहीत तर मग कोण? रोहित पवार, जितेंद्र आव्हाड आणि राजेश टोपे यांच्या नावाची चर्चा होती. आमदार रोहित पवार हा सध्या राष्ट्रवादीतला आक्रमक चेहरा आहे. मात्र, ते शरद पवारांच्या नात्यात येतात. कन्या सुप्रिया सुळे खासदार असताना घरातल्याच आणखी एकाला मोठं करणं शरद पवारांना परवडणारं नव्हतं. आमदार जितेंद्र आव्हाड यांना पुढे आणता आलं असतं. पण तेही आक्रमक स्वभावाचे आणि बोलायला फटकळ आहेत. शिवाय ओबीसी आहेत. मराठा आरक्षणाचा मुद्दा तापला असताना आव्हाड यांचे नाव मागे पडते. सर्वांना सांभाळून घेईल असा एक चेहरा म्हणजे माजी मंत्री राजेश टोपे आहेत. कोरोना काळात त्यांनी केलेल्या कामाची आजही आठवण काढली जाते. मात्र, टोपे मराठवाड्यातून येतात. पश्चिम महाराष्ट्रात जीव असलेल्या राष्ट्रवादीचा सेनापती बाहेरून कसा द्यायचा? त्यामुळे नव्या चेहऱ्याचा शोध अखेर शशिकांत शिंदे यांच्यापाशी थांबला. नावात 'राष्ट्र' असले, तरी पश्चिम महाराष्ट्राबाहेर जाण्याची फारशी धडपड शरद पवारांनी केली नाही. निवडणूक आल्या की साखर कारखानदार, शिक्षणसम्राट अशी गब्बर माणसं पकडायची, ५-५० जागा खिशात टाकायच्या, त्या जोरावर सरकारमध्ये घुसायचे असाच शरद पवारांचा खाक्या राहिला. नरेंद्र मोदी आल्यापासून पवारांना ब्रेक लागला. हक्काची माणसं सोडून जाऊ लागली. भाकरी फिरवताना शरद पवारांना गेल्या २६ वर्षांत एवढा कधी त्रास गेला नव्हता.

६१ वर्षे वयाचे शशिकांत शिंदे सातारा जिल्ह्यातले आहेत. मराठा समाजाचे आहेत. चार वेळा माथाडी कामगारांचे नेते आहेत. पवारांनी सांगितले म्हणून त्यांनी उदयनराजे भोसले यांच्याविरुद्ध लोकसभेची निवडणूक लढवली होती. फक्त ३२ हजार मतांनी हरले होते. सध्या विधानपरिषदेत पक्षाचे





मुख्य प्रतोद आहेत. एवढा समर्पित नेता कुठून मिळणार? विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर पक्षाला गळती सुरू झाली आहे. चांगले चांगले नेते भाजपामध्ये जात आहेत. त्यामुळे शिल्लक कार्यकर्त्यांमध्ये चलबिचल आहे. अशा हवेत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका येत आहेत. ग्रामीण भागात आपली ताकद टिकवण्यासाठी शरद पवारांना या निवडणुका जिंकणे अत्यावश्यक आहे. पक्षाला पुन्हा एकदा उभारी देण्याचे आव्हान पवार आणि त्यांच्या नव्या अध्यक्षापुढे आहे. वयोमानानुसार पवार थकले आहेत. पावसात सभा करण्याचे दिवस संपले. मात्र त्यांच्यात आजही प्रचंड इच्छाशक्ती आहे. दोन वर्षांपूर्वी पुतण्याने पक्ष पळवला असताना आता खऱ्या अर्थाने त्यांच्या नेतृत्वाचा कस लागणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होईपर्यंत जयंत पाटलांनी थांबावे, अशी शरद पवारांची इच्छा होती. मग जयंत पाटलांनी घाई केली का? त्यांना कुठे जायचं आहे? जायचं झालं तरी ते जाऊ शकतील? आमदारांच्या अपात्रतेचा खटला सुप्रीम कोर्टात आहे. प्रदेशाध्यक्ष म्हणून त्यांच्याच नावाने तो आहे. त्यामुळे पाटील शरद पवारांना सोडू शकत नाहीत. तरीही त्यांच्या विषयी संशयाचं वातावरण आहे. त्यांच्यातला आणि रोहित पवार यांच्यातला सुप्त संघर्ष हे उघड गुपित आहे. पाटील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना अंगावर घेत नाहीत हा रोहितदादाचा राग आहे. पण पक्षाला गळती लागली असताना फडणवीसांना ठोकून काय मिळणार? असा पाटलांचा सवाल आहे. संघटना भक्कम झाल्याशिवाय फडणवीसांशी लढता येणार नाही, असे पाटील यांना वाटते. जुन्या आणि नव्या फळीत उघड मतभेद आहेत. तरीही ते लपवण्याची धडपड का सुरू आहे ते कळायला मार्ग नाही. जयंत पाटील यांनी केव्हाच राजीनामा दिल्याची बातमी तीन दिवसांपूर्वीच फुटली. पण कोणीही बोलायला तयार नव्हते. जितेंद्र आव्हाड यांच्यापासून तो थेट सुप्रिया सुळे यांच्यापर्यंत साऱ्यांनी कानावर हात ठेवले होते. निरोप समारंभात सारे डोळ्यात पाणी आणून बोलले खरे. मात्र सारेच पाटलांना कंटाळले होते हे लपून राहिले नव्हते. तब्बल सात वर्षांपासून नेते-कार्यकर्ते जयंत पाटलांना झेलत आहेत. किती झेलणार? शरद पवारांचे चांगले दिवस होते तोपर्यंत खपून गेले. आता मोदी आणि फडणवीस यांच्या युगात पदोपदी संघर्ष आहे. त्यात ठोस असं काही हाती लागत नसल्याने साऱ्यांचीच चिडचिड वाढणे स्वाभाविक आहे. 'अध्यक्षपद सोडले तरी पक्ष सोडणार नाही' असे जयंत पाटील यांनी जाहीर केले आहे. मात्र सध्याच्या राजकारणात कोण कधी आणि कुठे जाईल हे कोणीच सांगू शकत नाही. जयंत पाटील हे शरद पवारांचे निष्ठावंत. पण काय मिळालं? साधं उपमुख्यमंत्रिपदही मिळालं नाही. अजित पवारांना ते सिनिअर आहेत. पण काका घरात पुतण्यालाच झुकते माप देत गेले. पहाटेचा शपथविधी मोडल्यानंतर महाविकास आघाडीचा प्रयोग झाला. त्या सरकारमध्ये आपल्याला उपमुख्यमंत्री केले जाईल, अशी जयंत पाटलांना आशा होती. तसं काही झालं नाही. उलट बंड करून आलेल्या पुतण्याला उपमुख्यमंत्रिपद देण्यात आले. आघाडीचे सरकार अडीच वर्षांत कोसळले. त्या नंतरच्या घडामोडीत तरी आपल्याला विधानसभेतले विरोधी पक्षनेतेपद मिळेल, असा जबरदस्त विश्वास पाटलांना होता. तिथेही त्यांना धक्का बसला. तरीही त्यांनी शरद पवारांना का धरून ठेवले हे कोडं आहे.

जयंत पाटील हे दिवंगत नेते राजारामबापू यांचे सुपुत्र. विदेशात इंजिनीअरिंगचे शिक्षण घेत असताना वडिलांचे निधन झाल्याने जयंतराव सारे सोडून मायदेशी परतले. पुढे राजकारणात शिरले. जयंत पाटलांचे विशेष म्हणजे त्यांनी कधी टोकाचे राजकारण केले नाही. सुसंस्कृत पण मिश्कील स्वभाव. 'सीएम मटेरियल' असलेला हा नेता चुकीच्या पक्षात खपला. अलिकडे फडणवीस यांच्याशी त्यांची जवळीक वाढल्याचे बोलले जाते. फडणवीस यांच्या मंत्रिमंडळात फक्त एक जागा रिकामी आहे. ती खास जयंत पाटील यांच्यासाठी फडणवीसांनी राखून ठेवल्याचे बोलले जाते. पाटील भाजपासोबत येऊ शकतात. तसेही राष्ट्रवादीत राहण्यालायक आता उरले आहे तरी काय? राजकारणात काहीही होऊ शकते. या महिन्यात देशाच्या पातळीवर राजकीय मोठ्या उलथापालथी होणार आहेत. शरद पवार उद्या 'एनडीए'सोबत आले तर आश्चर्याचा धक्का बसू नये. आणखी चार वर्षे मोठ्या निवडणुका नाहीत. पण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आहेत. म्हणजे ग्रामीण भागांच्या निवडणुका आहेत. या निवडणुका पक्षीय पातळीवर लढवल्या जात नाहीत. वातावरण निर्मिती महत्त्वाची असते. या पृष्ठभूमीवर नव्या टीमला सोबत घेऊन लोकांपुढे जाण्याचा शरद पवारांचा प्रयोग यशस्वी होईल?

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## वाचक पत्रे

### घुसखोरांना हाकललेच पाहिजे

राष्ट्रीय निवडणूक आयोग आता देशभरातील मतदारांची तपासणी करून मतदारयाद्यांची पडताळणी करणार असल्याची बातमी वाचण्यात आली. निवडणूक आयोगाने घेतलेला हा निर्णय अत्यंत स्वागतार्ह आहे. गेल्या अनेक वर्षांपासून भारतातील विविध राज्यांमध्ये बेकायदेशीर घुसखोरी प्रचंड वाढल्याचा आरोप सातत्याने केला जात आहे. बांगलादेशी, पाकिस्तानी, रोहिंग्या आणि इतर अनेक देशांतील घुसखोर भारतात कित्येक वर्षांपासून वास्तव्यास आहेत. इतकेच नव्हे तर भारत सरकारच्या विविध योजनांचा लाभ सुद्धा घेत आहेत. काही शहरांमधून तर त्यांनी आपापले क्षेत्र निर्माण केले आहे आणि घुसखोरांच्या वस्त्या बनवल्या आहेत. स्थानिकांवर दादागिरी करून दहशत निर्माण करणे आणि आपापले साम्राज्य प्रस्थापित करून गुन्हेगारी करणे हाच त्यांच्या उपजीविकेचा मार्ग झाला आहे. बेकायदेशीर धंदे करतानाच अनेक गुन्हेगारी, देशविरोधी कृत्यांमध्येही त्यांचा समावेश असल्याचे दिसून आले आहे. आपला भारत देश म्हणजे जागतिक निर्वासितांसाठी धर्मशाळा झाली आहे. आओ-जाओ घर तुम्हारा अशी भारताची अवस्था झाली आहे. घराचा उपभोग भाडोत्र्याने घ्यावा आणि घरमालकाने रस्त्यावरून जाताना हे आपले घर आहे, असा पोकळ बडेजाव मारावा, तशी भारतीयांची अवस्था झाली आहे. यावर कठोर उपाय करणे अत्यावश्यक आहे. बेकायदेशीर वास्तव्य करणाऱ्या घुसखोरांना शोधून त्यांच्या देशात परत पाठवणे, याला सर्वोच्च प्राधान्य देणे आवश्यक आहे. केंद्र सरकारने याची गंभीर दखल घेऊन पावले उचलली पाहिजेत.


**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

### लोकप्रतिनिधींवर मतदारांचा अंकुश असणे गरजेचे

सध्या बरेच लोकप्रतिनिधी कायदा हातात घेणे, जनतेला मारहाण करणे, विधानसभा आणि विधान परिषदेत एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करीत राहणे इ . नेहमी करीत असतात. यातच बराच वेळ फुकट जातो. त्यामुळे विकासाची कामे होत नाहीत. आपण जर चांगले वागलो नाही तसेच लोकोपयोगी विकासाची कामे केली नाहीत तर मतदार आपल्याला पुढील निवडणुकीत निवडून देणार नाहीत असे लोकप्रतिनिधींना वाटले पाहिजे. परंतु तसे होत नाही म्हणजे याला मतदारच जबाबदार आहेत. लोकप्रतिनिधींना आपण काहीही केले तरी मतदार आपल्यालाच निवडून देणार असे वाटत असते. आणि तसे होते देखील. त्यामुळे मतदारांचा लोकप्रतिनिधींवर वचक राहिलेली नाही. अजून देखील देशात लोकशाहीचा प्रयोगच सुरू आहे. अमर्याद संपत्ती असलेल्यांची येथून पुढे होणाऱ्या कोणत्याही निवडणुकीत मतदार निवडच करणार नाहीत. हेच योग्य राहील. तसेच लोकप्रतिनिधींना परत बोलावण्याची तरतूद कायद्यामध्ये असणे गरजेचे आहे. असे केल्यासच मतदारांचा लोकप्रतिनिधींवर अंकुश राहील.

**अॅड. बळवंत रानडे**/९८८१४७३५८०

### इजा बिजा तिजा!



उबाठा सेना आणि मनसे यांच्यात युती व्हावी म्हणून संजय राऊत हे फारच उतावीळ झाले आहेत! २०१९ मध्ये उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रिपदाच्या लालसेने हिंदुत्वप्रेमी मतदारांशी गद्दारी केली आणि त्यांनी व आदित्य ठाकरे यांनी १०, जनपथला जाऊन लोटांगण घालून हिंदुत्वाला सोडचिठ्ठी दिली. मराठी अस्मिता गुंडाळून ठेवली. तेव्हापासून तत्कालीन शिवसेनेच्या हिंदुत्वप्रेमी मतदारांत चलबिचल होतीच. त्या वेळी मृतवत् झालेल्या मूळ शिवसेनेचे, एकनाथ शिंदे यांनी बंड करून पुनरुज्जीवन केले. तत्कालीन शिवसेनेचे प्रवक्ते असलेले संजय राऊत यांच्या तोंडाळपणामुळे त्या बंडास हातभारच लागला होता! खरे तर ते तत्कालीन शिवसेनेचेच प्रवक्ते असताना महाविकास आघाडीचे प्रवक्ते असल्याच्या थाटात बोलत होते आणि घटक पक्षांना अडचणीत आणत होते. त्यामुळे नंतर अजित पवार यांनी जे बंड केले त्याचेही काही श्रेय राऊतांच्या तोंडाळपणाला आहे! (दरम्यान काँग्रेस पक्षालाही त्यांचा उपद्रव असह्य झाल्याने नाना पटोले यांनीही तुम्ही चोंबडेपणा करू नका असे राऊतांना जाहीरपणे सुनावले होते!) तेव्हा राऊत यांनी शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस फुटण्यासंदर्भात इजा आणि बिजा केल्यावर आता मनसेच्या बाबतीत तिजा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. कारण संजय राऊत ही एक पनवती आहे, जाईल तिथे वाटोळेच करणार!

**अविनाश वाघ**/९३२२९९६२४३

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अॅड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स अॅप क्रमांकावर पाठवावा.

# सरसंघचालक मोहन भागवत यांच्या दौऱ्यावेळी संभाजी ब्रिगेडचे अनेक कार्यकर्ते पोलिसांच्या ताब्यात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ जुलै-**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत हे गुरुवारी सोलापूर दौऱ्यावर आले होते. त्यावेळी पोलिसांनी संभाजी ब्रिगेडच्या अनेक कार्यकर्त्यांना ताब्यात घेऊन पोलिस ठाण्यात बसविले होते. भागवत हे सोलापूरमधून बाहेर गेल्यानंतर या कार्यकर्त्यांना सोडून देण्यात आले.

अक्कलकोट येथे संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रविण गायकवाड यांच्यावर शिवधर्म फाऊंडेशनच्या कार्यकर्त्यांनी शाई फेकून त्यांना जबर धक्काबुक्की केली होती. याप्रकरणातील मुख्य आरोपी दिपक काटे हा सराईत गुन्हेगार असून तो भाजपाशी संबंधित असल्याचे सोशल मिडीयातून आलेल्या व्हिडीओमधून दिसून आले होते. त्यामुळे त्याच्या निषेधार्थ संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी भागवत यांच्या दौऱ्यावेळी चप्पल फेकण्याचा इशारा दिला होता.

त्यामुळे सोलापूर शहर पोलिसांनी या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर भागवतांचे कार्यक्रम असलेल्या ठिकाणी चोख व कडेकोट पोलिस बंदोबस्त तैनात केला होता. गुरुवारी पहाटेपासूनच शहर पोलिसांनी संभाजी ब्रिगेडेचे सोमनाथ राऊत, श्याम कदम, महेश पवार, प्रशांत देशमुख, सोहम लोंढे, मारुती सावंत यांना ताब्यात घेऊन फौजदार चावडी पोलिस ठाण्यात नजरकैदेत ठेवले होते. भागवत हे सोलापुरातून बाहेर गेल्यानंतर या सर्वांना सोडून देण्यात आले

काही अनपेक्षित घटना घडू नये म्हणून संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांना पोलिसांनी सुरक्षेच्या कारणास्तव पोलीस ठाण्यात ताब्यात घेऊन बसवण्यात आले होते, असे पोलिसांच्यावतीने सांगण्यात आले.

## पोलीस प्रशासनाचा आणि सरकारचा निषेध !...

मोहन भागवत यांच्याबद्दल आंदोलनाची घोषणा केल्याने आज पहाटे ४ वाजल्यापासून पोलीस बंदोबस्त माझ्या शेतातच घरासमोर होता. प्रवीण गायकवाड यांच्याबाबत पोलीस प्रशासन आणि सरकारने एवढी तत्परता दाखवली असती तर अनुचित प्रकार घडला नसता. सकल मराठा समाज या कारवाईला घाबरत नसतो.

**- महेश पवार**

# तीन महिन्यांत ५८ कोटींची वसुली

## महापालिका मिळकत कर संकलन विभागाची विक्रमी वसुली

## उद्दिष्टापेक्षा जास्त वसूल करण्याची कर विभागाची कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ जुलै-**

अचूक नियोजनाच्या जोरावर महानगरपालिकेच्या मिळकतकर विभागाने अवघ्या तीन महिन्यात ५७.७८ कोटींची वसुली केली आहे. विशेष म्हणजे उद्दिष्टापेक्षा जास्त वसुली करण्याची किमया कर विभागाने साधली आहे. महानगरपालिकेच्या मिळकतकर विभागाने सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या पहिल्या तीन महिन्यांत ५७ कोटी ७८ लाख ३४ हजार ४५४ रुपयांची विक्रमी वसुली करून महापालिकेच्या उत्पन्नात लक्षणीय वाढ केली आहे.

महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी विभागाला दिलेले तीन महिन्यात ४८ कोटींचे उद्दिष्ट ओलांडत ही उल्लेखनीय कामगिरी केली आहे. मिळकतकराच्या रूपाने महापालिकेला मोठा महसूल प्राप्त होतो. त्यामुळे महानगरपालिका प्रशासनाने मिळकतकर वसुलीवर विशेष लक्ष केंद्रित केले होते.

वसुली मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी महापालिका आयुक्त डॉ. ओम्बासे यांच्या आदेशानुसार उपायुक्त आशिष लोकरे मार्गदर्शनाखाली योजनाबद्ध प्रयत्न करण्यात आले. कर वसुली कार्यवाहीस गती देताना क्षेत्रीय पातळीवर कर निर्धारण, थकबाकीदारांना नोटीस बजावणे, डिजिटल माध्यमांचा वापर करून आठवणीनिर्देश पाठवणे व थेट संवाद साधणे या विविध माध्यमांचा प्रभावी वापर करण्यात आला. महानगरपालिका आगामी काळात अधिकाधिक नागरिकांना कर भरण्यास प्रवृत्त करण्यासाठी जनजागृती मोहिम राबविणार असून, थकीत कर वसुली, नव्या मालमत्तांची नोंदणी व कर निर्धारण प्रक्रियाही अधिक गतिमान करण्यात येणार आहे.

### आयुक्तांनी केले उपायुक्त लोकरे व टीमचे अभिनंदन



मिळकत कर वसुली मोहिमेसंदर्भातील यशस्वी अंमलबजावणीत उपायुक्त आशिष लोकरे यांच्या नेतृत्वाखाली मिळकतकर विभागाने अत्यंत शिस्तबद्ध, समर्पित व योजनाबद्ध पद्धतीने कार्य केले. याकामी विभागप्रमुख युवराज गाडेकर, कर निरीक्षक, कार्यालयीन कर्मचारी, संगणक प्रणालीसंबंधित कर्मचारी यांचे योगदान लाभले. आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी या कामगिरीचे कौतुक करताना सांगितले की, मालमत्ता कर वसुलीतील ही आकडेवारी महापालिकेसाठी प्रेरणादायी ठरेल. ही वसुली केवळ आर्थिकदृष्ट्या नव्हे तर कार्यपद्धतीच्या दृष्टीनेही एक मैलाचा दगड आहे. हीच ऊर्जा पुढील महिन्यांमध्येही टिकवून ठेवणे आवश्यक आहे.

## जाहीर प्रसिध्दीकरण

नि. नं. २०
रे.मु.नं. ९२/२०१९

### सोलापूर येथील मे. सिव्हील जज्ञ, सिनिअर डिव्हीजन सो. यांचे कोर्टात

**द, मुस्लीम व मागासवर्गीय सहकारी गृह निर्माण संस्था,** -- वादी
**विरुध्द**
**मनोज अर्जुन शिंदे** --प्रतिवादी
वय : ४५ वर्षे, धंदा : नोकरी
रा. विनायक नगर, एम.आय.डी.सी.
अक्कलकोट रोड, सोलापूर

ज्याअर्थी वादी यांनी प्रतिवादी नं. १ यांचे विरुध्द खरेदीखत रद्दबातल होवून मिळणेसाठी दावा दाखल केलेले असून याकामी यातील प्रतिवादी नं. १ यांना दाव्यात नमुद पत्यावर नोटीस/समन्स पाठविले असता सदर **सदर विनायक नगर भाग** हा मोठा असुन घर असल्याशिवाय प्रतिवादी मिळून येत नाही असा बेलीफ रिपोर्ट सादर केला आहे.

तरी यातील प्रतिवादी नं. १ यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर दाव्याचे कामी आपले कैफियत/म्हणणे असल्यास आपण स्वतः किंवा आपल्या वकीलांमार्फत ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांचे आंत किंवा नेमलेली ता. २९/०७/२०२५ रोजी हजर रहावे, तसे न झाल्यास प्रतिवादी नं. १ यांचे विरुध्द एकतर्फी निकाल देण्यांत येईल. याची प्रतिवादी नं. १ यांनी नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस न्यायालयाच्या सही शिक्यानिशी दिली. तारीख : १७/७/२०२५

**सही/-** **लिपिक**

**सही/-**
**सहा. अधिक्षक,**
**सि.ज.सि.डि. सोलापूर**

## IDFC FIRST Bank Limited

(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited)
CIN : L65110TN2014PLC097792
Registered Office: - KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai-600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

IDFC FIRST Bank

### आर्थिक मालमत्तेचे सुरक्षाकरण आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा हितसंबंध कायदा, 2002 च्या कलम 13 (2) अंतर्गत सूचना

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, त्यांचे कर्ज आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) यांना देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि त्यांच्या संबंधित तारखांपासून कराराच्या दरानुसार आकारले जाईल.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम 13 (2) सूचना दिनांक | कलम १३ (2) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 126715171 | मालमत्तेवर कर्ज | 1. निलम संजय प्रेमगळ<br>2. संजय केशव प्रेमगळ | 30/06/2025 | INR 8,51,831.66/- |

**मालमत्तेचा पत्ता :** ग्रामपंचायत मिळकत क्रमांक 312 चा संपूर्ण तुकडा आणि पार्सल, एकूण जमीन क्षेत्रफळ 2062 चौ.फूट, दगड, विटा आणि काँक्रीटने बांधलेले निवासी घर, क्षेत्रफळ भूमजला: 1000.00 चौ.फूट, एकूण बांधलेले क्षेत्रफळ = 1000.00 चौ.फूट, उंबरगाव गावात स्थित, तालुका : पंढरपूर, जिल्हा: सोलापूर, महाराष्ट्र-413317, आणि **सीमा :- पूर्व** - चांगदेव सूर्यगण, **पश्चिम** - उत्तम पवार, **उत्तर** - रस्ता, **दक्षिण** - प्रभु साळुंखे

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2 | 128570792 | मालमत्तेवर कर्ज | 1. सुशांत पांडुरंग वाघमारे<br>2. काजल सुशांत वाघमारे | 18/06/2025 | INR 8,37,417.67/- |

**मालमत्तेचा पत्ता:** निवासी घर असलेले ग्रामपंचायत मिळकत क्रमांक 185, दगड, विटा आणि काँक्रीटने बांधलेले, भूभाग तळमजला 1064.00 चौ. फूट असलेले एकूण बांधलेले क्षेत्रफळ = 1064.00 चौ. फूट, एकूण जमीन क्षेत्रफळ 1464 चौ. फूट. ग्रामपंचायतीच्या हद्दीत स्थित: गायगव्हाण, उपविभाग: सांगोला, विभाग: सोलापूर, महाराष्ट्र-413306, आणि **सीमा :- पूर्वेला** - अमोल सुभाष नागटिळक, **पश्चिम** - रस्ता, **उत्तर** - गणेश भीमराव देवकाते **दक्षिण** - योगेश दादासो देवकते

या प्रकाशनाच्या तारखेपासून 60 दिवसांच्या आत तुम्हाला वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) कडे रक्कम त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम 13 (4) आणि कलम 14 अंतर्गत, आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) देय रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यास अधीन असेल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम 13 (13) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

**सही/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये एकत्र केलेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँकलिमिटेड म्हणून ओळखले जाते)**

**दिनांक : १८/०७/२०२५**
**ठिकाण : सोलापूर, महाराष्ट्र**

# विवेकानंद केंद्रातर्फे आजपासून तणाव मुक्तीसाठी योगाभ्यास

**सोलापूर, दि. १७ जुलै-**

विवेकानंद केंद्र कन्याकुमारी शाखेच्या वतीने १८ ते २७ जुलैपर्यंत सकाळी ६ ते ७.३० वा. 'तणाव मुक्तीसाठी योगाभ्यास' या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. मानसिक ताण-तणावामुळेच मधुमेह, रक्तदाब, हृदयविकार, पचन संस्थेच्या समस्या असे अनेक विकार जडतात. या ताणतणावातून मुक्ती मिळवण्यासाठी, त्यांच्यावर परिणाम कारक असलेले आसने व प्राणायाम या शिबिरात शिकवण्यात येणार आहेत. वर्षातून एकदाच हे शिबीर आयोजित करण्यात येते. नोंदणी आणि अधिक माहितीसाठी संपर्क ओंकार औरसंग ९१६८४६०५९१, देवीदास विडप: ९४२०४९२२०६ यांच्याशी संपर्क साधावा.

## सद्गुरू ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या, मोहोळ ता. मोहोळ, जि. सोलापूर

### स्थावर मालमत्तेचा दुसरा फेर जाहीर लिलाव

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील नियम १०७ मधील तरतुदीनुसार सद्गुरू ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., मोहोळ ता. मोहोळ जि.सोलापूर या पतसंस्थेच्या ज्या थाकबाकीदार कर्जदार व जमीनदार यांचेविरुद्ध कलम १०१ अनुसार वसुली दाखले प्राप्त झालेले होते अशा कर्जदार/जमीनदारांच्या जप्त केलेल्या खालील वर्णनाच्या स्थावर मालमत्तेचा दुसरा फेर जाहीर लिलाव संस्थेच्या कार्यालयात शुक्रवार दिनांक २५.०७.२०२५ रोजी दुपारी १ वाजता ठेवण्यात आलेला आहे. तरी इच्छुक व्यक्ती व संस्था यांनी सदर लिलावात भाग घ्यावा.

| अ.नं. | कर्जदार/जमीनदार यांचे नाव व पत्ता | जप्त केलेल्या स्थावर मालमत्तेचे वर्णन गाव, गट नं. व क्षेत्र (हे.आर.) | कर्जदाराकडील येणे बाकी (मुद्दल,व्याज व इतर) | राखीव किंमत |
|---|---|---|---|---|
| १. | श्री.अनिल जनार्दन गोरे<br>रा. औंढी - कर्जदार | औंढी ता. मोहोळ येथील गट नं.२०५/१ क्षेत्र १.९२ हे. आर. | ७,१६,४२९/- | २९,८०,०००/- |
| | श्रीमती. मनीषा रामचंद्र कोकाटे<br>रा.तांबोळे - कर्जदार | तांबोळे येथील गट नं. ७७ क्षेत्र ०.७९ हे. आर. | १३,०२,७२५/- | ६,००,०००/- |

टीप : लिलावाच्या अटी व शर्ती संस्थेच्या कार्यालयात पाहावयास मिळतील.
ठिकाण : मोहोळ
दिनांक : १७.०७.२०२५

शिक्का

**सही/-**
**(नितीन रोहिदास जाधव)**
**विशेष विक्री व वसूली अधिकारी**
**सदगुरू ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था म. मोहोळ**

# लवाद न्यायाधिकरण

(लवाद अधिकारी - ॲड. अजित एम. देशमुख, एम. ए. मराठी, एम. ए (एम.सी.जे). एम कॉम. एल.एल.बी)
एकल लवाद न्यायालय.
लोकमंगल मल्टिस्टेट को-ऑप. सोसायटी लि. सोलापूर
प्लॉट नं. ९४/६६, मित्र नगर, रब्बी रिसर्च सेंटरचे मागे, शेळगी, सोलापूर-४१३००६

## जाहिर प्रगटन जिल्हा - सोलापूर

या जाहिर नोटीसीने खाली दिलेल्या सामनेवाले यांना कळविण्यात येते की, दावेदार लोकमंगल मल्टीस्टेट को-ऑप. सोसायटी लि. सोलापूर या संस्थेने खाली नमुद कर्जदार, जामीनदारां विरुध्द थकीत कर्जाची रक्कम वसुली अवॉर्ड मिळणेकामी लवाद न्यायालयाकडे दावे दाखल केले असून, कर्जदार जामीनदार यांनी दिलेल्या अधिकृत, नोंद पत्यावर लवाद न्यायालयाकडून पाठविलेल्या (आर.पी.ए.डी.ने) लवाद दाव्याचे नोटीसा रजिस्टर पोस्टाने न बजावता परत आले आहे.

न्यायाच्या दृष्टीने संबंधित कर्जदार व जामिनदारांना योग्य संधी देऊन न्याय निवाडा करणेकामी ही जाहिर नोटिस प्रसिध्दीस दिली आहे. खालील नमूद सामनेवाले यांनी पुढील निर्देषित तारखेपूर्वी दि. ३०/०७/२०२५ रोजी अथवा तारखेस वर नमूद पत्यावर लवाद न्यायालयासमोर उपस्थित राहून लेखी म्हणणे न मांडल्यास एकतर्फी न्यायनिवडा करण्याचे सुचित करत आहे.

| अ. क्र. | लवाद दावा क्र. व दिनांक | नाव | | शाखा | पत्ता | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | लवाद दावा क्र. १९४/२०२१ ३०/०७/२०२५ | आशुतोष उमेश साठे | कर्जदार | शेळगी | रा. मु.पो. वडाळा, उत्तर सोलापूर, जि. सोलापूर - ४१३२२२ | ६,६२,३८२/- |
| | | सचिन किसन पाटील | जामिनदार | | रा. मु.पो. वडाळा, उत्तर सोलापूर, जि, सोलापूर - ४१३२२२ | |
| | | संतोष मधुकर साठे (मयत) संगिता संतोष साठे | जामिनदार | | रा. मु.पो. वडाळा, उत्तर सोलापूर, जि. सोलापूर - ४१२३२२२ | |
| २ | लवाद दावा क्र. ०१/२०२३ ३०/०७/२०२५ | मनोहर शंकर बेंद्रिकर | कर्जदार | देगलुर विलिनीकरण उदगीर | रा. मु.पो. बेंद्री, ता. नायगांव, जि. नांदेड - ४३१७०९ | ५,२५,८८२/- |
| | | शिवसाम मनोहर बेंद्रिकर | जामिनदार | | रा. मु.पो. बेंद्री, ता. नायगांव, जि. नांदेड ४३१७०९ | |
| | | माधव मनोहर बेंद्रिकर | जामिनदार | | रा. मु.पो. बेंद्री, ता. नायगांव, जि. नांदेड ४३१७०९ | |
| | | गोकुळ माऊली शुगर्स लि. तर्फे कार्यकारी संचालक व्ही. पी. शुगर्स लि. | जामिनदार | | रा. सिध्दा कस्तुरी चेंबर्स, पहिला मजला, मंत्री चंडक विहार, इसार पेट्रोल पंप पाठीमागे, आसरा चौक, होटगी रोड, जि. सोलापूर - ४१३२२४ | |
| ३ | लवाद दावा क्र. ०३/२०२३ ३०/०७/२०२५ | लक्ष्मण विठ्ठल मावले | कर्जदार | नांदेड विलिनीकरण मुदखेड | रा. मु.पो. साठे नगर, मांजराम, ता. नायगांव, जि. नांदेड - ४३१७२२ | १,८८,७४४/- |
| | | हरी किशन सांळुखे | जामिनदार | | रा. मु.पो. मांजराम, ता, नायगांव, जि. नांदेड - ४३१७२२ | |
| | | बालाजी लालु मेंटकर | जामिनदार | | रा. मु.पो. मांजराम, ता. नायगांव, जि. नांदेड - ४३१७२२ | |
| | | गोकुळ माऊली शुगर्स लि. तर्फे कार्यकारी संचालक व्ही. पी. शुगर्स लि. | जामिनदार | | रा. सिध्दा कस्तुरी चेंबर्स, पहिला मजला, मंत्री चंडक विहार, इसार पेट्रोल पंप पाठीमागे, आसरा चौक, होटगी रोड, जि. सोलापूर - ४१३२२४ | |
| ४ | लवाद दावा क्र. ०५/२०२३ ३०/०७/२०२५ | अहमद रजाक सय्यद | कर्जदार | देगलुर विलिनीकरण उदगीर | रा.मु.पो. टेंभुर्णी, ता. नायगांव, जि. नांदेड- ४३१७२२ | ४,१६,३०३/- |
| | | रमेश विश्वनाथ कांबळे | जामिनदार | | रा.मु.पो. सहयोग नगर, ता. नायगांव, जि. नांदेड - ४३१७२२ | |
| | | सलीम सय्यद अली सय्यद | जामिनदार | | रा.मु.पो. टेंभुर्णी, ता. नायगांव, जि. नांदेड - ४३१७२२ | |
| | | रजाक महबुबसाब सय्यद | जामिनदार | | रा.मु.पो. टेंभुर्णी, ता. नायगांव, जि. नांदेड ४३१७२२ | |
| | | गोकुळ माऊली शुगर्स लि. तर्फे कार्यकारी संचालक व्ही. पी. शुगर्स लि. | जामिनदार | | रा. सिध्दा कस्तुरी चैर्क्स, पहिला मजला, मंत्री चंडक विहार, इसार पेट्रोल पंप पाठीमागे, आसरा चौक, होटगी रोड, जि. सोलापूर - ४१३२२४ | |
| ५ | लवाद दावा क्र. ०२/२०२३ ३०/०७/२०२५ | अनिल हनुमंतराव मस्के | कर्जदार | हिंगोली विलिनीकरण कळमनुरी | रा. मु.पो. शिवणी, मोक, ता. पुसद, जि. यवतमाळ - ४४५२०४ | ३,१८,८७२/- |
| | | बबन हारजी गडदे | जामिनदार | | रा. मु.पो. खेडी, जि. हिंगोली - ४३१०१३ | |
| | | रवीचंद्र शिवाजी चव्हाण | जामिनदार | | रा. मु.पो. खेडी, जि. हिंगोली - ४३१०१३ | |
| | | गोकुळ माऊली शुगर्स लि. तर्फे कार्यकारी संचालक व्ही. पी. शुगर्स लि. | जामिनदार | | रा. सिध्दा कस्तुरी चेंबर्स, पहिला मजला, मंत्री चंडक विहार, इसार पेट्रोल पंप पाठीमागे, आसरा चौक, होटगी रोड, जि. सोलापूर - ४१३२२४ | |

येणे प्रमाणे जाहिर नोटिस प्रसिध्द केली ता. १८/०७/२०२५

**सही/-**
**लवाद अधिकारी**
**ॲड. अजित एम. देशमुख,**
**एम. ए. मराठी, एम. ए. (एम.सी.जे) एम.कॉम., एल.एल.बी.**

## जाहीर समन्स

### मोहोळ येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

**(मा. श्री. नि. प्र. बाजी साहेब)**

रे. मु.नं. ७ / २०२५
निशाण क. २४

**अरविंद सहदेव ढेरे व इतर २** --वादी
**विरुध्द**
**पांडुरंग नामदेव ढेरे वगैरे १४** -- प्रतिवादी

प्रति
प्रतिवादी क्र. ५. संदीप तुकाराम ढेरे ६. पुजा तुकाराम ढेरे
७. मंगल तुकाराम ढेरे
५ ते ७ रा. रेल्वे स्टेशन रोड, रेल्वे पोलीस स्टेशन जवळ, सोलापूर.
१२. कविता शहाजी सातपुते १४. अंजना सोमनाथ सातपुते
१२ व १४ रा. केमवाडी, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर.

ज्याअर्थी उपरोक्त वादी यांनी तुमच्याविरुध्द निरंतर ताकीदीचा दावा या न्यायालयात दाखल केलेला आहे. सदर दाव्याचे संदर्भात आपले म्हणणे मांडण्यासाठी दि. ०७/०८/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायालयात स्वतः अगर वकीलांमार्फत हजर होण्यासाठी तुम्हाला बोलावण्यात येत आहे व आपल्या बचावाच्या पुष्ट्यर्थ तुम्ही ज्यांचा आधार घेऊ इच्छिता असे सर्व दस्तऐवज त्या दिवशी रुजू करण्याचा तुम्हाला आदेश देण्यात येत आहे.

सदर समन्स प्रसिध्द होऊनही आपण गैरहजर राहील्यास तुमच्या गैरहजेरीत दाव्याची सुनावणी होऊन निर्णय दिला जाईल, याची दखल घ्यावी.

हे जाहीर समन्स आज दि. १९/०६/२०२५ रोजी माझे सहीनिशी व शिक्क्यानिशी प्रसिध्द केले असे.

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क. स्तर मोहोळ**

## जाहीर समन्स

### मोहोळ येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

**(मा. श्री. नि. प्र. बाजी साहेब)**

रे. मु.नं. २८० / २०२४
निशाण क. ३५

**भिमराव रामचंद्र ढेरे व २** --वादी
**विरुध्द**
**पांडुरंग नामदेव ढेरे वगैरे** --प्रतिवादी

प्रति
प्रतिवादी क्र. ५. संदीप तुकाराम ढेरे. ६. पुजा तुकाराम ढेरे
७. मंगल तुकाराम ढेरे
५ ते ७ रा. बाळे, ता. उत्तर सोलापूर, सोलापूर.
१२. कविता शहाजी सातपुते १४. अंजना सोमनाथ सातपुते
१२ व १४ रा. केमवाडी, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर.
१३. रंजना कृष्णा खांडेकर रा. नरखेड, ता. ता. मोहोळ, जि. सोलापूर.

ज्याअर्थी उपरोक्त वादी यांनी तुमच्याविरुध्द निरंतर ताकीदीचा दावा या न्यायालयात दाखल केलेला आहे, सदर दाव्याचे संदर्भात आपले म्हणणे मांडण्यासाठी दि. ०७/०८/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायालयात स्वतः अगर वकीलांमार्फत हजर होण्यासाठी तुम्हाला बोलावण्यात येत आहे व आपल्या बचावाच्या पुष्ट्यर्थ तुम्ही ज्यांचा आधार घेऊ इच्छिता असे सर्व दस्तऐवज त्या दिवशी रुजू करण्याचा तुम्हाला आदेश देण्यात येत आहे.

सदर समन्स प्रसिध्द होऊनही आपण गैरहजर राहील्यास तुमच्या गैरहजेरीत दाव्याची सुनावणी होऊन निर्णय दिला जाईल, याची दखल घ्यावी.

हे जाहीर समन्स आज दि. १९/०६/२०२५ रोजी माझे सहीनिशी व शिक्क्यानिशी प्रसिध्द केले असे.

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क, स्तर मोहोळ,**

जा.क्र.न.पं./८९५/२०२५
दि.१७/०७/२०२५

## वैराग नगरपंचायत वैराग

### निविदा प्रसिद्धीकरण सुचना तिसरी वेळ

१. वैराग शहरातील विविध ठिकाणातील सार्वजनिक शौचालय व मुतारी नियमित दैनंदिन साफ करणे.

## वैराग नगरपंचायत वैराग

### निविदा प्रसिद्धीकरण सुचना चौथी वेळ

१. नगरपंचायतच्या विविध कार्यक्रमासाठी तसेच इतर आवश्यक ठिकाणी फोटो काढणे, पोस्टर/बॅनर बनविणे, व्हिडओ शुटींग करणे व इतर अनुषंगिक कामे करणे.
२. विद्युत विभागाकडील विविध साहित्याचा पुरवठा करणे

## वैराग नगरपंचायत वैराग

### निविदा प्रसिद्धीकरण सुचना पाचवी वेळ

१. वैराग नगरपंचायत हद्दीतील एनिमल वेलफेअर बोर्डाच्या नियमावलीप्रमाणे मोकाट व भटकी कुत्री पकडून त्यांचे निर्बीजकरण करणे.
२. नगरपंचायत कार्यालयात बॅटरी व इन्व्हर्टर खरेदी करणे.
३. वैराग नगरपंचायत पाणीपुरवठा विभागाकडील हातपंपसाठी साहित्य पुरविणे.
४. वैराग नगरपंचायत पाणीपुरवठा विभागाकडील हातपंप दुरुस्तीसाठी मजुरी देणे.
५. वैराग नगरपंचायत करिता विविध विभागाकरिता विविध ठिकाणी CCTV बसविणे, इंटरनेट सेवा बसविणे व सेवा पुरविणे.
६. वैराग शहरातील सौंदर्य वाढविण्यासाठी विविध बोर्ड, कलाकृती, पोस्टर्स व इतर अनुशंगिक कामे करणे.
७. वैराग नगरपंचायतचे सन २०२४-२५ ते सन २०२६-२७ या तीन वर्षाच्या कालावधीतील दुहेरी लेखा नोंद पद्धतीची कामे करण्याकरिता सनदी लेखापाल (Chartered Accountant) नेमणूक करणे.
८. वैराग नगरपंचायत लेखा विभागाकडील शासकीय कराचे भरणा भरणेकामी चार्टड अकाऊंटन नेमणे.
९. वैराग शहराची हवेची गुणवत्ता तपासणी करणे
१०. वैराग शहरात विविध ठिकाणी बेंच खरेदी करणे व बसविणे
११. वैराग शहरातील हायमस्ट दिवे करिता साहित्य पुरवठा करणे व हायमस्ट दुरुस्ती करणे.

वरील विषयांकित दरपत्रक निविदेच्या अटी व सविस्तर निविदा सूचना **तसेच अटी व शर्ती नगरपंचायत कार्यालयाकडील संबंधित विभागाकडे दि. १८/०७/२०२५ ते दि. २४/०७/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहेत.**

शिक्का

**सही/-**
**(विद्या पाटील)**
**मुख्याधिकारी**
**वैराग नगरपंचायत वैराग**

## जाहिर प्रसिध्दीकरण

बी.एन. डी. अर्ज नं. ५२७/२०२४

### सोलापूर येथील मे. उपविभागीय अधिकारी सोलापूर क्र. १ यांचे कोर्टात

**भिमराव आबासाहेब गव्हाणे वगैरे ७** -- अर्जदार / वादी
**विरूध्द**
**संदीप त्रिंबक नलवडे वगैरे १७** -- सामनेवाला / प्रतिवादी

**७. प्रभू फौजा गव्हाणे वय-७० वर्षे, धंदा- शेती, रा. खडकोणी, ता. बार्शी**
**८. सोमनाथ आबासाहेब गव्हाणे, वय-५८ वर्षे, धंदा- शेती, रा. सदर**
**११. शशिकला चर्तुभुज नलवडे, वय ७० वर्षे धंदा- शेती, रा.लोणी, ता. परांडा,**
**१२. राजकुंवर अंकुश शिंदे, वय-४० वर्षे, धंदा शेती, रा. लोणी, ता. परांडा,**
**१४. रवि उर्फ विवेक विक्रम नलवडे, वय- ४० वर्षे धंदा- शेती, रा. ५४७, भारतरत्न इंदिरा नगर, राठी कारखान्यासमोर, सोलापूर ता.जि. सोलापूर**
**१५. इंगल विक्रम नलवडे, वय ४० वर्षे धंदा- शेती, रा. सदर**
**१६. पुनम ऊर्फ वाई ज्योतीराम नलवडे, वय- ३१ वर्षे धंदा- शेती, रा. सदर**
— **प्र.वादी**

यांना जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की.

ज्या अर्थी, वादी भिमराव आबासाहेब गव्हाणे वगैरे ७ यांनी संदीप त्रिंबक नलवडे वगैरे १७ यांचे विरूध्द सोलापूर येथील मे. उपविभागीय अधिकारी सोलापूर क्र. १ यांचे कोर्टात मौजे खडकोणी येथीली गट नं. १०८ मध्ये मो.र.नं. ५७५८ अन्वये अतिक्रमण केले ०० हे. ३५ आर क्षेत्राचा ताबा मिळावा म्हणून वर नमूद अर्ज दाखल केला आहे, त्यामध्ये तुम्ही प्र.वादी नं. **७. प्रभू फौजा गव्हाणे ८. सोमनाथ आबासाहेब गव्हाणे, ११. शशिकला चर्तुभुज नलवडे, १२. राजकुंवर अंकुश शिंदे, १४. रवि उर्फ विवेक विक्रम नलवडे, १५. इंगल विक्रम नलवडे, १६. पुनम ऊर्फ बाई ज्योतीराम नलवडे** म्हणून सामील असून तुम्हास अर्जातील पत्यावर समन्स पाठविले असता तुम्हास अर्जातील पत्यावर समन्स बजावणी झाली नाही, तुमचा निश्चित ठावठिकाणा मिळून येत नाही असा रिपोर्ट आलेवरून तुम्हास या जाहीर प्रसिध्दीकरण नोटीस द्वारे कळविणेत येते की, तुम्ही नियुक्त दि.२०/०८/२०२५ रोजी अथवा हे जाहीर समन्स प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याचे आत वकीलामार्फत अगर स्वतः मे. कोर्टात हजर होऊन म्हणणे मांडावे, सदर प्रमाणे तुम्ही म्हणणे न मांडलेस मे. कोर्ट तुमचे विरूध्द पुढील एकतर्फा चौकशीचा हुकूम करतील व प्रकरण निकाली करतील याची नोंद घ्यावी.

हे प्रसिध्दीकरण माझ्या आदेशाने दिले ता. १६/०७/२०२५.

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**उपविभागीय अधिकारी सोलापूर क्र. १**
**उप-विभागीय अधिकारी**
**सोलापूर क्र.१, सोलापूर**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### लामिन यामल घालणार मानाची १० क्रमांकाची जर्सी



दहा क्रमांकाच्या जर्सीसह लामिन यामल

**बार्सिलोना** : लामिन यामल बार्सिलोनाची आयकॉनिक क्रमांक १० ची जर्सी घालणार आहे, या १० क्रमांकाची जर्सी याआधी दिएगो मॅराडोना, रोनाल्डिन्हो आणि लिओनेल मेस्सी या दिग्गजांनी बार्सिलोना संघासाठी परिधान केली होती. तिघेही पूर्णतः दिग्गज आहेत व मी त्यांच्या पावलावर पाऊल ठेवण्याचा प्रयत्न करतो. मला त्यांच्यासारखे व्हायला आवडेल. मात्र मी माझा स्वतःचा मार्ग तयार करण्याचा प्रयत्न करतो, असे यामल म्हणाला. १८ वर्षांचा स्वावलंबी यमल करारानुसार २०३१ पर्यंत बार्सिलोना संघात असणार आहे. हा माझा क्लब आहे. हे माझे घर आहे, मी वयाच्या ७ व्या वर्षांपासून क्लबमध्ये आहे, असेही तो म्हणाला. यामलने १९९९ मध्ये दहा क्रमांकाची जर्सी घातली होती. लामिन यामलने बार्सिलोना क्लबचे अध्यक्ष जोन लापोर्टा यांच्याकडून १० क्रमांकाची जर्सी स्वीकारली. मी बार्सिलोनासाठी काम करतो, पण जेव्हा मी क्लबच्या प्रशिक्षण केंद्रापासून दूर असतो तेव्हा मी माझ्या जीवनाचा आनंद घेतो, असे यामाल म्हणाला. ■

### दिव्या देशमुखचा जिनेर झूवर विजय



**बातुमी** : जॉर्जियात सुरु असलेल्या फिडे जागतिक महिलांच्या बुद्धिबळ चषक स्पर्धेत उप-उपांत्यपूर्व फेरीतील पहिल्या डावात भारतीय आंतरराष्ट्रीय मास्टर नागपूरच्या दिव्या देशमुखने दुसरी मानांकित चीनच्या जिनेर झू हिच्यावर दारूण मात केली. आता दिव्याला उपांत्यपूर्व फेरी गाठण्यासाठी एक डाव बरोबरीत राखण्याची गरज आहे. चौथ्या फेरीच्या अन्य सामन्यात कोनेरू हम्पीने ॲलेक्झाड्राला, डी. हरिकाने कॅटेरिना लाग्नोला बरोबरीत रोखले.या स्पर्धेत अव्वल ठरणाऱ्या तीन खेळाडू पुढील महिलांच्या कॅण्डिडेट बुद्धिबळ स्पर्धेसाठी पात्र ठरतील.

### मॉण्ट्रियल टेनिस स्पर्धेतून आर्यना सबालेन्काची माघार

**मॉण्ट्रियल** : अव्वल क्रमांकावर असलेल्या आर्यना सबालेन्काने नॅशनल बँक मॉण्ट्रियल टेनिस ओपनमधून माघार घेतली आहे. अमेरिकन ओपन जेतेपदाच्या बचावासाठी तयारी सुरू करण्यापूर्वी तिने अतिरिक्त विश्रांती घेण्याचा पर्याय निवडला आहे. मी उत्तर अमेरिकन हार्ड-कोर्ट स्विंगला सुरुवात करण्यास उत्सुक आहे, परंतु या हंगामात यश मिळवण्याची सर्वोत्तम संधी प्राप्त करण्यासाठी मी मॉण्ट्रियलला वगळण्याचा निर्णय घेतला आहे, असे सबालेन्काने निवेदनात म्हटले आहे. सबालेन्काला अलीकडेच विम्बल्डन टेनिस स्पर्धेच्या उपांत्य फेरीतून बाहेर पडावे लागले. तिथे तिला अमाण्डा ॲनिसिमोव्हाकडून पराभव पत्करावा लागला. मॉण्ट्रियल ओपन टेनिस स्पर्धा २७ जुलैपासून सुरू होत आहे. त्याऐवजी ऑगस्टच्या सुरुवातीला सबालेन्का सिनसिनाटी ओपन स्पर्धेत सहभागी होऊ शकते. अमेरिकन ओपनची पहिली फेरी २४ ऑगस्टपासून सुरू होणार आहे. सबालेन्काने २०२४ मध्ये पहिल्यांदाच या स्पर्धेचे विजेतपद जिंकले. पॉला बडोसाने दुखापतीमुळे माघार घेतल्याचेही स्पर्धेत जाहीर करण्यात आले. मुख्य ड्रॉमध्ये सबालेन्का व बडोसा यांच्या जागी कॅटी मॅकनॅली आणि मोयुका उचिजिमा यांनी स्थान मिळवले.

### जेनी बौचार्ड निवृत्त होणार

**मॉण्ट्रियल** : २०१४ मध्ये विम्बल्डन अंतिम व इतर दोन ग्रॅण्ड स्लॅम उपांत्य फेरीत पोहोचलेली जेनी बौचार्ड टेनिसमधून निवृत्त होणार आहे. कॅनेडियन महिला टेनिसपटू या महिन्याच्या अखेरीस मॉण्ट्रियलमध्ये होणाऱ्या नॅशनल बँक ओपनमध्ये खेळेल आणि त्यानंतर तिची कारकीर्द संपेल, असे टेनिस कॅनडाने सांगितले. ३१ वर्षीय बौचार्डला तिच्या गावी होणाऱ्या स्पर्धेत वाइल्ड कार्ड दिले जाईल, असे त्यांनी सांगितले. सर्व काही जिथे सुरू झाले तिथेच संपत आहे, असे बौचार्डने आपल्या खेळण्याच्या छायाचित्रांसह समाजमाध्यमावर पोस्ट केले आहे. बौचार्ड डब्ल्यूटीए मानांकनामध्ये ५ व्या क्रमांकावर पोहोचली आणि २०१४ मध्ये तिने एकमेव एकेरी जेतेपद जिंकले. ऑस्ट्रेलियन ओपन आणि फ्रेंच ओपनमध्येही उपांत्य फेरी गाठल्यानंतर विम्बल्डनच्या अंतिम फेरीत ती पेट्रा क्विटोवाकडून पराभूत झाली. ■

# चौथ्या कसोटीसाठी एकमेव बदलाची शक्यता

## करुण नायरला मिळणार विश्रांती





भारत आणि इंग्लंड यांच्यातील चौथ्या कसोटी क्रिकेट सामन्यापूर्वी बेकनहॅममधील द कौंटी मैदानावर सराव सत्रासाठी भारताचा जसप्रीत बुमराह पोहोचला. उजवीकडील छायाचित्रात सराव सत्रादरम्यान कर्णधार शुभमन गिल व इतर खेळाडू

◆ **बेकेनहॅम, १७ जुलै**

मॅन्चेस्टर येथे इंग्लंडविरुद्ध २३ जुलैपासून होणाऱ्या चौथ्या कसोटी क्रिकेट सामन्यासाठी भारतीय संघ व्यवस्थापन एक बदल करण्याची शक्यता आहे, यात करुण नायरला विश्रांती देण्याची शक्यता आहे.

भारतीय क्रिकेटने करुण नायरला दुसरी संधी दिली आहे, पण इंग्लंड दौऱ्यात त्याने त्याचा पुरेपूर फायदा घेतला नाही आणि चौथ्या कसोटीसाठी भारताच्या अंतिम अकरा जणांची निवड झाल्यावर तोच एकमेव बदल असू शकतो.

आठ वर्षांनंतर अंतिम अकरा जणांमध्ये परतलेल्या या ३३ वर्षीय खेळाडूने आपल्या सहा डावांपैकी बहुतेक डावांमध्ये चांगली सुरुवात केली आहे, परंतु तो त्याचे रूपांतर लक्षणीयरीत्या करू शकला नाही. तो मध्यभागी चांगला दिसत होता.

लॉर्ड्सवरील दुसऱ्या डावात त्याला ब्रायडन कार्सच्या येणाऱ्या चेंडूचा अचूक वेध घेता आला नाही व तो स्वतः त्याच्या जाळ्यात अडकला. तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करताना भारताला नायरकडून ठोस कामगिरीची अपेक्षा होती. त्याने देशांतर्गत क्रिकेट स्पर्धेत धावांचा डोंगर रचल्यानंतर राष्ट्रीय संघात प्रवेश केला.

ॲण्डरसन-तेंडुलकर चषक पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेत भारत १-२ ने पिछाडीवर आहे आणि पुढचा सामना अजून एक आठवडा शिल्लक आहे, त्यामुळे व्यवस्थापनाला निर्णय घ्यावा लागणार आहे. नायरलाच खेळावे की युवा साई सुदर्शनला संधी द्यावी असे प्रश्न संघ व्यवस्थापनाच्या समोर आहे. सुदर्शनला पदार्पणाच्या सामन्यानंतर अंतिम अकरा संघातून वगळण्यात आले.

या डावखुऱ्या फलंदाजाने त्याला वगळण्यात फारसे चुकीचे केले नाही आणि आठव्या क्रमांकावर अतिरिक्त फलंदाजीचा पर्याय उपलब्ध करून देण्यासाठी हे करण्यात आले. सुमारे एक महिन्यानंतर, ओल्ड ट्रॅफर्ड येथे २३ वर्षीय सुदर्शनला संधी देणे हा अकरा संघातील एकमेव बदल असू शकतो, कारण भारत २३ जुलैपासून सुरू होणाऱ्या सामन्यात मालिका बरोबरीत आणण्याचा प्रयत्न करत आहे.

भारताचा माजी यष्टिरक्षक दीप दासगुप्ता, जो मालिकेवर भाष्य करत आहे, तो म्हणतो की, सुदर्शनला परत आणण्याची वेळ आली आहे. तो नायरपेक्षा चार वर्षांनी इंग्लंडला परतण्याची शक्यता जास्त आहे.

तुम्ही अजूनही मालिकेत खूप सहभागी आहात, कारण लॉर्ड्सवरील हा कसोटी सामनाही अत्यंत अटीतटीचा होता. तो सामना दोन्ही संघांच्या बाजूंनी वळविला जाऊ शकला असता, असे तो म्हणाला.

करुण नायर अजूनही खेळत राहील का की, तुम्हाला साई सुदर्शनसारख्या तरुण खेळाडूमध्ये गुंतवणूक करायची आहे जो पहिल्या कसोटी सामन्यातील शेवटच्या डावात आरामदायी दिसत होता? तो तरुण आहे आणि भविष्यासाठी गुंतवणूक आहे, असे तो म्हणाला.

करुण नायरला संधी मिळाल्या आहेत असे मला वाटते. हे संधींबद्दल नाही. तो पॅचेसमध्ये आरामदायी दिसतो, पण काही प्रश्न अजूनही अनुत्तरित आहेत. आणि यामुळेच मला वेगळे विचार करायला भाग पडतो, असे तो म्हणाला.

दासगुप्ता तिसऱ्या क्रमांकाच्या फलंदाजाकडून स्थिरतेची अपेक्षा करतात. जेव्हा सुदर्शन लीड्समध्ये खेळत होता, तेव्हा नायर सहाव्या क्रमांकावर फलंदाजी करत होता.

तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करणाऱ्या व्यक्तीला, तुम्हाला ती दृढता जाणवायला हवी. नायरमध्ये ती कधीकधी मला जाणवत नाही, असे दासगुप्ता म्हणाला.

शुभमन गिलच्या संघाचे खेळाडू तीव्र स्पर्धा करत असल्यामुळे मालिका अंतिम टप्प्यात जाईल अशी अपेक्षा आहे. फलंदाजीतील एका बदलाशिवाय, भारत मोठ्या प्रमाणात बदल करणार नाही. गोलंदाजी विभागात, कुलदीप यादवला प्रतीक्षा करावी लागेल व रवींद्र जडेजा आणि वॉशिंग्टन सुंदर हे काम करतील.

### बुमराह खेळण्याची अपेक्षा

उर्वरित दोन कसोटींपैकी केवळ एका सामन्यात खेळणारा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह मॅन्चेस्टरमध्ये भारतासोबत सुरुवात करेल अशी अपेक्षा आहे.

मला नेहमीच माहित होते की भारत चांगली कामगिरी करेल. पण पुन्हा, माझ्यासाठी, ही कसोटी मालिका धावसंख्येबद्दल नव्हती. ती नेहमीच या संघाच्या प्रगतीबद्दल होती, कारण आपण सर्वजण सहमत आहोत की ही एका संक्रमण काळातून जात आहे, असे दासगुप्ता म्हणाला.

इतरांप्रमाणे दासगुप्तासुद्धा चौथ्या कसोटीत बुमराहकडून आक्रमणाचे नेतृत्व करण्याची अपेक्षा करतो.

बुमराहने चौथ्या कसोटीसाठी सज्ज असायला पाहिजे. सामन्यांदरम्यान बरीच विश्रांती घेण्यात आली आहे. भारत १-२ ने पिछाडीवर असल्यामुळे बुमराह खेळेल अशी अपेक्षा आहे, असे दासगुप्ता म्हणाला. ◀(वृत्तसंस्था)

# प्रज्ञानंदचा कार्लसनवर विजय

## फ्रीस्टाईल बुद्धिबळ



आर. प्रज्ञानंदविरुद्ध चाल खेळताना मॅग्नस कार्लसन

◆ **लास वेगास, १७ जुलै**

७५०,००० अमेरिकन डॉलर्सच्या फ्रीस्टाईल ग्रॅण्ड स्लॅम बुद्धिबख स्पर्धेत अर्जुन एरिगाईसीसह ग्रॅण्डमास्टर आर. प्रज्ञानंदने जागतिक क्रमवारीत अव्वल क्रमांकावर असलेल्या मॅग्नस कार्लसनवर विजय नोंदविला.

प्रज्ञानंदसह भारतीय खेळाडूंनी कार्लसनला पराभूत करण्याची अलीकडील परंपरा कायम राखली आणि नॉर्वेच्या खेळाडूंच्या मोहिमेला धक्का दिला. अलिकडच्या आठवड्यात कार्लसनला जागतिक विजेता डी. गुकेशनेही पराभूत केले होते, तो येथील स्पर्धेत सहभागी नाही.

१९ वर्षीय प्रज्ञानंदने सुरुवातीपासूनच त्याच्या खेळात प्रभावीपणे भाग घेतला आणि कार्लसनला काही संधी मिळाल्या तरीही, प्रज्ञानंदने काही कल्पनारम्य खेळी केल्या.

प्रज्ञानंदविरुद्धच्या पराभवाचा कार्लसनवर इतका मोठा परिणाम झाला की पुढच्या फेरीत त्याने वेस्ली सोविरुद्ध आणखी एक डाव गमावला आणि त्यानंतर चौथ्या स्थानासाठी शेवटच्या टायब्रेकरमध्ये अमेरिकेच्या लेव्हॉन ॲरोनियनने २-० असा धक्कादायकपणे पराभव करत त्याला अव्वल खेळाडूंमधून बाहेर काढले.

१६ खेळाडूंच्या या स्पर्धेत प्रत्येकी आठ गटात विभागले गेले होते आणि प्रत्येक गटातील अव्वल चार संघांनी इतर सहभागींसोबत एकदा खेळल्यानंतर उपांत्यपूर्वफेरीत प्रवेश केला. नियम अशा प्रकारे तयार केले आहेत की पात्रता फेरीच्या पहिल्या सेटमध्ये अव्वल श्रेणीत न येणारे खेळाडू यापुढे स्पर्धा जिंकू शकत नाहीत आणि कार्लसन उर्वरित सामने जिंकल्यास तो तिसरे स्थान मिळवू शकतो.

अर्जुन एरिगासी हा दुसऱ्या गटातील दुसरा भारतीय खेळाडू होता, ज्याने उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. सुरुवातीच्या काही संघर्षांना तोंड देणाऱ्या एरिगासीची कामगिरी चांगली होती. प्रज्ञानंदाने आपल्या गटात संभाव्य सातपैकी ४.५ गुणांसह पहिल्या स्थानावर उझबेकिस्तानचा नोदिरबेक अब्दुसत्तोरोव्ह आणि जावोखिर सदारोव्ह आणि अरुणियन यांच्यासह चार गुणांसह संयुक्तपणे स्थान मिळवले.

कार्लसनने जर्मनीचा व्हिन्सेंट कीमर, वेस्ली सो आणि कझाकस्तानची एकमेव महिला सहभागी बिबिसारा असाउबायेवा यांच्यापेक्षा पाचवे स्थान मिळवले.

दुसऱ्या गटात हिकारू नाकामुराने आश्चर्यकारक ६-७ गुणांसह अव्वल स्थान मिळवले आणि त्याचा अमेरिकन देशाचा खेळाडू हान्स निमन ४.५ गुणांसह दुसऱ्या स्थानावर राहिला. एरिगाइसीने आणखी एक स्थानिक स्टार फॅबियानो कारुआनासह चार गुणांसह संयुक्तपणे तिसरे स्थान मिळवले.

लीनियर डोमिंग्वेझ पेरेझ, सेव्हियन सॅम्युअल आणि रॉबसन रे या अमेरिकन त्रिकुटाने दुसऱ्या गटात ५-७ गुणांसह अंतिम स्थान मिळवले आणि भारतीय विदित गुजराती शेवटच्या स्थानावर राहिले.

आता उपांत्यपूर्व फेरीत प्रज्ञानंदचा सामना अमेरिकेच्या फॅबियानो कारुआनाशी होईल, तर अर्जुन एरिगासीला अब्दुसत्तोरोव्हशी लढावे लागेल. ◀(वृत्तसंस्था)

### जिम्नॅस्ट सिमोन बायल्सने जिंकले दोन पुरस्कार

**लॉस एंजेलिस** : जगविख्यात जिम्नॅस्ट सिमोन बायल्सने ईएसपीवायएसमध्ये दोन पुरस्कार जिंकले असून यात महिलांचा सर्वोत्तम खेळाडू पुरस्काराचा सुद्धा समावेश आहे. ११ वेळा ऑलिम्पिक पदक विजेती सिमोनने पॅरिस ऑलिम्पिकमधील आपल्या प्रयत्नांसाठी पहिला पुरस्कार तसेच सर्वोत्तम महिला खेळाडूचा पुरस्कार पटकावले. तिने २०१६ नंतर अमेरिकेच्या महिला जिम्नॅस्टना आपले पहिले सांघिक विजेतेपद जिंकण्यास मदत करताना तीन सुवर्ण आणि एक रौप्यपदक जिंकले. तिने स्टीफन करी, फ्रेडी फ्रीमन आणि रोरी मॅकइलरॉय यांना मागे टाकले. हे खूप अनपेक्षित आहे, असे सिमोन बायल्स म्हणाली. या पुरस्कार समारंभात तिच्यासोबत पती व जोनाथन ओवेन्स उपस्थित होते. ■

### वेस्ट इंडीजचा आंद्रे रसेल आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त होणार

◆ **किंग्स्टन, १७ जुलै**

२२ जुलै रोजी ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या दुसऱ्या टी-२० सामन्यानंतर वेस्ट इंडीजचा आंद्रे रसेल आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त होणार आहे. या सामन्यानंतर आंद्रे रसेल आपल्या १५ वर्षांच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीचा शेवट करेल.

रसेलची सर्वात महत्त्वाची कामगिरी म्हणजे २०१२ आणि २०१६ मध्ये अनुक्रमे दोन टी-२० विश्वचषक विजेत्या वेस्ट इंडीज संघांचा सदस्य असणे. २०१९ पासून, रसेलने केवळ टी-२० स्वरूपात कामगिरी केली आहे. त्याने ८४ टी-२०, ५६ एकदिवसीय व एका कसोटी सामन्यात वेस्ट इंडीजचे प्रतिनिधित्व केले आहे.

वेस्ट इंडीजच्या टी-२० यशाचा आधारस्तंभ असलेल्या ३७ वर्षीय जमैकाच्या या खेळाडूला ऑस्ट्रेलिया विरुद्धच्या पाच सामन्यांच्या मालिकेसाठी संघात स्थान देण्यात आले होते, परंतु २० व २२ जुलै रोजी तो आपल्या प्रिय गृह मैदान- सबिना पार्कवर आपले शेवटचे दोन आंतरराष्ट्रीय सामने खेळणार आहे. २०१२ व २०१६ मध्ये जेतेपद जिंकणाऱ्या संघाचा भाग असलेल्या रसेलने २०२६ मध्ये भारत आणि श्रीलंकेत होणाऱ्या टी-२० विश्वचषकाच्या केवळ सात महिने आधी आपला निर्णय जाहीर केला. ◀(वृत्तसंस्था)

# लक्ष्य सेन, सात्त्विक-चिरागचे आव्हान संपुष्टात

## जपान ओपन बॅडमिंटन

◆ **टोकियो, १७ जुलै**

भारतीय बॅडमिंटनपटू जपान ओपनमध्ये अपयशी ठरले. गुरुवारी येथे झालेल्या सुपर ७५० बॅडमिंटन स्पर्धेच्या दुसऱ्या फेरीत लक्ष्य सेन आणि सात्त्विकसाईराज रन्कीरेड्डी व चिराग शेट्टी या स्टार पुरुष दुहेरी जोडीचा पराभव झाला.

जागतिक क्रमवारीत १८ व्या स्थानावर असलेल्या लक्ष्य सेनला जपानच्या कोडाई नारोकाकडून सुमारे एक तास चाललेल्या पुरुष एकेरीत १९-२१, ११-२१ असा पराभव पत्करावा लागला. चीनच्या वांग झेंग झिंगवर २१-११, २१-१८ असा विजय मिळवून पहिल्या सामन्यात आशादायक दिसणारा २३ वर्षीय लक्ष्य हा वेग पुढे नेण्यात अपयशी ठरला.

पुरुष दुहेरीच्या सामन्यात सात्त्विक व चिरागला पाचव्या मानांकित चीनच्या लियांग वेई केंग आणि वांग चांग या माजी प्रथम विश्वमानांकित जोड्यांमधील लढतीत २२-२४, १४-२१ असा पराभव पत्करावा लागला.

या विजयासह, पॅरिस ऑलिम्पिक रौप्यपदक विजेत्या वेई केंग व वांग चांग या जोडीने भारतीयांविरुद्धची आघाडी ७-२ अशी वाढवली. संथ सुरुवातीनंतर, भारतीय जोडीने १८-१४ अशी आघाडी घेतली परंतु त्यांना ती लय टिकवून ठेवता आली नाही, कारण त्यांच्या चिनी जोडीने पहिला गेम रोमांचकपणे जिंकला. ◀(वृत्तसंस्था)

# इंटर मियामीचा सिनसिनाटीकडून ०-३ ने पराभव

## मेस्सीची सलग सामन्यात गोल करण्याची मालिका संपुष्टात


एमएलएस फुटबॉल सामन्याच्या उत्तरार्धात एफसी सिनसिनाटीविरुद्ध चेंडूवर नियंत्रण राखताना इंटर मियामीचा लियोनेल मेस्सी

◆ **सिनसिनाटी, १७ जुलै**

सलग पाच सामन्यांमध्ये अनेक गोल करण्याची लियोनेल मेस्सीची एमएलएस-विक्रम मालिका खंडित झाली. एफसी सिनसिनाटीविरुद्धच्या एमएलएस फुटबॉल सामन्यात मेस्सीलाएकही गोल करता आला नाही, परिणामी इंटर मियामीला या सामन्यात ०-३ ने पराभव पत्करावा लागला.

सिनसिनाटी संघाकडून जेरार्डो व्हॅलेन्झुएलाने पूर्वार्धात एक गोल आणि उत्तरार्धात इव्हांडरने दोन गोल केले. ईस्टर्न कॉन्फरन्स गुणतालिकेत सिनसिनाटी संघ फिलाडेल्फिया युनियनपेक्षा एक गुण मागे राहिला. अन्य सामन्यात फिलाडेल्फियाने सीएफ मॉण्ट्रियलचा २-१ असा पराभव केला.

या पराभवामुळे इंटर मियामीचा पाच सामन्यांचा विजयी क्रम संपुष्टात आला, इंटर मियामी ईस्टर्न कॉन्फरन्स गुणतालिकेत पाचवा आहे.

मेस्सी हा एमएलएस इतिहासातील पहिला खेळाडू आहे, ज्याने चारपेक्षा जास्त सामन्यांत सलग गोल करण्याची मालिका जिंकली आहे. १७ एमएलएस सामन्यांमध्ये तो १६ गोलसह लीग आघाडीवर होता.

एमएलएसमध्ये आल्यापासून आठ वेळा बॅलन डीओर विजेता मेस्सीने सिनसिनाटीविरुद्ध केवळ तीन सामने खेळले आहेत, परंतु यावेळी त्याला सिनसिनाटीविरुद्ध खेळणे अवघड झाले. पहिल्या १६ मिनिटांत सिनसिनाटीकडे चार शॉट होते, तर इंटर मियामीसाठी एकही शॉट नव्हता. मेस्सीचा पहिला शॉट पूर्वार्धाच्या स्टॉपेज टाइमच्या शेवटच्या मिनिटाला आला आणि तो गोलरक्षक रोमन सेलेंटानोच्या हातात आरामात पडला. इव्हांडरने हंगामातील १४ वा आणि एमएलएसमधील ५० वा गोल केला. ३८ वर्षीय मेस्सीने सलग आठ सामन्यांमध्ये ९० पेक्षा जास्त मिनिटे खेळली आहेत. ◀(वृत्तसंस्था)

# भारताचा इंग्लंडवर चार गड्यांनी विजय

## दीप्ती शर्माचे नाबाद अर्धशतक



सामनावीर दीप्ती शर्माची विजयी खेळी

◆ **साऊदम्प्टन, १७ जुलै**

दीप्ती शर्माने झळकावलेल्या नाबाद अर्धशतकाच्या बळावर भारताने इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या महिला एकदिवसीय क्रिकेट सामन्यात चार गड्यांनी सहज विजय मिळविला. सामनावीर ठरलेल्या दीप्तीने ६४ चेंडूंत तीन चौकार आणि एका षट्कारासह नाबाद ६२ धावांची विजयी खेळी केली.

इंग्लंडने प्रथम फलंदाजी करत ५० षटकांत ६ बाद २५८ धावा केल्या. भारताने २५९ धावांचे लक्ष्य १० चेंडू शिल्लक असतानाच पूर्ण केले. भारताने ४८.२ षटकांत ६ बाद २६२ धावा काढून विजय साकार केला.

दीप्तीने जेमिमाह रॉड्रिग्जसोबत १४.२ षटकात पाचव्या गड्यासाठी केलेली ९० धावांची भागीदारी सामना जिंकणारी ठरली. जेमिमाहने ५४ चेंडूंत ५ चौकारांच्या मदतीने ४८ धावांची खेळी केली.

कर्णधार हरमनप्रीत कौर (१७) बाद झाल्यानंतर भारताची ४ बाद १२४ अशी घसरण झाली असली तरी अष्टपैलू अमनजोत कौर (१४ चेंडूत २०) हिने काही जोरदार फटकेबाजी केली.

दीप्ती व रॉड्रिग्जने चांगली कामगिरी केली व संघाचा धावफलक हलता ठेवला.

भारतीय कर्णधार हरमनप्रीत दीप्तीच्या कामगिरीवर खूप खूश होती आणि तिने जेमिमाह रॉड्रिग्जचेही कौतुक केले. जेमिमाहचे दोन धावांनी अर्धशतक हुकले.

आम्ही ज्या पद्धतीने गोलंदाजी, फलंदाजी केली, त्यावर मी समाधानी व खरोखर आनंदी आहे. विशेषतः दीप्तीची खेळी महत्त्वाची होती. फलंदाजीसाठी ही चांगली खेळपट्टी होती. क्षेत्ररक्षण ही अशी गोष्ट आहे ज्यावर आम्ही काम करत आहोत, आज आम्ही दोन संधी गमावल्या. आम्ही चांगले करण्याचा प्रयत्न करू, असे कर्णधार हरमनप्रीत कौर म्हणाली.

तत्पूर्वी, तरुण वेगवान गोलंदाज क्रांती गौडने सुरुवातीला दोन बळी घेतले आणि त्यानंतर सोफिया डंकलीच्या नाबाद ९२ चेंडूत ८३ धावांच्या आधारावर इंग्लंडने ६ बाद २५८ धावांपर्यंत सन्मानजनक मजल मारली.

क्रांती गौड (९ षटकांत २/५५), ऑफ स्पिनर स्नेह राणा (१० षटकांत २/३१) यांनीही प्रभावी गोलंदाजी केली. ◀(वृत्तसंस्था)

# सध्या मालिकेवर लक्ष केंद्रित : दीप्ती शर्मा

◆ **साऊदम्प्टन, १७ जुलै**

विश्वचषकाला अजून बराच वेळ शिल्लक असल्याने सध्या मालिकेवर लक्ष केंद्रित करू इच्छित आहे आणि आम्ही एका वेळी एकाच सामन्याचा विचार करत आहो, असे दीप्ती शर्मा म्हणाली.

इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या महिला एकदिवसीय सामन्यात भारताच्या २५९ धावांच्या यशस्वी पाठलागात दीप्तीने नाबाद ६२ धावा केल्या. ही भारताची शेवटची ५० षटकांची मालिका आहे व १४ सप्टेंबरपासून ऑस्ट्रेलियाविरुद्ध घरच्या मैदानावर एक सामना शिल्लक आहे. महिला एकदिवसीय विश्वचषक ३० सप्टेंबर रोजी भारताचा श्रीलंकेविरुद्धचा सामना खेळून सुरू होणार आहे.

आगामी महिला एकदिवसीय विश्वचषकाच्या तयारीच्या बाबतीत म्हणाल तर भारतीय संघ योग्य मार्गावर आहे. आम्ही श्रीलंकेत आणि येथेही काही खरोखर चांगल्या गोष्टी केल्या. विश्वचषकाला अजून दोन महिने शिल्लक आहे, असे ती म्हणाली.

इंग्लंडविरुद्ध संघाला चार विकेटने विजय मिळवून दिल्यानंतर सामनावीर ठरलेल्या दीप्तीने सामन्यानंतरच्या पत्रकार परिषदेत सांगितले. दीप्ती व जेमिमा रॉड्रिग्जसोबतची ९० धावांची भागीदारी सामन्याला कलाटणी देणारी ठरली.

जेव्हा आम्ही खेळपट्टीवर होतो, तेव्हा प्रति षटक ५-६ धावा करण्याची योजना होती व आम्ही तेच केले. दरम्यान मला कधीही कोणत्याही प्रकारच्या दबावाखाली असल्याचे वाटले नाही, असेही तिने सांगितले.

जर मी जेमिमाहसोबत शेवटपर्यंत खेळली तर आम्ही सामना जिंकू शकतो, यावर माझा पूर्ण विश्वास होता व मी त्यावर अधिक लक्ष केंद्रित करत होती, असे ती म्हणाली. ◀(वृत्तसंस्था)

# आशियाई कुस्ती स्पर्धेत भारताला उपविजेतेपद



डॉ. रणवीरसिंग राहल खेळाडूंसह व उपस्थित आयोजक

## डॉ. रणवीरसिंग राहल यांचे मार्गदर्शन

◆ **अमरावती, १७ जुलै**

८ ते १३ जुलै दरम्यान बिश्केक किर्गिस्तान येथे अंडर २० आशियाई २० वर्षांखालील फ्रीस्टाइल कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेसाठी भारतीय कुस्ती संघाचे मुख्य प्रशिक्षक म्हणून डॉ. रणवीरसिंग राहल तसेच सहायक प्रशिक्षक म्हणून मोहनलाल यादव व महेंद्रसिंह गुजर यांची निवड करण्यात आली होती. त्यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय कुस्ती संघाने या स्पर्धेत सर्वोत्तम कामगिरी करून २ सुवर्णपदके, एक रौप्यपदक आणि ५ कांस्यपदके पटकावून उपविजेतेपदाचा मान पटकावला.

या यशाबद्दल संपूर्ण भारतीय क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण पसरले व भारतीय कुस्ती संघाद्वारे दिल्लीत डॉ. रणवीरसिंग राहल, मोहनलाल यादव, महेंद्रसिंह गुजर तसेच पदक विजेते खेळाडू यांचा सत्कार करण्यात आला.

यापूर्वी डॉ. रणवीरसिंग राहल सतत आठ वर्षांपासून भारतीय कुस्ती संघाचे मुख्य कुस्ती प्रशिक्षक म्हणून क्वालालम्पूर मलेशिया, अमान जॉर्डन, इस्तंबूल तुर्की, उझबेकिस्तान, इराण, चीन तैपई, रशिया, बल्गेरिया, झॅगरेब या देशात यशस्वीपणे संघाचे नेतृत्व केले व भारताला जास्तीत जास्त पदक प्राप्त करून देण्याचे यश मिळविले. सध्या डॉ. रणवीरसिंग राहल हे अमरावती शहर पोलिस आयुक्तालय येथे आयुक्त अरविंद चावरिया यांच्या अधिपत्याखाली कार्यरत आहे व महाराष्ट्र राज्य पोलिस कुस्ती संघाचे प्रमुख कुस्ती प्रशिक्षक म्हणून कामगिरी बजावत आहे.

भारतीय कुस्ती संघाचे अध्यक्ष संजयकुमार सिंह आणि पोलिस आयुक्त अरविंद चावरिया, महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष रामदास तडस व सचिव योगेश दोडके, तसेच अमरावती शहराचे पोलिस अधिकारी पो. उपायुक्त गणेश शिंदे, श्याम घुगे, संजय धुमाळ, सहाय्यक आयुक्त शिवाजी बचाटे, डॉ. संजय तीरथकर, पोलिस निरीक्षक गुळसुंदरे तसेच भारतीय कुस्ती संघाचे संपूर्ण पदाधिकारी, कार्यालयीन कर्मचारी यांनी डॉ. रणवीरसिंग राहल यांचे अभिनंदन केले व पुढील भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. ◀(तभा वृत्तसेवा)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत

# आ. सचिन कल्याणशेट्टी यांची विधानसभेत लक्षवेधी

- बसस्थानकामागील पायवाट नाहीच; परिवहन मंत्री प्रताप सरनाईकांकडून स्पष्ट



**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.१७ जुलै-**

आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी अक्कलकोट बसस्थानकात मागील बाजुने पायवाटबाबत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी कुठला आदेश निर्गमीत केला आहे का ? असा थेट सवाल करून लक्षवेधी मांडली. राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी या लक्षवेधी प्रश्नाचे उत्तर देताना अक्कलकोट बसस्थानक ही राज्य परिवहन महामंडळाची मालमत्ता आहे. यातुन मधुनच कोणी पायवाट मागेल हे शक्य नसल्याचे ठणकाऊन सांगितले. बसस्थानकाच्या मधून मागील बाजूस जाण्यासाठी कुठल्याही प्रकारचे आश्वासन लेखी आदेश दिले नसल्याचे स्पष्ट केले.

अक्कलकोट बसस्थानकास दक्षिण बाजूकडे मागील बाजुने पायवाट द्यावी अशी मागणी करून बस डेपो येथे उपोषण करण्यात आले होते. या उपोषण स्थळी माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांनी भेट दिली होती. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे सदर बाब मांडली. बसस्थानकात दक्षिण बाजुने मागील बाजूस जाण्या-येण्याकरिता पायवाट बाबत आश्वासन देऊन माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांनी उपोषणकर्त्याला उपोषण सोडण्याची विनंती केली. उपोषणकर्त्यांनी लेखी आश्वासन घेऊन उपोषण समाप्त केले. बसस्थानकामधून दक्षिण बाजूकडून जाण्यायेण्याकरिता पायवाट सोडण्यात आली.

बसस्थानकास जाण्या-येण्याकरिता समोरून मोठा रस्ता आहे. दक्षिण बाजुकडे जाण्यासाठीही मोठा रस्ता आहे. सुरक्षितेच्या कारणास्तव तीर्थक्षेत्री येणाऱ्या लाखो भाविकांच्या सुरक्षितेसाठी मागील बाजूने बाहेर जाणे व आत येणे धोकादायक ठरू शकते. हे बंद करण्यासाठी अक्कलकोटमध्ये आ. गोपीचंद पडळकर, आमदार संग्राम जगताप, आमदार देवेंद्र कोठे यांच्या उपस्थितीत प्रचंड जनआक्रोश मोर्चा व जाहीर सभा झाली .ही वाट बंद करण्याची मागणी करण्यात आली. माजी गृहराज्यमंत्री म्हेत्रे व आमदार कल्याणशेट्टी यांच्यात या पायवाट बाबत शह-प्रतिशह देण्याचे राजकारण सुरु असल्याचे स्पष्ट झाले. हा मुद्दा माजी गृहराज्यमंत्री म्हेत्रे व आमदार कल्याणशेट्टी यांच्यात प्रतिष्ठेचा बनला. अखेर सात विधानसभा निवडणुकीचा प्रचंड अनुभव व माजी फलोत्पादन तुरुंग गृहराज्यमंत्रीपदाचा दांडगा अनुभव असलेल्या म्हेत्रे यांना पायवाट मार्गाने आमदार कल्याणशेट्टी यांनी मात केलीच. विधानसभा सभागृहात याबाबत लक्षवेधी मांडली. परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी पायवाट संदर्भात अत्यंत स्पष्ट केले. अक्कलकोट बसस्थानकाचे काम प्रगती पथावर असल्याचे सांगून आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या उपस्थिती मध्येच लवकरात लवकर बसस्थानकाचे काम पुर्णत्वास नेण्याची ग्वाही दिली. याबाबत अक्कलकोटमध्ये तर्कवतर्क लढवले जात

### आ. कल्याणशेट्टींनी परिवहन मंत्र्याना केला थेट सवाल

पायवाट मागणी साठी उपोषणाच्या माध्यमातून केलेल्या मागणीला मंत्री महोदयांनी रस्ता देण्याची सुचना केली आहे का? आदेश दिला आहे का?असा थेट सवालच आमदार कल्याणशेट्टी यांनी उपस्थित केला

### परिवहन मंत्र्याचे थेट उत्तर

असा कुठलाही आदेश सुचना दिल्या नाहीत. ही जागा एसटीची परिवहन महामंडळाची आहे मंत्री प्रताप सरनाईकाची प्रॉपट्री नाही जनतेची जागा आहे. कुणी रस्त मागेल कुणी गाळे बांधण्यासाठी मागणी करेल कुणी अतिक्रमण करेल असे करता येणार नाही.

### बसस्थनकाचे ५५ टक्के काम पूर्ण

पाऊस थांबताच बसस्थानकाचे जलद गतीने पुर्ण करण्याची दक्षता घेतली जाईल जलद गतीने काम पुर्ण करण्याचे प्रयत्न करू . सदस्य आमदार सचिन कल्याणशेट्टी यानां घेऊनच लवकरच बसस्थानकाचे उद्घाटन करण्यात येईल अशी ग्वाही परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विधान सभेत आमदार सचिन कल्याशेट्टी यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी मुद्यावर उत्तर देताना दिली .

## महत्वाचे...



### महाराष्ट्र वकील संरक्षण कायद्यास मंजुरी देण्याची मागणी

**पंढरपूर, दि.१७ जुलै-**

महाराष्ट्र विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान विधानभवनात उपस्थित असताना, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे राज्यातील वकील बांधवांच्या विविध समस्या मांडत महाराष्ट्र वकील संरक्षण कायद्यास मंजुरी देण्याची मागणी निवेदनाद्वारे केली. महाराष्ट्रात सुमारे दोन लाख वकील बांधव व भगिनी बार असोसिएशन कौन्सिलच्या माध्यमातून कार्यरत आहेत. पक्षकार व समाजकंटकांकडून त्यांना सातत्याने मारहाण, जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या जातात. तसेच, त्यांच्याकडून खंडणीची मागणी केली जाते. या मागण्या पूर्ण न झाल्यास त्यांच्यावर सातत्याने जीवघेणे हल्ले होत असतात. अशा गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांना आळा घालण्याची गरज आहे. देशातील अनेक राज्यांमध्ये वकील संरक्षण कायदा पारित करण्यात आला असून या कायद्याच्या माध्यमातून वकिलांना संरक्षण देण्यात आले आहे. त्याच पद्धतीने, महाराष्ट्र राज्य व गोवा राज्यात वकील संरक्षण कायदा मंजूर करण्याकरिता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदन सादर केले.



### एकता महिला मंचच्यावतीने महिलांसाठी उद्योग मार्गदर्शन मेळावा

**बार्शी, दि. १७ जुलै-**

तालुक्यातील कारी येथे एकता महिला मंचच्यावतीने महिलांसाठी उद्योग मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थिती महिला मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी एकता महिला मंचचे प्रभाकर क्षीरसागर यांनी महिलांना जिल्हा उद्योग केंद्र, खादी ग्राम उद्योग, समाज कल्याण, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ तसेच कृषी विभाग तसेच पशुसंवर्धन या विभागातील विविध योजना सांगितल्या तसेच एकता महिला मंचच्या कार्याविषयी व उपस्थिती महिलांना विविध विषयावरती महिलांना मार्गदर्शन केले. यावेळी प्रमिला जाधव, प्रतिभा जगदाळे, सुवर्णा पंढरे, रेश्मा डोके, मनीषा सुतार, प्रियंका शिंदे, अंजुम सय्यद, कलिमा मुलाणी, मुस्कान मुलाणी, रजिया सय्यद, साजिदा सय्यद, कविता करळे, स्वाती विधाते, अपर्णा डोके, प्रिया विधाते, सोनाली डोके, सुवर्णा डोके, ज्योती जाधव, कावेरी विधाते, अर्चना डोके, रुबीना शेख, सविता लोंढे, तनुजा कदम, रेणुका वाघे, जयमाला चव्हाण, भाग्यश्री घोडके उपस्थित होते. सूत्रसंचालन व प्रास्ताविक प्रमिला जाधव यांनी केले व आभार प्रतिभा जगदाळे यांनी मानले.



### तगरभूमीत भंते सुमित नागसेनच्या नेतृत्वाखाली वर्षावास उपक्रम संपन्न

**पांगरी,दि.१७ जुलै-**

आषाढ महिन्यातील बौध्द धर्म उपासकांचा वर्षावास उपक्रम भंते सुमित नागसेन यांच्या नेतृत्वाखाली सोलापूर व धाराशीवच्या सीमेवरील दुर्गम परिसरातील तगरभूमीत नुकताच संपन्न झाला. यामध्ये अकोला, लातूर, निलंगा, उमरगा, सोलापूर, मोहोळ आदि ठिकाणावरून अनुयायी उपस्थित होते. भंते सुमितजी नागसेन यांनी सोलापूर, धाराशिव जिल्ह्याच्या बॉर्डरवर दुर्गम परिसरात सन २०२० ला दोन एकर जमीन खरेदी करून त्या ठिकाणी बौद्ध विहार निर्मितीचे काम हाती घेतले आहे. त्या ठिकाणाला तगरभूमी नाव दिले आहे. दरवर्षी आषाढ महिन्यात वर्षावासाचे आयोजन येथे केले जाते. अनेक भंतेना निमंत्रित करून प्रवचनाचा कार्यक्रम आयोजित केला जातो. यंदाही या कार्यक्रमात भंते नागसेन यांचे प्रवचन झाले. येथे साकारत असलेल्या बुद्ध विहारासाठी कळंबचे आमदार कैलास पाटील यांनी ३५ लाख रुपयांचा निधी दिला आहे. या ठिकाणाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे पणतू राजरत्न आंबेडकर यांनीही भेट दिली आहे. त्याचप्रमाणे अखंड दगडातील गौतम बुद्ध मूर्ती उपासक कैलास शिंदे यांनी दिली आहे. सोनटक्के बापूंनी स्वतःच्या मालकीची एक एकर जमीन विहारासाठी दान दिली आहे. रघुनाथ भोसले यांनी ५० हजार रुपयाची मदत केली आहे. या विहारासाठी उपासक रमेश जगताप, शीलवंत बाप्पा, राजाराम वाघमारे, चेतन शिंदे, विठ्ठल समुद्रे, अनिल हजारे यांनी धम्मदान दिले आहे. अकोला, लातूर, निलंगा, उमरगा, सोलापूर, मोहोळ येथील अनुयायी उपस्थित होते. कार्यक्रमाचा प्रारंभ बुद्ध मूर्तीची पूजा करून झाला. भन्ते नागसेनच्या वतीने सत्कार करण्यात आला. या तगरभूमीत नियोजित ध्यान केंद्र, स्तूप भिक्षू निवास, धम्म प्रवचन हॉल हे आहे. उपासक बाबुराव हजारे यांनी भोजनदान दिले.

# जिल्ह्यातील शेतकऱ्यांना साडेचार कोटींचा निधी

- अवकाळी पाऊस व गारपीटीतील नुकसानग्रस्तांना दिलासा
- आमदार अभिजीत पाटील यांच्या पाठपुराव्याला यश

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १७ जुलै-**

आमदार अभिजीत पाटील यांनी पावसाळी अधिवेशनात जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा प्रश्न मांडून आवाज उठविला. दि. १६ जुलै रोजी महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासनाने काढलेल्या शासन निर्णयानुसार सोलापूर जिल्ह्यात मे २०२४ मध्ये झालेल्या अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे झालेल्या शेती नुकसानीसाठी राज्य शासनाने रु. ४४९.०६ लाखांचा निधी मंजूर केला आहे.

हा निधी २७४८ बाधित शेतकऱ्यांच्या १९७६.६७ हेक्टर क्षेत्रासाठी मंजूर करण्यात आला असून, लाभार्थ्यांच्या थेट खात्यात डीबीटी प्रणालीद्वारे रक्कम जमा केली जाणार आहे.

या निर्णयामागे आ. पाटील यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि शासन दरबारी प्रभावी मागणी महत्त्वाची ठरली. शेतकऱ्यांच्या मदतीसाठी त्यांनी वेळोवेळी विभागीय आयुक्त आणि महसूल विभागाकडे पाठपुरावा करून प्रशासनाच्या लक्षात ही गरज आणून दिली. या निधीमुळे सोलापूर जिल्ह्यातील बाधित शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे आ. पाटील यांनी सांगितले.

# जीवन सार्थकतेसाठी संयम, क्षमा अन् समत्व आवश्यक

- ह.भ.प. ॲड. जयवंत महाराज बोधले
- धनश्री प्रवचनमालेची सांगता





**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.१७ जुलै-**

आजच्या समाजात जिथे शब्दांचा वापर शस्त्रासारखा केला जातो तिथे संतांची वाणी संयम, क्षमा आणि समत्वाचा उपदेश करते. हेच खरे संतवचनाचे सार असल्याचे प्रतिपादन ह.भ.प. ॲड. जयवंत महाराज बोधले यांनी केले.

येथील स्व. सौ. लक्ष्मीबाई (नीलाई) बाजीराव काळुगे यांच्या स्मरणार्थ जोगेशरी मंगल कार्यालयात आयोजित पाच दिवसीय धनश्री प्रवचनमालेच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. यावेळी प्रा.शिवाजीराव काळुंगे, ह.भ.प. प्रभाकर दादा बोधले महाराज, संत तुकाराम महाराज यांचे वंशज ह.भ.प. मोरे महाराज, बाळकृष्ण महाराज, यशवंत महाराज बोधले, किरण महाराज बोधले यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती. बोधले महाराज पुढे म्हणाले, संतांनी केवळ अभंग रचले नाहीत, तर त्यातून समाजाला एक नवा दृष्टिकोन दिला. वाणीचा उपयोग जर बुद्धीला त्रासदायक व मनाला विदीर्ण करणारा असेल, तर ती वाणी शस्त्र ठरते. मात्र संतांची वाणी आत्म्याला स्पर्श करणारी असते. त्यात भावना, ओलावा आणि आत्मकल्याणाची दिशा असते. लोकांत फिरणाऱ्यांनी कधीतरी एकांतात बसावे. सहनशीलता वाढवण्यासाठी संत मुक्ताबाईंचा ताटी उघडा ज्ञानेशरा हा अभंग घडला. माणसाने मृत्यू हे अंतिम सत्य मानावे आणि सत्कर्म हेच आपल्या सोबतीला येते हे लक्षात ठेवावे. मुक्ताईंच्या विनंतीमधून ज्ञानेश्वरांचे मौन ही जगाला जागृती देणारी योजना आहे, हे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी ह.भ.प. प्रभाकर दादा बोधले महाराज यांनी आजच्या काळात समाजप्रबोधनासाठी अशी प्रवचनमाला सुरू करणे ही केवळ कृती नाही, ती एक अध्यात्मिक यज्ञसेवाच असल्याचे सांगितले. प्रवचनाच्या प्रारंभी प्रा.शिवाजीराव काळुंगे यांनी पद्मभूषण डॉ. नागनाथ अण्णा नायकवडी यांच्या जयंतीनिमित्त त्यांना शब्दांजली अर्पण केली. प्रवचनसत्रात भैरवनाथ महाराज जाधव, कृष्णा महाराज वैद्य, रामेश्वर महाराज जाधव यांनी अभंग गायन केले. पाच दिवसात संभाजी रोकडे, उदयभान भोसले, उत्तम पाटील, श्रीशैल्य राजमाने, सोमनाथ गुळमिरे व रामानुज मर्दा यांच्यावतीने प्रसाद वाटप करण्यात आला. समारोपप्रसंगी जवळा येथील लयभरी उद्योग समुहाचे प्रमोद साळुंखे-पाटील यांच्यावतीने महाप्रसाद वाटप करण्यात आला.

# विविध योजनेतील लाभार्थींनी अनुदानासाठी संपर्क साधावा

- 'दक्षिण'च्या नायब तहसीलदार रूपाली करमाळकर यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.१७ जुलै -**

दक्षिण तालुक्यामधील संजय गांधी निराधार, श्रावणबाळ व वृध्दापकाळ यासारख्या योजनांच्या लाभार्थ्यांना मंजूर अनुदान मिळत नसल्यास त्यांनी दक्षिण तहसीलदार कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन संजय गांधी योजनेच्या नायब तहसीलदार रूपाली करमाळकर यांनी केले आहे.

जानेवारी महिन्यांपासून अनुदान मिळाले नसल्याचे अनेक लाभार्थी सांगत आहेत. मात्र शासनाकडून लाभर्थ्यांच्या बँक खात्यावर अनुदान पाठविण्यात आले आहे. डीबीटी पध्दतीने सर्व लाभार्थ्यांच्या खात्यावर अनुदान जमा करण्यात आल्याचे सांगितले. कार्डावरील नावात व पत्यामध्ये बदल असल्यास अथवा कागदपत्रांमध्ये त्रुटी आसल्यास अनुदान जमा होत नाही. शिवाय लाभार्थ्यांची बँक खात्याचे मॅपिंग झालेल्या बँक खात्यावरच अनुदान जमा होत आहे. त्यामुळे अनुदान मिळत नसल्यास लाभार्थ्यांनी तलाठी अथवा तहसीलदार कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन नायब तहसीलदार करमाळकर यांनी केली आहे.

संजय गांधी निराधार अनुदान योजना

### लाभार्थ्यांच्या कामांना प्राधान्य

संजय गांधी निराधार योजना अथवा इतर योजनांचे लाभार्थी अनेक तक्रारी घेऊन येतात. त्या तक्रारींची पडताळणी करून निपटारा करण्यात येते. शिवाय नवीन अर्जदार असतील तर कोणत्या कारणामुळे अर्ज प्रलंबित आहे, याचीही माहीती अर्जदाराला दिली जाते. त्यामुळे या कार्यालयात लाभार्थ्यांच्या कामाना प्राधान्य दिली जात असल्याचे नायब तहसीलदार करमाळकर यांनी सांगितले.

### अर्ज प्रलंबित नाहीत

दक्षिण तहसीलदार कार्यालयात संजय गांधी निराधार, श्रावणबाळ व वृध्दापकाळ योजनेसाठी पात्र लाभार्थ्यांनी अर्ज केल्यानंतर त्वरित कागदपत्र पडताळणी करून अर्ज मंजूर करण्यात येत आहे. त्यामुळे अर्जदाराला अनुदान मिळण्यास मदत होत आहे. मासिक बैठक अथवा इतर कारणांनी अर्ज प्रलंबित न ठेवता टप्याटप्याने सर्व अर्ज मंजूर करण्यात येत आहे. त्यामुळे दिवसेंदिवस लाभार्थी संख्येमध्ये वाढ होत आहे.

**- किरण जमदाडे,**
**तहसीलदार, दक्षिण सोलापूर**

### कर्मवीर पाटील विद्यालय व ज्युनिअर कॉलेजमध्ये उद्या विद्यार्थी संवाद मेळावा

**पिलीव, दि. १७ जुलै-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथे कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय व रमेश खलीपे ज्युनिअर कॉलेज मध्ये महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त आठवी ते बारावीच्या विद्यार्थ्यासाठी विद्यार्थी संवाद दि. १९ जुले रोजी सकाळी अकरा वाजता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिति राष्ट्रवादी महीला कॉंग्रेसच्या पिलीव शहरच्या अध्यक्ष पुनम भैस यांनी सांगितले. याविषयी नुकतेच विद्यालयाचे मुख्याध्यापक अशोक बाबर यांना कार्यक्रमाचे निवेदन देण्यात आले. यावेळी माळशिरस तालूका राष्ट्रवादी विद्यार्थी कॉंग्रेसचे तालुका अध्यक्ष शिवाजी देशमुख उपस्थित राहणार आहेत. यावेळी वरीष्ठ लिपिक भोरकडे, संजय पाटील उपस्थित होते.



### शिवाजी मंडळाच्या मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची वार्षिक सभा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १७ जुलै-**

तालुक्यातील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ गौडगाव संचलित पाच शाखांमधील मुख्याध्यापक शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांची वार्षिक सभा गौडगाव या ठिकाणी संपन्न झाली. प्रथमता छत्रपती शिवाजी महाराज व संस्थेचे संस्थापक कर्मवीर लोहोकरे गुरुजी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

सभेच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष विनायकराव बप्पा गरड हे होते. संस्था संचलित विविध शाखांमधील इयत्ता दहावी, बारावी निकाल व स्पर्धा परीक्षा आणि शाळेतील इतर उपक्रमांचा आढावा घेण्यात आला. प्रमुख पाहुणे ड्रीम फाउंडेशनचे संस्थापक, प्रसिद्ध व्याख्याते श्री. काशिनाथ भातगुणकी होते, त्यांनी शिक्षकांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर शालेय शिक्षणामध्ये कसा करावा तसेच सेंद्रीय शेती, युवा उद्योग याबद्दलही मार्गदर्शन केले, उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शिक्षकांना पुस्तके भेट देण्यात आली. संस्थेचे अध्यक्ष बप्पा गरड आणि सचिव पंडितराव लोहोकरे यांनी त्यांचे मनोगतामध्ये सर्व कामांचा आढावा घेतला व सूचना दिल्या. यावेळी संस्था अध्यक्ष विनायकराव गरड, उपाध्यक्ष बळवंतराव पाटील, सचिव पंडितराव लोहोकरे, सहसचिव अरुण भड, खजिनदार मदनलाल खटोड, संचालक अनिल गरड जीवन लोहकरे, डॉ. संतोष भड, बाळासाहेब काकडे, महेश पाटील, अरविंद चव्हाण, डॉ. विवेकानंद पाटील, विलास लोहोकरे उपस्थित होते, प्राचार्य सुरज काकडे, सुपरवायझर सुमंत जानराव यांनी कार्यक्रम आयोजित केला. सूत्रसंचालन जीवन लोहोकरे, प्रस्ताविक जीवराज गरड, आभार हरि नारायण राठी यांनी केले.

# शासकीय धान्य गोदामातील कामगारांचे थकीत पगार करा

- आ.अभिजीत पाटलांनी उठविला आवाज
- कामगारमंत्र्यांकडून मागणीची दखल

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.१७ जुलै -**

सोलापूर जिल्ह्याबरोबरच संपूर्ण महाराष्ट्रातील शासकीय धान्य गोदामातील हमाल कामगारांचे पगार कित्येक वर्षापासून थकीत आहेत. ते पगार लवकरात लवकर करण्यासाठी प्रश्नोत्तरच्या कालावधीत विधानभवनात शासकीय धान्य गोदामातील कामगारांचे पगार कधी मिळणार यावर आमदार अभिजीत पाटील यांनी प्रश्न उपस्थित करून कामगारांचे पगार लवकर करण्याची मागणी केली.

याविषयी आमदार पाटील यांनी सोलापूर जिल्हा धान्य गोदामातील नोंदणीकृत कामगारांचे लेव्हीसह पगार प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेच्या आत माथाडी बोर्डात भरणा करणे आवश्यक आहे. परंतू चालू पगार जानेवारी २०२५ पासून तर पंतप्रधान मोफतमधील सन २०२१-२२ पासून आतापर्यंत झाले नाहीत. हातावर पोट असणार्या कामगारांना पगार वेळेत न झाल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. त्यामुळे विधानभवनामध्ये आमदार पाटील यांनी प्रश्नोत्तराच्या सत्रात कामगारांचे पगार कधी मिळणार यावर प्रश्न उपस्थित करून मंत्री महोदयांनी लवकरात लवकर त्यांचे पगार करावेत अशी मागणी केली.

आमदार अभिजीत पाटील यांनी शासकीय धान्य गोदामातील हमाल कामगारांच्या थकीत पगाराबद्दल प्रश्न उपस्थित केल्याबद्दल आ.अभिजीत पाटील यांचे महाराष्ट्र राज्य हमाल-मापाडी महामंडळाचे अध्यक्ष डॉ.बाबा आढाव, सोलापूरचे जिल्हाध्यक्ष शिवाजीराव शिंदे तसेच सर्व शासकीय धान्य गोदामातील कामगारांनी अभिनंदन केले आहे.

### पुरवठा अधिकाऱ्यांची बैठक लावणार

याबाबत बोलताना कामगारमंत्री आकाश फुंडकर यांनी, हा प्रश्न व्यापक असून संपूर्ण महाराष्ट्रातील शासकीय धान्यगोदामातील कामगारांचा आहे. आमदार पाटील यांनी मांडलेला हा प्रश्न अत्यंत ज्वलंत आहे. राज्यातील अनेक शासकीय धान्य गोदामातील कामगारांचे पगार देणे बाकी आहे. या संदर्भात पुरवठा विभागातील अधिकाऱ्यांची बैठक घेवून लवकरच हा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले.

## महत्वाचे...



### अण्णाभाऊ साठे मिरवणुकीस रात्री १२ वाजेपर्यंत परवानगी द्या; वंचित बहुजन आघाडीची मागणी

**सोलापूर दि. १७ जुलै-**

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त निघणाऱ्या सांगता मिरवणुकीस रात्री १२ वाजेपर्यंत परवानगी देण्यात यावी, या मागणीचे वंचित बहुजन आघाडी सोलापूर शाखेच्या वतीने जिल्हाधिकारी यांना देण्यात आले. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त मातंग समाज बांधव बहुजन समाज बांधव मोठ्या संख्येने साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती मिरवणूक पाहण्यासाठी येतो. त्यामध्ये साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनावरील घडामोडी तसेच त्यांनी लिहिलेले साहित्य याचे प्रबोधनात्मक देखावे सादर केले जातात, असे निवेदनात म्हटले आहे. यावेळी शहराध्यक्ष प्रशांत गोणेवार, शहर प्रसिद्धी प्रमुख बाळासाहेब रणदिवे, महासचिव विनोद इंगळे, उपाध्यक्ष रोहित लालसरे, विक्रांत गायकवाड, श्रीनिवास सांगेपाग, रवी म्हेत्रे, मल्लिकार्जुन हिरेमठ, शरीफ शेख आदी उपस्थित होते.

### विजेच्या तीव्र धक्क्याने विद्यार्थ्याचा मृत्यू

**सोलापूर, दि. १७ जुलै-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील गुळवंची गावात घरातील पाण्याच्या हौदात पडलेला जार काढत असताना विजेच्या तीव्र धक्का बसला. यामध्ये एकुलता एक सोळा वर्षाच्या मुलाचा मृत्यू झाला. ही घटना गुरुवारी सकाळी उघडकीस आली. आदित्य सिताराम मोहिते (वय १६ रा. गुळवंची) असे मयत मुलाचे नावे आहे. त्याने दहावीपरीक्षा पास झाला होता, नुकतेच अकरावीत प्रवेश घेतला होता. गुरुवारी सकाळी सहा वाजता आदित्य नेहमीप्रमाणे व्यायाम करून घरी आला. घरी आल्यावर त्याला पाण्याच्या हौदात पाण्याचा जार पडलेला दिसला. काढण्यासाठी तो हैदावर चढला. त्याच्या हात पत्र्याच्या अंगलला लागला. आणि त्याला वीजेचा धक्का बसला. हे लक्षात येता नातेवाईकांनी वीजेचा प्रवाह खंडीत केला. मात्र तो पर्यंत आदित्य पाण्याच्या हौदात कोसळला होता. त्यास तात्काळ हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल केले,मात्र उपचारापूर्वीच मयत झाला होता. याची नोंद सोलापूर तालुका पोलिसांत झाली आहे.



# नामदेव विठ्ठल मंदिरात सप्ताहाची विणा पूजनाने सुरुवात

### संत नामदेवांच्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त सप्ताहाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ जुलै-**

संत नामदेव महाराज यांच्या ६७५ व्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त येथील बाळीवेस परिसरातील श्री संत शिरोमणी नामदेव विठ्ठल मंदिरात बुधवार दि. १६ जुलैपासून नामदेव गाथा पारायण व अखंड हरिनाम संकीर्तन सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

या सप्ताहाची सुरवात ग्रंथ, ध्वज, वीणा पूजनाने झाली. यामध्ये दररोज पहाटे काकडा आरती सकाळी ७ ते ९ नामदेव गाथा पारायण, सकाळी ११ ते १२ गाथा भजन, दुपारी २.३० ते ४.३० महिलांचे भजन, सायंकाळी ५ ते ६ ज्ञानेश्वरी प्रवचन, ६ ते ७ हरिपाठ व रात्रो ८.३० ते १०.३० हरिकीर्तन होणार आहे. दि. १३ जुलै रोजी सायंकाळी ४ वाजता संत नामदेव सांस्कृतिक भवन येथे होम मिनिस्टर कार्यक्रम पार पडला. शनिवार दि. १९ जुलै रोजी मोफत नेत्र तपासणी शिबिर होणार आहे. यामध्ये डॉ. नवनीत व डॉ. निखिल तोष्णीवाल हे तपासणी करणार आहेत. रविवारी दि. २० जुलै रोजी सकाळी १० ते ३ या वेळेत रक्तदान शिबीर होणार आहे. नामसप्ताहात हभप केशव महाराज भडंगे (सोलापूर), हभप संतोष महाराज माळवदकर (सोलापूर), हभप श्याम महाराज जोशी (सोलापूर), हभप गुरुवर्य गोपाळबुवा नांदेडकर यांची प्रवचन सेवा होणार आहे. संत नामदेव महाराजांचे विद्यमान वंशज हभप एकनाथ महाराज नामदास यांचे बुधवारी तर गुरुवारी हभप माऊली महाराज बचुटे यांचे कीर्तन झाले.



शुक्रवारी दि. १८ जुलै रोजी देहूच्या गाथा मंदिराचे संस्थापक हभप पांडुरंग महाराज घुले, दि. १९ जुलै रोजी शनिवारी हभप उमेश महाराज दशरथे (आळंदी), रविवारी दि. २० जुलै रोजी आळंदीच्या वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हभप संदीपान महाराज हासेगावकर, सोमवाारी दि. २१ जुलै रोजी विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सहअध्यक्ष हभप गुरुवर्य गहिनीनाथ महाराज औसेकर, मंगळवार दि. २२ जुलै रोजी हभप गुरुवर्य गोपाळबुवा नांदेडकर यांची कीर्तनसेवा होणार आहे. बुधवार, दि. २३ जुलै रोजी सकाळी १० ते १२ हभप संदीप महाराज वैद्य यांचे गुलालाचे कीर्तन होणार आहे. गुरुवार, दि. २४ जुलै रोजी वै. हभप दगडोबाबुवा होमकर यांच्या ४९ व्या पुण्यतिथीनिमित्त सकाळी ११ ते १२ हभप अभिमन्यू महाराज पाटील (कोंडी) यांचे प्रवचन होणार आहे.

बुधवार दि. २३ जुलै रोजी सायंकाळी ५ वाजता संत शिरोमणी नामदेव महाराजांच्या प्रतिमेची पालखीतून भव्य दिंडी मिरवणूक व त्यानंतर दहिहंडी कार्यक्रम होणार आहे. या सर्व कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन विश्वस्त मंडळ व समस्त नामदेव शिंपी समाज यांनी केले आहे.

# बांधकाम विकास शुल्क व प्रीमियम चार्जेसमधून १२ कोटींची वसुली

### ऑनलाईन प्रणालीद्वारे पारदर्शकता वाढवण्याचे प्रयत्न यशस्वी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १७ जुलै-**

सोलापूर महानगरपालिकेच्या नगररचना विभागाने बांधकाम विकास शुल्क व प्रीमियम चार्जेसमधून आर्थिक वर्षाच्या पहिल्या टप्प्यातच उल्लेखनीय अशी १२ कोटींची वसुली केली आहे. प्रशासनाने दिलेले १५ कोटीं रुपयांचे उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल असून, या कामगिरीमुळे महापालिकेच्या महसूलात ठोस भर पडली आहे.

नगररचना विभागामार्फत नवीन बांधकाम परवानग्या, लेआऊट परवानग्या आणि विविध प्रीमियम चार्जेस संदर्भात अधिकाऱ्यांनी नियमांनुसार अंमलबजावणी करत काटेकोर व प्रभावी कारवाई केली. यामुळे अनेक बिल्डर्स व विकासकांनी स्वेच्छेने शुल्क भरत नियोजनबद्ध कामकाज सुरू केले.

या कामगिरीत नगर रचना उपसंचालक मनीष भिष्णुरकर व त्यांच्या टीमचे योगदान लाभले. आयुक्त डॉ. ओम्बासे यांच्यातर्फे देण्यात आलेल्या मार्गदर्शनानुसार अर्ज प्रक्रियेचे सुलभीकरण, शुल्क आकारणीची स्पष्टता आणि ऑनलाईन प्रणालीद्वारे पारदर्शकता वाढवण्याचे प्रयत्नही यशस्वी ठरले. महानगरपालिका येत्या काळात आणखी बांधकाम प्रकल्पांसंदर्भात मंजुरी प्रक्रिया गतीमान करणार असून, विकास शुल्क संकलनात पारदर्शकता व नियमबद्धता यांवर अधिक भर दिला जाणार आहे.

> **आर्थिक शिस्त, नियोजनबद्ध कामगिरी कौतुकास्पद : डॉ. ओम्बासे**
>
> या अनुषंगाने महापालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी समाधान व्यक्त करत म्हटले की, ''महानगरपालिकेच्या स्वराज्य निधीचे सर्वात महत्त्वाचे स्त्रोत म्हणजे मालमत्ता कर व बांधकाम शुल्क. नगररचना विभागाने दाखवलेली आर्थिक शिस्त आणि नियोजनबद्ध कामगिरी कौतुकास्पद आहे. उर्वरित ३ कोटी वसुली पूर्ण करण्यासाठीही तितक्याच जोमाने प्रयत्न व्हावेत.

# आनंद शिंदे आत्महत्या प्रकरणात अरुण रोडगे यास अंतरिम अटकपूर्व जामीन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १७ जुलै -**

आनंद शिंदे यास आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी अरुण प्रभाकर रोडगे (रा. सोलापूर) यांस प्रमुख जिल्हा न्यायाधीश मनोज शर्मा यांनी अंतरीम अटकपूर्व जामीन मंजूर केला.

मयत आनंद व सकलेस जाधव यांचेत सात रस्ता येथे भांडण झाले होते. त्याबाबत सदर बझार पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली होती.तसेच सुमारे सहा महिन्यापूर्वी अरुण रोडगे व मयत आनंद यांच्यात भांडण झाले होते. तेव्हा अरुण रोडगे यांनी मयतास मारहाण केली होती. त्यानंतर सकलेस जाधव व अरुण रोडगे हे दोघे मयत आनंद यास त्रास देत होते. असे मयताने त्याच्या आईस सांगितले होते. १५ जुलै रोजी आनंदची मावशी ही स्वयंपाकासाठी बाहेर गेली होती, त्यावेळी आनंद हा घरी एकटाच होता. दुपारी सव्वा एक वाजता मावशी कामावरून घरी आली, त्यावेळेस आनंद हा गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसून आला. त्यावेळी त्याच्या हातात दोन चिठ्ठ्या मिळून आल्या होत्या. या चिठ्ठ्यांमध्ये ''मी असा नव्हतो, माझी इच्छा न्हवती फाशी घ्यायची मला घ्यायला भाग पाडले, माझा मोबाईल हॅक करून निराश केले अरुण रोडगे व दुसऱ्या चिठ्ठी मध्ये सकलेस जाधव व सही असे लिहिलेले होते. त्यावरून अंजना दादाराव शिंदे हिने दिलेल्या फिर्यादीवरुन सकलेस जाधव व अरुण रोडगे यांच्याविरुध्द सलगर वस्ती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.



या गुन्ह्यात अटक होऊ नये म्हणून अरुण रोडगे यांनी न्यायालयात अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केला होता. त्यावर सुनावणी झाली. त्यावेळी सकृतदर्शनी आत्महत्येस प्रवृत्त केल्याचे दिसून येत नसल्याचा युक्तिवाद आरोपींच्या वकिलांनी मांडला. तो ग्राह्य धरून न्यायाधीश शर्मा यांनी २५ हजार रुपयाच्या जातमुचलक्यावर पाच दिवस पोलिस ठाण्यात हजेरी देण्याच्या अटीवर रोडगे यांस अंतरिम अटकपूर्व जामीन मंजूर केला.यात आरोपीतर्फे अॅड. मिलिंद थोबडे, अॅड. दत्ता गुंड यांनी काम पाहिले.

# सोनू सूद चॅरिटी फाउंडेशनचे कार्य कौतुकास्पद : खा. शिंदे

### सिव्हिलमधील १०६ किलो वॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पाचे लोकार्पण

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर दि. १७ जुलै -**

कोरोना काळापासून सिनेअभिनेते सोनू सूद यांनी सर्वसामान्य नागरिकांना मदतीसाठी कायम हात पुढे केलेला आहे. त्यांनी सिव्हिल हॉस्पिटलमधील विजेचा प्रश्न लक्षात घेऊन १०६ किलो वॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प दिला असून त्यामुळे रुग्णांची मोठ्या प्रमाणात सेवा होईल आणि हॉस्पिटलचे वर्षाकाठी २५ ते ३० लाख रुपयाचे वीज बिलाचे पैसे वाचतील. महाराष्ट्रामध्ये सोनू सूद चारिटी फाउंडेशनचे कार्य कौतुकास्पद असल्याचे मत खासदार प्रणिती शिंदे यांनी व्यक्त केले.

श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय येथे सोनू सूद चॅरिटी फाउंडेशन यांच्यामार्फत सौर ऊर्जा प्रकल्प सीएसआर (देणगी) स्वरूपात बसविण्यात आला. या प्रकल्पाचे लोकार्पणप्रंसगी त्या बोलत होत्या. श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ.ऋत्विक जयकर यांनी कार्यक्रमाचे प्रस्ताविक केले. यावेळी डॉ. नरेश झंजाड, उपअधिष्ठाता डॉ. विद्या तिरणकर, डॉ. संपत्ती तोडकर, वैद्यकीय अधीक्षक डॉ. अग्रजा चिटणीस मुख्य वैद्यकीय अधिकारी तसेच रुग्णालयाचे इतर विभागप्रमुख व सोनू सूद चॅरिटी क्लब अभिनेता सोनू सुद, चॅरिटी फाउंडेशनचे एक्झिक्यूटिव्ह डायरेक्टर सुमिता साळवे, विपुल मिरजकर, अध्यक्ष आनंद पवार, ज्योती कालुबरमे, शरणाप्पा फुलारी, भास्कर नडिमेटला, सदानंद रापेल्ली, अजय मद्दल, नितेश मोटेकर, शुभम सब्बन, तृप्ती अण्णे, देविका डक्का, राधाराणी रापेल्ली, तेजल परदेसी, प्रकाश असादे आदी उपस्थित होते.



> **भविष्यातील मदतीचा ओघ सुरू ठेवू**
>
> क्लबचे अध्यक्ष विपुल मिरजकर म्हणाले, या रुग्णालयात शेजारच्या जिल्ह्यासह आंध्र, तेलंगणा, कर्नाटक राज्यातूनही रुग्ण दाखल होतात. त्या रुग्णाला वीजेअभावी अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत होते. या फाउंडेशनच्या माध्यमातून या समस्यां सोडवण्याचा प्रयत्न केला आहे. भविष्यातील सिव्हिल हॉस्पिटलसाठी आपण मदतीचा ओघ सुरू ठेवू.

# शालेय शिक्षण मूल्यांकन प्रणालीत सोलापूरचा राज्यात तिसरा क्रमांक

### शिक्षणाधिकारी शेख यांचा प्रधान सचिवांच्या हस्ते गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ जुलै-**

परफॉर्मन्स ग्रेडिंग इंडेक्स PGI या शालेय शिक्षण मूल्यांकन प्रणालीमध्ये महाराष्ट्रात सोलापूर जिल्ह्याने राज्यात तिसरा क्रमांक पटकावला आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल यांच्या हस्ते राज्यस्तरीय कार्यशाळेत प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख, माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप, डायटचे प्राचार्य राजे व योजना शिक्षणाधिकारी सुलभा वटारे यांच्या समवेत गौरव स्वीकारण्यात आला.

या यशामागे सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांचे प्रेरणादायी मार्गदर्शन, तसेच शिक्षण विभागातील सर्व घटकांचे एकत्रित परिश्रम आणि समर्पण हे कारणीभूत ठरले आहेत.



यावेळी प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी सर्व शिक्षण विभागाच्या वतीने मनःपूर्वक अभिनंदन व्यक्त करत म्हटले की, ही जिल्ह्याच्या एकत्रित प्रयत्नांची फलश्रुती आहे. शिक्षक, सर्व तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी, कर्मचारी, सर्वांनी जबाबदारीने काम करत सोलापूरचे नाव उज्ज्वल केला आहे. आपण सर्वांनी याच आत्मियतेने पुढेही कार्य करत राहावे. Performance Grading Index ही भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयामार्फत विकसित केलेली एक मूल्यांकन प्रणाली आहे. यामध्ये राज्य व केंद्रशासित प्रदेशांच्या शालेय शिक्षणाच्या कामगिरीचे मूल्यांकन करण्यात येते. इत्रव्र चा उद्देश म्हणजे गुणवत्तापूर्ण शिक्षणास चालना देणे, कमकुवत बाबींचा शोध घेऊन सुधारणा सुचवणे आणि डेटा-आधारित धोरणनिर्मितीला प्रोत्साहन देणे. PGI मध्ये एकूण १००० गुणांची रचना असून त्यात ५ प्रमुख घटक आणि विविध उपघटक आहेत. या प्रणालीमुळे राज्यांमध्ये गुणवत्तेवर आधारित स्पर्धा निर्माण होते व सुधारण्याच्या दिशा स्पष्ट होतात.



सोलापूर : ७८ किमी या ऐतिहासिक अल्ट्रा रन या लिंकचे उद्‌घाटन अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकूर यांनी केले.

# ७८ कि.मी. ऐतिहासिक अल्ट्रा रन १४ ऑगस्टला

### चॅलेंजर रनर्स फाउंडेशनचा सलग चौथा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ जुलै-**

देशप्रेम, फिटनेस आणि सामाजिक सहभागाचा आदर्श निर्माण करणारे चॅलेंजर रनर्स फाउंडेशन सलग चौथ्या वर्षी ७८ कि.मी. अल्ट्रा रनिंगचा एक अनोखा आणि ऐतिहासिक उपक्रम १४ व १५ ऑगस्टला करणार आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त २०२२मध्ये सुरू झालेला हा उपक्रम दरवर्षी १ किमीने वाढवत, यंदा ७८ किमीपर्यंत पोहोचला आहे. हा उपक्रम १४ ऑगस्ट संध्याकाळी सुरू होऊन १५ ऑगस्टपर्यंत चालणार आहे. या उपक्रमाच्या अधिकृत लिंकचे उद्घाटन अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. यासाठी सोलापूर पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांचे मार्गदर्शन लाभले आहे. सर्व क्रीडाप्रेमीसाठी सहभाग आणि प्रोत्साहनासाठी आमंत्रण असून सहभागी होण्यासाठी लिंक सक्रिय आहे. नोंदणीसाठी संपर्क अतिश शहा (९१७५८२८२०३) अथवा सचिव चंद्रशेखर गायकवाड (७३५०५१३१९७) यांच्याशी संपर्क साधावा.

**असे आहे उपक्रमाचे स्वरूप**

व्हर्च्युअल रन (१ ते १५ ऑगस्ट दरम्यान, कोठेही): ३, ५, १०, १५ आणि २१ किमी ऑन-रोड अल्ट्रा रन (१४-१५ ऑगस्ट, सोलापूर शहरात): २५, ५० आणि ७८ किमी




हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## सायली साठे यांना संगीतरत्न पुरस्कार जाहीर



**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. १७ जुलै-**

सुरसंगम ग्रुपच्या नवव्या वर्धापनदिनानिमित्त दरवर्षी देण्यात येणारा संगीतरत्न पुरस्कार यावर्षी सोलापूर येथील गायिका सायली साठे यांना जाहीर करण्यात आला आहे.

सायली साठे यांनी इयत्ता चौथीपासून शास्त्रीय संगीताचे शिक्षण घेण्यास सुरुवात करून विशेष प्राविण्य मिळविले असून त्या एमबीए आहेत. हिंदी, मराठी, कन्नड, तेलगू, गुजराती, राजस्थानी आदी भाषांमधील कार्यक्रमामध्ये त्यांनी आजवर ६१४० पेक्षा जास्त कार्यक्रम केले असून कार्यक्रमाच्या माध्यमातून त्यांनी भारतभर दौरे केले आहेत. आजवर त्यांना सोलापूर आयडॉल, पुणे टॅलेंट,वुमन ऑफ द सोलापूर आदी पुरस्कार मिळाले असून अनेक मान्यवर गायकांसोबत गीत गायनाची संधीही मिळालेली आहे.

सुरसंगमच्या राज्यस्तरीय पुरस्काराचे वितरण १८ जुलै रोजी मंगळवेढा येथे रात्रौ ८ वा. मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

## ▶▶ महत्वाचे...

### इंडियन दलित सेनेच्या वतीने रविवारी गुणवंतांचा सन्मान

**सोलापूर, दि. १७ जुलै-**

इंडियन दलित सेनेच्या शहर जिल्ह्याच्या वतीने दहावी, बारावी पास झालेल्या ६० टक्के पेक्षा जास्त मार्क घेतलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार रविवार दि. २० जुलै रोजी समाजकल्याण हॉल, रंगभवन येथे दुपारी २ वाजता करण्यात येणार आहे. कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, सामाजिक न्याय विभागाचे सहाय्यक आयुक्त सुलोचना सोनवणे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहर अध्यक्ष सुधीर खरटमल, संघटनेचे संस्थापक अध्यक्ष देविदास दुपारगुडे यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित केला आहे. शहरातील गुणवंतांनी व संघटनेतील पदाधिकाऱ्यांनी वेळेवर उपस्थित रहावे, असे आवाहन शहर अध्यक्ष सुहास बिराजदार यांनी केले आहे.

### दारू पिण्यास पैसे न दिल्यावरून मारहाण

**सोलापूर, दि. १७ जुलै-**

दारू पिण्यास पैसे न दिल्याच्या कारणावरून घोडातांडा (ता. दक्षिण सोलापूर) येथे हाणामारी करून पती-पत्नीस मारहाण करणाऱ्या तिघांविरुध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत ज्ञानू रामु राठोड (वय ४९, रा. घोडातांडा) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन बाबुल दशरथ पवार, अनिल दशरथ पवार, रोहित दशरथ पवार (रा. घोडातांडा) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



१६ जुलै रोजी दुपारी ज्ञानू राठोड यांची पत्नी त्यांच्या किराणा दुकानात बसलेल्या होत्या. त्यावेळी बाबुल पवार हा दारू पिऊन आला व त्याने राठोड यांच्या पत्नीस दारूला पैसे दे म्हणाला. त्यावेळी राठोड यांच्या पत्नीने पैसे देण्यास नकार दिला असता बाबूल याने राठोड यांच्या पत्नीस शिवीगाळ करून मारहाण केली. त्यावेळी ज्ञानू राठोड हे काय झाले असे विचारले असता पवार याने हातातील लोखंडी वस्तुने मारहाण केली. त्यामध्ये हनुवटीखाली मार लागून राठोड हे जखमी झाले. तसेच राठोड यांचे भाऊ रामु व त्यांची पत्नी गंगूबाई हे भांडण सोडविण्यासाठी आले असता अनिल पवार व रोहित पवार यांनी त्यांनादेखील शिवीगाळ करून हाताने मारहाण केली. तसेच खल्लास करण्याची धमकी दिली. म्हणून विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार घुगे पुढील तपास करीत आहेत.

# सोलापूरला देशात २३वे तर राज्यात सहावे मानांकन

## स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत शहर झाले हागणदारीमुक्त | ODF++ व 3 स्टार मानांकन प्राप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ जुलै-**

स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०२४ मध्ये ३ ते १० लाख लोकसंख्येच्या श्रेणीमध्ये सोलापूर शहरास राष्ट्रीय पातळीवर ६३ क्रमांकावरून २३ वा क्रमांक प्राप्त झाला असून राज्य पातळीवर १४ क्रमांकावरून ६ क्रमांकावर मानांकन प्राप्त झाले आहे. तसेच सोलापूर शहरास ODF++ व ३ स्टार मानांकन प्राप्त झाले आहे. मागील वर्षाच्या तुलनेत मोठा प्रमाणात सुधारणा झाली आहे.

स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत या सर्व स्वच्छता कामकाजाचे केंद्र शासनाच्या पथकाकडून दि.२४ ते २९ मार्च २०२५ या कालावधीत स्वच्छ सर्वेक्षण तपासणी, दि.२२ ते २५ एप्रिल २०२५ या कालावधीत शहरातील सार्वजनिक शौचालयाचे सर्वेक्षण, दि.२५ ते २८ एप्रिल २०२५ या कालावधीत कचरामुक्त शहर मानांकनासाठी (Garbage Free Cities) सर्वेक्षण हाती घेण्यात आलेले होते. या सर्वेक्षणाचा निकाल आज दिल्लीत जाहीर करण्यात आला आहे. नागरिकांचा प्रतिसाद आणि महापालिका प्रशासनाचे प्रयत्न याला गुण दिले जातात. त्यानुसार हे मानांकन दिले जाते. सोलापूर महापालिकेच्या मानांकनामध्ये यावर्षी मोठ्या प्रमाणात सुधारणा झाल्याचे स्पष्ट होत आहे. या सर्वेक्षणामध्ये कचरामुक्त शहर यामध्ये सोलापूर महापालिकेत ३ स्टार मानांकन प्राप्त झाले असून शहरातील उघड्यावर शौचास बसण्याची ठिकाणे पूर्णपणे बंद करणेत आली असून नागरिकांना वैयक्तिक शौचालय योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे. अशी ठिकाणे बंद झाल्याने शहर हे हागणदारीमुक्त झाले असून याकरिता जञ्क्क++ मानांकन प्राप्त झाले आहे.या अभियानांतर्गत ३ ते १० लाख लोकसंख्येचे श्रेणीमध्ये करण्यात आलेल्या सर्वेक्षणामध्ये सोलापूर शहरास राष्ट्रीय पातळीवर ६३ क्रमांकावरून २३ वा क्रमांक प्राप्त झाला असून राज्य पातळीवर १४ क्रमांकावरून ६ क्रमांकावर मानांकन प्राप्त झाले आहे. सोलापूरने दृश्यमान स्वच्छता यासह इतर मुद्द्यांवर चांगले कामगिरी बजावली आहे.



यासाठी महानगरपालिकेचे आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांचे मार्गदर्शन तसेच अतिरिक्त आयुक्त रवि पवार, सहायक आयुक्त शशिकांत भोसले यांच्या नियंत्रणाखाली मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार यांच्या माध्यमातून घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या योगदानामुळे हे शक्य झालेले आहे. याबद्दल महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे कौतुक केले आहे.

### ● सर्वेक्षणात सोलापूरला मिळाले ९,८१२ गुण

राष्ट्रीय पातळीवरील या सर्वेक्षणात एकूण ४ हजार ५८९ शहरांनी सहभाग नोंदवला होता. विविध मुद्द्यांच्या आधारावर एकूण १२ हजार ५०० गुणांची ही सर्वेक्षण परीक्षा होती. सोलापूर शहराला यामध्ये एकूण ९ हजार ८१२ गुण मिळाले आहेत. महाराष्ट्रातील प्रथम स्थानी आलेल्या मीरा-भाईंदर महापालिकेला एकूण ११ हजार ६५२ गुण मिळाले. सोलापूर शहराला राष्ट्रीय पातळीवर २३ वा क्रमांक तर महाराष्ट्र राज्य पातळीवर ६ क्रमांकाचे मानांकन प्राप्त झाले आहे.

### ● सोलापूरला महाराष्ट्रात प्रथम किंवा दुसरा आणण्याचा प्रयत्न : रवी पवार

दरम्यान, पुढील स्वच्छ सर्वेक्षणात सोलापूरचा महाराष्ट्रात प्रथम किंवा द्वितीय क्रमांक आणि भारतात पहिल्या पाच मध्ये आणण्यासाठी नेटक्या पद्धतीने प्रयत्न करण्यात येतील. शहरातील नागरिकांनी साथ दिल्यास सर्व काही शक्य आहे. नागरिकांनी ओला व सुका कचरा विलगीकरण करूनच घंटागाडीत टाकावा. स्वच्छ सोलापूर - सुंदर सोलापूरसाठी सर्वांनीच हातभार लावावा, असे आवाहन महापालिका अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी केले आहे.

### ● या दहा मुद्द्यांवर दिले जातात गुण

या सर्वेक्षणात दृश्यमान स्वच्छता, कचऱ्याचे पृथक्करण, संकलन आणि वाहतूक,घन कचरा व्यवस्थापन, स्वच्छतेची उपलब्धता,वापरलेले पाणी व्यवस्थापन, डिस्लजिंग सेवांचे यांत्रिकीकरण, स्वच्छतेसाठी पुरस्कार, परिसंस्थेचे बळकटीकरण आणि संस्थात्मक मापदंड, स्वच्छता कामगारांचे एकूण कल्याण, नागरिकांचा अभिप्राय आणि तक्रार निवारण दहा मुद्द्यांवर १० हजार गुणांपैकी त्या त्यानुसार गुण देण्यात आले आहेत.

### ● तत्कालीन उपायुक्त रवी पवार यांच्या प्रयत्नाने मीरा–भाईंदर अव्वल

मीरा-भाईंदर महापालिकेत या सर्वेक्षणाच्या वेळी उपायुक्त म्हणून घनकचरा व्यवस्थापनाची मोठी जबाबदारी तेथील तत्कालीन उपायुक्त रवी पवार यांच्याकडे होती या सर्वेक्षणाच्या यशस्वीतेसाठी त्यांनी तेथे महत्त्वपूर्ण असे प्रयत्न केले. यामुळेच मीरा-भाईंदर महापालिका राज्यात अव्वल स्थानी आली आहे. तर अतिरिक्त आयुक्त म्हणून सोलापूर महापालिकेत त्यांनी स्वच्छता मोहिमेंचा चांगला धडाका लावला आहे. सोलापूरच्या ही मानांकनात या सर्वेक्षणात मोठी सुधारणा झाल्याचे दिसून येते.

## सोलापुरात रंगणार सूर-तालांचा महोत्सव

### रविवारी बालगंधर्व नाट्यगीत गायन स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ जुलै-**

शहरातील संगीतप्रेमींसाठी एक आनंदाची बातमी! येत्या २० जुलै रोजी (रविवार) सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत शुभराय मठ, दत्त चौक, सोलापूर येथे बालगंधर्व नाट्यगीत गायन स्पर्धेचे आयोजन अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद उपनगरीय शाखेच्या वतीने करण्यात आले आहे. या स्पर्धेत तबला व हार्मोनियमवादकांची रंगतदार मैफिल पाहायला मिळणार आहे.

स्पर्धकांनी स्पर्धेसाठी स्वतः वादक (तबला किंवा हार्मोनियम) सोबत आणावेत. संयोजकांकडून केवळ वाद्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रवेश फी १०० रुपये असून ती राजा जाधव (मो. ९००६६१६७६०) यांच्याकडे रोखीने किंवा ऑनलाइन स्वरूपात भरता येईल. स्पर्धकांनी आपली नोंदणी स्पर्धेपूर्वी पूर्ण करणे आवश्यक आहे. नोंदणीनंतर स्पर्धकांनी नाव, वय, पत्ता, मोबाइल क्रमांक, ई-मेल आयडी, आणि अचूक जन्मतारीख यासह फॉर्म भरावा लागेल. प्रत्येक स्पर्धकाला सहभाग प्रमाणपत्र दिले जाईल. लहान गटासाठी तीन हजार, दोन हजार व एक हजार तर खुल्या गटासाठी पाच हजार, तीन हजार व दोन हजार रुपये असे रोख पारितोषिके ठेवण्यात आली आहेत. स्मृतीचिन्ह आणि प्रमाणपत्रासह विजेत्यांचा गौरव केला जाईल. लहान गटाला सिद्धा पाटील यांच्या स्मरणार्थ पाटील परिवारातर्फे आणि मोठ्या गटासाठी पद्माकर देव यांचे स्मरणार्थ विजय दादा साळुंखे यांच्या वतीने स्मृतिचिन्हे देण्यात येणार आहे स्पर्धा संपल्यानंतर लगेचच पारितोषिक वितरण समारंभ पार पडेल. परीक्षकांचा निर्णय अंतिम मानला जाईल.

## ब्राह्मण समाजसेवा संघ, चाटी ट्रस्टचे पुरस्कार जाहीर

### ● अकलूजचे डॉ.इनामदार आणि कुर्डूवाडीचे डॉ.करंदीकर मानकरी



डॉ. मनोहर इनामदार



डॉ. जयंत करंदीकर



प्रशांतराव परिचारक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ जुलै-**

ब्राह्मण समाज सेवा संघ सोलापूर आणि चाटी ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने प्रतिवर्षी ब्राह्मण समाजातील महनीय व्यक्तींना जीवनगौरव आणि समाजभूषण पुरस्काराने सन्मानित केले जाते. त्याप्रमाणे यावर्षी दोन्ही पुरस्कारांची घोषणा करण्यात येत आहे. यावर्षी डॉ. त्र्यंबक लक्ष्मण चाटी स्मृती जीवन गौरव पुरस्कार अकलूजचे डॉ. मनोहर इनामदार यांना दिला जाईल तर समाजभूषण पुरस्कार कुर्डूवाडीचे डॉ. जयंत करंदीकर यांना प्रदान केला जाणार आहे, अशी माहिती चाटी ट्रस्टच्या अध्यक्षा मीनाताई चाटी आणि ब्राह्मण सेवा संघाचे सचिव वामन कुलकर्णी यांनी दिली.

ब्राह्मण समाज सेवा संस्था

शाल, श्रीफळ, पुणेरी पगडी, मानपत्र आणि २१ हजार रुपये रोख असे जीवनगौरव पुरस्काराचे स्वरूप आहे तर शाल, श्रीफळ, पुणेरी पगडी, मानपत्र आणि ११ हजार रुपये रोख असे समाजभूषण पुरस्काराचे स्वरूप आहे.

हा पुरस्कार वितरण समारंभ रविवार २० जुलै रोजी सायंकाळी साडे पाच वाजता डफरीन चौकातील इंडियन मेडिकल असोसिएशनच्या सभागृहात पंढरपूरचे माजी आमदार प्रशांतराव परिचारक यांच्या हस्ते होणार आहे. यापूर्वी जीवन गौरव पुरस्कार सांगोल्याच्या संजीवनी केळकर, डॉ. मंजिरी चितळे, डॉ. प्रधान, डॉ. विजय कानेटकर, नेत्रतज्ञ डॉ. अलबाळ यांना देण्यात आला आहे तर समाजभूषण पुरस्कार मूळचे सोलापूरचे असलेले आणि सध्या नाशिक मध्ये उद्योजक असलेले मुकुंदराव कुलकर्णी, पी.एम. हर्षे यांना देण्यात आलेला आहे. यावर्षीचे हे दोन्हीही पुरस्कार सोलापूर शहराबाहेरील व्यक्तींना प्रदान केले जाणार असल्याचेही मीनाताई चाटी यांनी सांगितले.

तरी रविवारी होणाऱ्या या पुरस्कार वितरण सोहळ्यास समाजातील सर्व नागरिकांनी हितचिंतकांनी कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन चाटी ट्रस्टचे सचिव राम तळवळकर यांनी केले आहे.



## दुचाकी चोरणाऱ्या एकाच गावातील मित्रांना अटक

### ● ७ लाख ७० हजारांच्या १५ दुचाकी जप्त; शहर गुन्हे शाखेची कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ जुलै-**

सोलापूर शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी दुचाकी चोरणाऱ्या एकाच गावात राहणाऱ्या मित्रांना अटक केली असून त्यांच्याकडून चोरीच्या ७ लाख ७० हजार रुपये किंमतीच्या १५ दुचाकी जप्त केलेल्या आहेत.

कृष्णात उर्फ आण्णा महादेव डोंगरे (वय २५, रा. मंगरुळ, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) आणि शुभम भागवत सावंत (वय २८, रा. चिंचोली, ता. तुळजापूर, जि. धाराशिव, सध्या रा. मंगरुळ, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. या कृष्णात डोंगरे याने सोलापूर शहर, लातूर, पुणे, इंदापूर, भिगवण, रत्नागिरी, बिदर (कर्नाटक) येथे दुचाकी चोऱ्या केल्या आहेत तर शुभम सावंत याने सोलापूर शहरात दुचाकी चोऱ्या केल्या आहेत.

शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांना मिळालेल्या माहितीवरून शेळगी रोड परिसरातून एका संशयितास चोरीच्या दुचाकीसह ताब्यत घेतले. त्यावेळी पोलिसांनी त्याच्याकडे चौकशी केली असता त्याने त्याचे नाव कृष्णात डोंगरे असे सांगून त्याच्याकडील दुचाकी ही चोरीचे असल्याचे सांगितले.

### ● एकमेकांचे मित्र, परंतु गुन्हे मात्र वेगवेगळे केले

शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अटक केलेले कृष्णात डोंगरे व शुभम सावंत हे दोघे एकाच गावातील रहिवासी असून ते एकमेकांचे मित्र आहेत. दोघेही मजुरीचे काम करायचे. पैशाच्या चणचणीतून त्या दोघांनीही दुचाकी चोरून पैसे कमवायचा धंदा सुरु केला होता. या दोघांनीही वेगवेगळे गुन्हे करीत दुचाकी चोरल्या. आपला दुचाकी खरेदी-विक्रीचा व्यवसाय असल्याचे सांगून त्यांनी दुचाकी ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना कमी पैशात विकल्या, परंतु एकाही दुचाकीची कागदपत्रे दुचाकी खरेदी करणाऱ्यांना दिलेले नाहीत असे पोलिस तपासात उघड झाले आहे.




त्यामुळे पोलिसांनी त्याच्याकडे अधिक चौकशी करून सोलापूर शहर, लातूर, पुणे, इंदापूर, भिगवण, रत्नागिरी, बिदर येथून चोरी केलेल्या १२ दुचाकी जप्त केल्या. डोंगरे याच्याकडून सोलापूर शहरातील जोडभावी पेठ, फौजदार चावडी, जेलरोड, सोलापूर जिल्ह्यातील टेंभुर्णी, पुणे जिल्ह्यातील इंदापूर, लातूर येथील गांधी चौक पोलिस ठाणे, रत्नागिरी शहर पोलिस ठाणे, चर्तुश्रुंगी पोलिस ठाणे, दिघी पोलिस ठाणे येथील गुन्हे उघडकीस आले आहेत.

तसेच पोलिस पथकाने गोपनिय माहितीच्या आधारे शुभम सावंत यास जुना पूना नाका परिसरात चोरीच्या दुचाकीसह ताब्यात घेऊन त्याच्याकडे केलेल्या चौकशीत त्याने तीन दुचाकी चोरलेल्या असल्याचे निष्पन्न झाले. त्याच्याकडून फौजदार चावडी, एमआयडीसी, सदर बझार पोलिस ठाण्यातील दुचाकी चोरीचे गुन्हे उघडकीस आले. अशाप्रकारे पोलिसांनी या दोघांना अटक करून त्यांच्याकडून १५ दुचाकी जप्त केल्या.

ही कारवाई पोलिस आयुक्त एम राजकुमार, उपायुक्त डॉ. अश्विनी पाटील, सहायक आयुक्त राजन माने, पोलिस निरीक्षक सुनिल दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक शंकर धायगुडे, अमंलदार अंकुश भोसले, शैलेश बुगड, राजकुमार वाघमारे, अभिजित धायगुडे, काशिनाथ वाघे, सायबर पोलिस ठाण्याकडील प्रकाश गायकवाड, मच्छिंद्र राठोड यांनी केली.

### सावता महाराज संजीवन समाधी अरण तीर्थक्षेत्रास

## १५० कोटींच्या विकास आराखड्यास मान्यता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.१७ जुलै-**

महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागांमार्फत अरण (ता. माढा) येथील श्री क्षेत्र संत शिरोमणी सावता महाराज संजीवन समाधी मंदिर या तीर्थक्षेत्रास ''अ'' वर्गाचा दर्जा देण्यात आला आहे. या तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी तीर्थक्षेत्र विकास आराखडा'' या नवीन योजनेस मान्यता देण्याचा प्रस्ताव गुरुवारी १७ जुलै रोजीच्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत१५० कोटी रुपये इतक्या रक्कमेच्या विकास आराखड्यास मंत्रीमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या तीर्थक्षेत्रास ''अ'' वर्ग दर्जा देऊन तीर्थक्षेत्र विकसित करण्याची घोषणा केली होती. त्यानुसार ही मान्यता देण्यात आली. या मंजूर आराखड्यामध्ये सभा मंडप, भक्त निवास व अन्नछत्र, संतसृष्टी म्युझियम, दर्शन मंडप, स्वच्छतागृह, छत असलेली मार्गिका, देवस्थान प्रशासकीय कार्यालय, बस स्टॉप, मुख्य मंदिर जीर्णोद्धार व सुशोभिकरण, श्री विठ्ठल आणि श्री संत शिरोमणी सावता महाराज ब्राँझ पुतळा, स्कायवॉक, पाण्याची टाकी, जुनी विहीर जिर्णोद्धार व सुशोभिकरण, म्युझियम मिडिया रंगकाम व भिंती चित्रे, कमान व वाहनतळ, पालखी तळ सुधारणा, भुमी रचना (हार्डस्केप) व सौंदर्यकरण, पोच मार्ग सुधारणा, पाणी पुरवठा व ड्रेनेज लाइन, जलपुनर्भरण, कचरा संकलन प्रणाली, साइन बोर्ड/दिशा दर्शक कार्यालय, विद्युतीकरण, वातानुकुलित यंत्रणा, सीसीटीव्ही यंत्रणा इत्यादी विकास कामांचा समावेश आहे. याबाबतचा शासन निर्णय आदेश निर्गमित करण्यात येत आहे. हा विकास आराखडा तयार करण्यासाठी सोलापूर जिल्हयाचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी आराखडयाच्या अनुषंगाने ग्रामविकास विभागामार्फत शासन स्तरावर विशेष पाठपुरावा केला होता. मुख्यमंत्री फडणनवीस यांनी दिलेल्या आश्वसनाची पुर्तता केल्याबददल पालकमंत्री श्री. गोरे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांचे विशेष आभार मानले आहेत.

## बार असोसिएशनच्यावतीने रक्तदान शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.१७ जुलै-**

आंतरराष्ट्रीय न्याय दिवसानिमित्त सोलापूर बार असोसिएशनतर्फे रक्तदान शिबीर घेण्यात आले. सोलापूर बार असोसिएशन व कुंभारी येथील अश्विनी ब्लड बँक यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या या रक्तदान शिबीरात १५ रक्तदात्यांनी रक्तदान केले.



या शिबीराचे उद्घाटन अध्यक्ष बाबासाहेब जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव मल्हार शिंदे, उपाध्यक्ष रियाज शेख, सचिव बसवराज हिंगमिरे, खजिनदार अरविंद देडे तसेच सहसचिव मीरा प्रसाद उपस्थित होते. या कार्यक्रमाला बार असोसिएशनचे सदस्य, वकिल मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ज्ञानामृत आनंदलहरी - ११८१

**कांदा मुळा भाजी । अवघी विठाबाई माझी ।**
**लसुण, मिरची, कोथिंबिरी । अवघा झाला माझा हरी ।।**

संत सावता महाराजांनी ईश्वराला कर्तव्यात पाहून कर्तव्यातून भक्तीला पुष्टी दिली. अशी भक्ती कुटुंबाच्या, समाजाच्या व देशाच्या उन्नतीत भर घालणारी असल्याने सावता महाराजांप्रमाणे भक्ती करण्याची गरज आहे. खरे म्हणजे आशीर्वाद देणाऱ्या हातापेक्षा कष्ट करणारे हात जास्त पवित्र असतात, असे आम्हास वाटते. निसर्गाने मानवाला केवळ ताटातले तोंडात घालण्यासाठी हात दिले नाहीत, तर ताटात जे घेतले जाते ते आपल्या कष्टाने घेण्यासाठी दिले आहेत. अर्थात, दुसऱ्याचे लुबाडण्याकरिता किंवा दुसऱ्यासमोर पसरवण्याकरीता हात दिलेले नाहीत. असे असले तरीही शरीराने धष्टपुष्ट असणाऱ्या अनेकांचे हात दुसऱ्याचे लुबाडण्यात किंवा दुसऱ्याकडून कांहीतरी मागण्यात व्यस्त असतात. असे हात देशाला बळकटी न देता देशाला एकप्रकारे पोखरतात. माणसाने आपल्या जीवनाला कष्टातून बळकटी देण्याचे कार्य करावे, याचा संदेश वारकरी सांप्रदायाचे भूषण असणाऱ्या सावता महाराजांनी त्यांच्या कर्तव्यातून दिला. आपण कितीही आर्थिक दरिद्री असलो तरी मानसिक दारिद्री न होता कष्टातून स्वयंपूर्ण होऊ शकतो हा मूलमंत्र सावता महाराजांनी कष्टाळू हाताच्या माध्यमातून दिला आहे. संत सावता महाराजांनी आशीर्वाद मागण्यासाठी हात उचलले नाहीत व कोणापुढे हात पसरले नाहीत. घरची कामे टाकून यात्राही केल्याचे दिसून येत नाही. आपल्या वाटयाला आलेले कार्य हे लहान किंवा मोठे याचाही त्यांनी कधी विचार केला नाही. वाट्याला आलेल्या कर्माला सर्वश्रेष्ठ करण्यासाठी त्या कर्माला निष्ठा व कष्टाची जोड दयावी लागते, हे त्याच्या,



**आमची माळियाची जात । शेत लावू बागाईत ।**
**आम्हा हाती मोट नाडा । पाणी जाते फुल झाडा ।।**

या शब्दांतून दिसून येते. ज्याला कामाची लाज वाटते, त्याच्याकडून ते काम निष्ठापूर्वक होत नसते. निती नियमाच्या विरुध्दचे काम वगळता सर्व कर्म/कार्य श्रेष्ठ असतात याची जाण असावी. कामात जीव ओतला, श्रध्दा ठेवली तर हीच ईश्वरभक्ती होते. ईश्वरापर्यंत पोहचण्याचा मार्ग हा कर्तव्यतत्परता असल्याने वाटयाल्या आलेल्या कर्माला निष्ठापूर्वक कष्टाची जोड दयायला हवी. सावताने त्यांच्या वाटयाला आलेले कर्म, त्या कर्मातून निर्माण होणारी फलनिष्पत्ती त्यालाच ईश्वर म्हटले. म्हणूनच त्यांची अभंगवाणीही कष्टातच ईश्वर पाहते.

**कांदामुळा भाजी । अवघी विठाबाई माझी ।**
**लसुण, मिरची, कोथिंबिरी । अवघा झाला माझा हरी ।।,**

हे यावरुन दिसून येते. सावताने भाजीपाला, वनस्पती, दगडधोंडयातही ईश्वराला पाहीले. मात्र या सर्वाअगोदर सर्व प्राणीमात्रात ईश्वराला पाहीले. त्यांच्या या दृष्टीला सर्वांनी जीवनात उतरविण्याची गरज आहे. संत सावताजींच्या जीवनाकडे पाहिल्यास आशीर्वाद देणाऱ्या हातापेक्षा कष्ट करणारे हात जास्त पवित्र असतात असे म्हणायला वाव मिळतो. ईश्वरालाही कष्टाळू हाताचीच पवित्रता मान्य असते. म्हणूनच त्याने कोणाचे दळण दळले, कोणासोबत पाणी भरले, कोणाचे शेले विणले, अन्य कोणाचे कांही केले असावे. आपले हातही जर संत सावतां महाराजांसारखे कष्टाळू झाले तर संत सावतांप्रमाणे,

**सावता म्हणे केला मळा । विठ्ठल पायी गोविला गळा ।।**

असे निश्चित म्हणता येईल. आपण कर्तव्यात ईश्वर पाहिला तर आपल्या जीवनातील आनंदलहरी वाढतील यांत संशय नसावा. महाराजांच्या अभंगांचे अर्थ हे आमच्या अल्पबुध्दीचे असल्याने चूकभूल क्षमा असावी.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शुक्रवार | दिनविशेष- चांगला दिवस |
| दि. १८ जुलै २०२५ | लोकशाहीर अण्णाभाऊ |
| विक्रम संवत् २०८१ | साठे पुण्यदिन |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसु | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - आषाढ | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ. अष्टमी (१७.०१) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - ग्रीष्म | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - अश्विनी (२६.१३) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - सुकर्मा (०६.४७) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - तैतिल (२७.५३) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** आर्थिक अडचणीमुळे मन त्रस्त राहील.मनात अशांती असल्या कारणाने आपल्याला संकटाचा सामना करावा लागेल. नौकरी रोजगारात जबाबदारीनुसार काम करा.

**वृषभ :** मुलांची काळजी राहील. आत्मविश्वास कमी झाल्यामुळे मन लागणार नाही. व्यापार व्यवसाय मध्यम राहील. झालेल्या कामात आलेल्या अडचणीवर मात कराल.

**मिथुन :** स्पर्धेमध्ये यश मिळेल. कार्य क्षमतेमध्ये वाढ होईल. धार्मिकतेकडे मन झुकेल. अपूर्ण राहिलेले काम वेळेत पूर्ण होण्याचे योग आहेत.

**कर्क :** घरामध्ये पूर्वी ठरलेला शुभ समारंभ पार पडेल. एखादी मौल्यवान वस्तूची खरेदी सर्वांच्या संमतीने होणे शक्य.

**सिंह :** हितशत्रूंचा काही प्रमाणात त्रास होणे शक्य. मोठ्या व्यवहारातून पुरेशी काळजी घेत वाटचाल करायची आहे.

**कन्या :** मागील कामात विशेष यश मिळेल. आपल्या लहानसहान इच्छा: आकांक्षाना पूर्ण होण्यासाठी आवश्यक ती आवक झाल्याने तुम्ही खूश असाल. रागावर नियंत्रण ठेवा.

**तुळ :** व्यापार फायदेशीर राहणार आहे. राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा.

**वृश्चिक :** लोकप्रियता वाढणार आहे. व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल.

**धनु :** विरोधकांपासून सावध रहा. प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निर्माण होईल. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा.

**मकर :** नौकरीमध्ये अधिकाऱ्यांचे सहकार्य मिळेल. मनोधैर्य वाढेल. मुलांच्या प्रगतीमुळे प्रसन्न वातावरण राहणार आहे. उतावीळपणा करू नका.

**कुंभ :** आरोग्याची काळजी घ्या. चैनी करण्याकडे मन झुकेल. आपल्या कामात बुध्दी चातुर्याचा उपयोग केल्यास फायदा होईल.

**मीन :** मित्र, सहकारी यांची मदत मिळेल. उत्पन्नात वाढ होण्याचे योग आहेत. व्यावसायिक यश मिळाल्याने आनंदी रहाल.

# आ. सुभाष देशमुखांच्या मागण्यांबाबत मुख्यमंत्री सकारात्मक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ जुलै-**

सोलापूर शहरातील रेडी रेकनर दर कमी करावेत, जिल्ह्यात अन्न उत्कृष्टता केंद्र त्वरित कार्यरत करावे, यासह अनेक मागण्या आ. सुभाष देशमुख यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केल्या. बुधवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई येथे पश्चिम महाराष्ट्रातील विधानसभा सदस्यांची विकासकामांबाबत बैठक घेऊन सविस्तर



चर्चा केली. यामध्ये आ. देशमुख यांनी विविध समस्या मांडत त्याचे निराकरण करण्याची मागणी केली. मुख्यमंत्री फडणवीस यांनी या सर्व मागण्या पूर्ण करण्याबाबत सकारात्मकता दर्शवली आहे.

इतर जिल्ह्याच्या तुलनेत सोलापूरमध्ये रेडी रेकनरचे दर खूप जास्त आहे, ते कमी करावेत, जिल्ह्यातील प्रलंबित असलेले पाणंद शेत रस्त्याला येणार्या अडचणी दूर कराव्यात, नदीकाठी पाईपलाईनसाठी कनेक्शन द्यावे, सौर पंपाचे प्रलंबित असलेले प्रस्ताव त्वरित मार्गी लावावेत, शहरात काही भागांमध्ये दोन दिवसात तर काही भागांमध्ये सात ते आठ दिवसांनी पाणीपुरवठा होत आहे, हा विस्कळीतपणा दूर करण्याचे आदेश द्यावेत, सोलापूर जिल्ह्यासाठी मंजूर असलेले अन्न उत्कृष्टता केंद्र कार्यरत झाले नाही ते करण्यासाठी योग्य त्या उपाययोजना कराव्यात, एनटीपीसी व सिमेंट कंपन्यांच्या जड वाहनाची वाहतूक ही शहरातून जाण्याऐवजी होटगी स्टेशन-आहेरवाडी - मद्रे - हत्तुर बायपास मार्गे वळवावी, जुळे सोलापूर भागातील २२ सोसायटीची खरेदी-विक्री सुरू करावी, जुळे सोलापुरात नाट्यगृह व बसस्थानकासाठी जागा उपलब्ध करण्यात यावी, एमआयडीसी ही महापालिका आयोजित उद्योग विभागास द्यावी, जेणेकरून सोयी सुविधा पुरवल्या जातील. शहरातील हाय टेन्शन ओव्हर हेड वायर ही अंडरग्राउंड किंवा बंच केबल करावे, केळी संशोधन केंद्र कंदार येथे करावे बांधकाम कामगार योजना खूप आहेत. स्टाफ अपुरा आहे व एजंट लोकांचा खूप सुळसुळाट झाला आहे. त्यामुळे स्टाफ वाढवण्यास मंजुरी द्यावी आदी मागण्या आ. सुभाष देशमुख यांनी केल्या.

# अक्कलकोट बंद यशस्वी करा : नवघरे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. १८ जुलै-**

संभाजी ब्रिगेडचे प्रदेश अध्यक्ष तथा शिव, फुले, शाहू आंबेडकरांच्या संविधानवादी मूल्यांना गाव खेड्यापर्यंत पोचवून, मनुवादी, विषमतावादी आणि संविधान विरोधी शक्तींना सळो की पळो करणारे प्रवीण गायकवाड यांच्यावर झालेल्या जीवघेण्या भ्याड हल्ल्याचा व शाही फेकीचा संघटनेच्या वतीने तीव्र शब्दात निषेध करून दि. १८ जुलै रोजी सर्व पुरोगामी परिवर्तनवादी संघटनांनी पुकारलेला बंद यशस्वी करण्यासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर स्टुडंट्स/युथ असोसिएशन सक्रिय सहभागी होणार असून सोलापूर, दक्षिण सोलापूर आणि अक्कलकोट येथील शेकडो कार्यकर्ते या बंदमध्ये सहभागी व्हावे आणि आपण देशातून करावा असे आवाहन संघटनेच्या वतीने करण्यात आले.

स्थापनेपासूनच आरएसएसने संविधानास विरोध करून मानवी मूल्यांनाच विरोध केला आणि जेव्हा जेव्हा परिवर्तनवादी विचारवंत कार्यकर्ते त्यांच्यासमोर आव्हान उभे करतात तेव्हा तेव्हा त्यांनी महात्मा गांधींचा खून करून हीच परंपरा चालू ठेवत, पानसरे, गलबुर्गी, गौरी लंकेश यांच्या हत्या केल्या. अशाच पद्धतीने ज्ञानेश महाराव यांचा देखील आवाज दाबण्याचा प्रयत्न झाला, तरीसुद्धा पुरोगामी आवाज त्यांना बंद करता आला नाही. यामुळे भयभीत झालेल्या संघ परिवाराच्या प्रवृत्ती कडून माननीय प्रवीण गायकवाड यांच्यावर हल्ला करून परत एकदा समतेचा आवाज दाबता येतो का ही चाचणी घेतली आहे. अशा भ्याड कृत्याला न घाबरता त्याला सडेतोड उत्तर देण्यासाठी या बंदची आव्हान करण्यात आलेले आहे तरी सर्व समतावादी बहुजनवादी पुरोगामी संविधान वादी व्यक्ती पक्ष संघटनांनी यामध्ये सहभागी व्हावे. असे आवाहन संघटनेच्या वतीने उत्तम नवगिरे यांनी केले आहे.



# मेहता शाळेत हरितदिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ जुलै-**

कै. वि. मो. मेहता प्राथमिक शाळा,जुळे सोलापूर येथे 'एक विद्यार्थी एक झाड व एक पेड मां के नाम' या उपक्रमांतर्गत 'हरितदिन' उत्साहात साजरा करण्यात आला. प्रमुख अतिथी कृष्णपरमेश्वर सुतार ( केंद्रप्रमुख शाळा क्रमांक २८) व शाळेच्या मुख्याध्यापिका सीमा कोरवलीकर यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी श्रुती कुलकर्णी यांनी निसर्ग गीत सादर केले. प्रमुख अतिथींचा परिचय योगेश सरवदे यांनी करून दिला. विठ्ठलाच्या दारी निघाली चिमुकल्यांची वारी या दिंडी स्पर्धेत शाळेला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.त्यानिमित्ताने यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे बक्षीस देऊन कौतुक करण्यात आले. याप्रसंगी इयत्ता तिसरीच्या विद्यार्थ्यांची प्रभातफेरी काढण्यात आली. शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन यांनी सर्वांना हरितदिनाच्या शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन व आभार मयुरी दुरुगकर यांनी केले.

# अस्तित्व मेकर्स राज्यस्तरीय लघुनाटिका स्पर्धेच्या अध्यक्षपदी संजय सावंत यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर दि. १७ जुलै-**

नवोदित कलावंतांना प्रोत्साहन देणाऱ्या, साहित्य, कला व सांस्कृतिक क्षेत्रातील जेष्ठ नाट्यकर्मी संजय सावंत यांची अस्तित्व मेकर्स राज्यस्तरीय लघुनाटिका स्पर्धा व रंगसाधक पुरस्कार वितरण महोत्सव अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. आस्तित्व मेकर्स फाउंडेशनचे प्रमुख संयोजक ॲड. बसवराज सलगर, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद उपनगरीय शाखेचे अध्यक्ष विजय सांळूखे, सचिव किरण लोंढे यांच्या प्रमुख उपस्थितीत निवडीचे पत्र देण्यात आले.



या राज्यस्तरीय लघुनाटिका महोत्सव स्पर्धेसाठी महाराष्ट्रात लोकप्रिय असणारी टी.व्ही चॅनेल वरील हास्यजत्राचे दिग्दर्शक सचिन गोस्वामी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. त्याप्रसंगी राज्यस्तरावर नाट्यक्षेत्रात प्रायोगिक रंगभूमीवर योगदान देणाऱ्या जेष्ठ नाट्यकर्मीला राज्यस्तरीय रंगसाधक प्रमोद खांडेकर पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. याचे स्वरूप रोख ११ हजार, गौरवपत्र व स्मृती चिन्ह असे असणार आहे. हुतात्मा स्मृती मंदिर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय लघुनाटिका महोत्सव स्पर्धेसाठी अंदाजे चार ते पाच लाख रुपये खर्च येणार असून त्यामध्ये सभागृह भाडे, बाहेरून स्पर्धेसाठी येणाऱ्या सर्व कलावंतांचे उत्कृष्ट जेवण, रोख स्वरूपात २१ हजार रुपासून मोठया रक्कमेची पारितोषिके, सन्मान चिन्हे, प्रवास खर्च, मानधन व इतर खर्च इत्यादी गोष्टींचा समावेश असणार आहे. या स्पर्धेतील चुरस पाहता महाराष्ट्रातून जास्तीत जास्त नाट्य संस्थांनी सहभागी होण्याचे आवाहन महोत्सवाचे अध्यक्ष संजय सावंत व अस्तित्व मेकर फाउंडेशनचे सचिव किरण लोंढे यांनी केले आहे.

## धनगर समाजातील गुणवंतांचा उद्या सन्मान

**सोलापूर, दि. १७ जुलै-**

येथील धनगर समाज कर्मचारी बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने धनगर समाजातील दहावी आणि बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा शनिवार १९ जुलै रोजी दुपारी बारा वाजता शिवस्मारक शिंदे चौक सोलापूर जनता बँकेच्या मुख्य कार्यालयाजवळ आयोजित केल्याची माहिती सचिव प्रा. शंभुदेव गावडे आणि प्रवक्ते प्रा. देवेंद्र मदने यांनी दिली. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ प्रकाश महानवर यांच्या हस्ते हा कार्यक्रम होईल. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य सिद्धारुढ बेडगनूर राहणार आहेत. या सोहळ्यास अतिथी म्हणून विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे, तहसीलदार श्रीकांत पाटील, सुषमा पैकेकरी, ,नायब तहसीलदार सुधाकर बंडगर, वैद्यकीय अधिकारी डॉ. नरेंद्र ढेकणे, डॉ. नीलकंठ दुधभाते तसेच संस्थेचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

# स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र संघटनेतर्फे दोन दिवसीय प्रेसिडेन्शियल कॉन्फरन्स

■ **भारतातून प्रसिद्ध स्त्री-रोग व प्रसूतीतज्ञ सहभागी होणार**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ जुलै-**

सोलापूर स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र संघटनेच्या वतीने फेडरेशन ऑफ ऑबस्टेट्रिक अँड गायनॅकॉलॉजिकल सोसायटीज ऑफ इंडियाची अध्यक्षांची परिषद (प्रेसिडेन्शियल कॉन्फरन्स) यंदा सोलापूर येथे दि. १९ व २० जुलै रोजी हॉटेल बालाजी सरोवर येथे आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती अध्यक्षा डॉ. सुजाता कुलकर्णी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या परिषदेमध्ये संपूर्ण भारतातून प्रसिद्ध स्त्री-रोग व प्रसूतीतज्ञ सहभागी होणार आहेत. शुक्रवार दि. १८ जुलै रोजी दुपारी ३ वाजता आयएमए हॉल येथे सार्वजनिक जनजागृती कार्यक्रम होणार आहे. गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाची तपासणी आणि एचपीव्ही लस याबद्दल माहिती हा कार्यक्रम सर्व नागरिकांसाठी खुला आहे. महिलांच्या आरोग्यविषयक महत्त्वाच्या बाबींबद्दल जागरूकता वाढवणे हा उद्देश आहे. दोन दिवसीय परिषदेमध्ये कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. कोल्पोस्कोपी (Colposcopy) गर्भाशयाच्या मुखाच्या आजारांची अचूक तपासणी करणारी आधुनिक पद्धत कॉस्मेटिक गायनेकॉलॉजी सौंदर्यात्मक स्त्री रोगशास्त्रातील नवनवीन उपचारपद्धती यावर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या पत्रकार परिषदेस डॉ. मोनिका उबरदंड, डॉ. केतकी जोशी, डॉ. रोहिणी देशपांडे, डॉ. माणिक गुर्रम, डॉ. लता पाटील उपस्थित होते.




## आम आदमी पार्टी पालिका निवडणूक स्वबळावर लढवणार

**सोलापूर, दि. १७ जुलै-**

आम आदमी पार्टी सोलापूर महानगरपालिकेची निवडणूक स्वबळावर लढविणार आहे, अशी माहिती प्रदेश संघटन मंत्री ॲड. सागर पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पार्टीचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल यांनी महाराष्ट्रात प्रकाश जरवाल यांची प्रभारी म्हणून नियुक्ती केली आहे. त्यानुसार या निवडणुका राज्य अध्यक्ष अजित फाटके यांच्या नेतृत्वाखाली सोलापुरातही महापालिका, पंचायत समिती, जिल्हा परिषद या निवडणुकीत सर्व जागा स्वबळावर लढविणार आहे. शहरात आठ दिवसांआड पाणीपुरवठा आणि इतर जीवनावश्यक सुविधांसाठी जनता झगडत आहे. त्याच अनुषंगाने घरपट्टी हाफ, पाणीपट्टी माफ आणि दररोज सहाशे लिटर मोफत पाणी असा नारा घेऊन ही निवडणूक लढविण्यात येणार आहे. या पत्रकार परिषदेत ॲड. खतीब वकील, जुबेर हिरापुरे, श्रीकांत वाघमारे, सतीश लोंढे, सुचित्रा वाघमारे आदी उपस्थित होते.

# समावेशक शिक्षणामुळे शैक्षणिक कामगिरी चांगली

■ **'सिंहगड'मध्ये प्रशिक्षण कार्यक्रम प्रसंगी डॉ. आशा बोकील यांचे प्रतिपादन**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.१७ जुलै-**

समावेशक शिक्षणाचा उद्देश सर्व विद्यार्थ्यांना, त्यांच्या क्षमता, अपंगत्व किंवा पार्श्वभूमी काहीही असो, त्यांना सहाय्यक वातावरणात एकत्र शिकण्यासाठी आणि वाढण्यासाठी समान संधी प्रदान करणे, समावेशक शिक्षणामुळे शैक्षणिक कामगिरी चांगली होऊ शकते आणि विद्यार्थ्यांचा सहभाग वाढू शकतो, असे प्रतिपादन सिंहगड संस्था पुणेच्या डायरेक्टर एज्युकेशन डॉ. आशा बोकील यांनी केले.



सिंहगड पब्लिक स्कूल व ज्युनिअर कॉलेज केगाव येथे सर्वसमावेशक शिक्षण या विषयावर शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. दीप प्रज्वलन व सरस्वती पूजनाने डॉ. बोकील, मार्गदर्शक रम्या तुतीका व अमृता रास्ते तसेच सिंहगड स्कूल सोलापूर व कमलापूर शाळेच्या प्राचार्या शाहीन शेख व चैताली मराठे यांच्या उपस्थितीत प्रशिक्षणाचे उद्घाटन झाले. प्राचार्य शाहीन शेख यांनी प्रास्ताविक केले. समावेशक शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी आणि बौद्धिक आणि विकासात्मक अपंगत्व असलेल्या व्यक्तींबद्दल विद्यार्थ्यांना संवेदनशील करण्यासाठी शिबिर आयोजित केल्याचे रम्या तुतीका यांनी सांगितले. प्रशिक्षणासाठी अनुभवी प्रशिक्षकांची कार्यशाळा, समूहचर्चा आणि प्रात्यक्षिक सादरीकरणाच्या माध्यमातून सहभाग घेतलेल्या शिक्षकांना समावेशी शिक्षणाची व्यावहारिक माहिती दिली. शाळेतील सर्व शिक्षकांनी प्रशिक्षणात सक्रिय सहभाग घेतला व आपल्या अनुभवांची देवाण-घेवाण केली. प्रशिक्षण कार्यक्रम सिंहगड शिक्षण संस्थेच्या सर्वसमावेशक आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या बांधिलकीचे प्रतीक ठरला, असे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांनी सांगितले.

# जनसुरक्षा कायदा रद्द करा : खासदार शिंदे यांची मागणी

■ **काँग्रेसतर्फे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ जुलै-**

भाजप महायुती सरकारने पारित केलेला जनसुरक्षा कायदा रद्द करावा या मागणीसाठी, सोलापूर शहर व जिल्हा काँग्रेस पक्षाच्या वतीने खासदार प्रणितीताई शिंदे यांच्या नेतृत्वाखाली मा. उपजिल्हाधिकारी सुशांत बनसोडे यांना निवेदन देण्यात आले.



यावेळी बोलताना खासदार शिंदे म्हणाले की, महाराष्ट्रातील भाजप, महायुती सरकारने नुकताच पारित केलेला जनसुरक्षा कायदा हा लोकशाहीवर गदा आणणारा आणि अघोषित आणीबाणी लादणारा आहे. या कायद्याच्या विरोधात संपूर्ण महाराष्ट्रभर काँग्रेसच्या वतीने आंदोलन छेडण्यात आले असून, त्याच अनुषंगाने निवेदन सादर करण्यात आले. यावेळी सोलापूर शहर काँग्रेसचे अध्यक्ष चेतन नरोटे, जिल्हा कार्याध्यक्ष नंदकुमार पवार, अक्कलकोट तालुका अध्यक्ष मल्लिकार्जुन पाटील, मोहोळ तालुका अध्यक्ष सुलेमान तांबोळी, मंगळवेढा तालुका अध्यक्ष प्रशांत साळे, पंढरपूर शहर अध्यक्ष अमर सूर्यवंशी, मोहोळ शहर अध्यक्ष किशोर पवार, महिला शहर अध्यक्ष प्रमिला तुपलवंडे, माजी महापौर संजय हेमगड्डी, प्रवक्ते अशोक निंबर्गी, मा. नगरसेवक रियाज हुंडेकरी, प्रवीण निकाळजे, मनोज यलगुलवार, विनोद भोसले, जिल्हा वरिष्ठ उपाध्यक्ष अशफाक बळोरगी, राजेश अप्पा पवार, भारत जाधव, युवक अध्यक्ष गणेश डोंगरे, देवाभाऊ गायकवाड, भीमाशंकर टेकाळे, वाहिद बिजापूरे, महेश जोकारे, तिरुपती परकीपंडला, सुवर्णा मलगोंडा, सिद्धाराम चाकोते, बसवराज म्हेत्रे, क्षीरसागर, सातलिंग शटगार, भोजराज पवार, पशुपती माशाळ, राहुल वर्धा, अनिल मस्के, एजाज बागवान, परशुराम सतारेवाले, लखन गायकवाड, हेमा चिंचोलकर उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



### विमा आणि बचतीतून महिलांचे सशक्तीकरण होईल : सरपंच बोबडे

**टेंभुर्णी, दि. १७ जुलै-**

टेंभुर्णी ग्रामपंचायत व बँक ऑफ इंडिया, टेंभुर्णी शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने बँक साक्षरता व विमा सुरक्षा या विषयावर आज महिलांसाठी मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या विशेष ग्रामसभेला गावातील महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमात बँक ऑफ इंडिया टेंभुर्णी शाखेच्या वनश्री, सहाय्यक स्टाफ सोमनाथ मोकाशी, बँक करस्पॉन्डन्स गोवर्धन नेवसे, सीआरपी उज्वला देशमुख व खडके यांची उपस्थिती लाभली.



### बार्शी तालुका आरएसपी समादेशकपदी सचिन शिंदे यांची निवड

**बार्शी, दि. १७ जुलै-**

सोजर इंग्लिश स्कूल, बार्शी येथील सहशिक्षक सचिन शिंदे यांची बार्शी तालुका समादेशक म्हणून नियुक्ती करण्यात आली. आज दि.१६ जुलै रोजी राहूल गांधी विद्यालय पंढरपूर येथे आयोजित केलेल्या रस्ता सुरक्षा दलाच्या सहविचार सभेमध्ये जिल्हा समादेशक प्रल्हाद जाधव यांचे हस्ते निवडीचे पत्र देवून गौरविण्यात आले. यावेळी सोलापूर जिल्ह्यातील इतर तालुक्यातील समादेशक आणि आरएसपी अधिकारी उपस्थित होते. कुसळंब गावचे रहिवाशी असलेले शिंदे हे गेल्या १६ वर्षांपासून सोजर इंग्लिश स्कूल येथे अध्यापनाचे कार्य करत असून २०२२-२३ मध्ये अलिबाग (चौंडी) येथे संपन्न झालेल्या रस्ता सुरक्षा दलाच्या शिबिरामध्ये एक महिन्याचे प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर शिंदे यांनी शाळेचे संगीत शिक्षक प्रसाद सहस्त्रबुध्दे यांच्या मदतीने ३० ते ३५ मुलांचे आरएसपी पथक तयार करुन रस्ता सुरक्षा नियमांचा प्रसार आणि प्रचाराचे कार्य सुरु केले. शिंदे यांच्या निवडीबद्दल संस्थेचे अध्यक्ष अरुण बारबोले, संस्थेचे पर्यवेक्षक उमाकांत राऊत, मोहन लोहार, तसेच शाळेचे मुख्याध्यापक संदीप पोळ आदींनी अभिनंदन केले.



### करमाळयात नागपंचमीपूर्वी रस्त्यावरील खड्डे बुजविण्याची मागणी

**करमाळा, दि. १७ जुलै-**

येत्या २९ जुलै रोजी नागपंचमी निमित्त रावगाव रोड येथील नागोबा मंदिर येथे यात्रा भरते या यात्रेत अनेक भक्त करमाळा शहरातुन दर्शनासाठी येतात विशेषतः महिला वर्गाची विशेष गर्दी असते परंतु या मंदिराकडे जाणारे दोन्ही रस्त्यावर खड्डे पडले असून ते यात्रेपुर्वी बुजविण्यात यावे यासाठी करमाळा नगर परिषदेचे मुख्याधिकारी सचिन तपसे यांना माजी नगरसेवक फारुक जमादार यांनी निवेदन दिले आहे. जमादार यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, येत्या २९ जुलै रोजी नागपंचमी निमित्त रावगाव रोड येथील नागोबा मंदिर येथे यात्रा भरते परंतु या मंदिराकडे जाणारे रस्ते किल्ला वेस ते जुना दुर्गा पॅलेस हॉटेल तसेच महात्मा ज्योतिबा फुले पुतळा ते नागोबा मंदिर ह्या रस्त्यावर खड्डे पडले आहेत त्यामुळे भाविकांना दर्शनासाठी जाताना रस्त्यावरील खड्ड्यांमुळे त्रास होणार असून किरकोळ अपघात होण्याची शक्यता नाकारता येणार नाही त्यामुळे करमाळा नगरपरिषदेने तातडीने सदर रस्त्यावरील खड्डे बुजविण्यात यावे असे निवेदनात म्हटले आहे.



### माळशिरसच्या मंडळ अधिकारीपदी व्ही.डी.लोखंडे

**माळशिरस, दि. १७ जुलै-**

माळशिरस मंडळचे मंडळ अधिकारीपदी व्ही.डी. लोखंडे यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांनी नुकताच मंडळ अधिकारी एस.के. खंडागळे यांच्याकडून पदभार स्वीकारला आहे. माळशिरस मंडळचे मंडळ अधिकारीपदी व्ही.डी.लोखंडे यांची नियुक्ती झाली असून त्यांचा व मंडळ अधिकारी एस के खंडागळे यांचा सन्मान महा ई सेवा केंद्रचालक अशोक सिदवाडकर, नवनाथ वळकुंदे यांनी केला. यावेळी ग्राम महसूल अधिकारी सचिन पाटील, शरद खांडेकर, निलेश कुंभार, अमोल खेडकर, करिष्मा जाधव, अश्विनी नागटिळक आदी उपस्थित होते.

# आज अक्कलकोट बंद; प्रविण गायकवाड हल्ला प्रकरण

■ बहुजनांचा बंदसाठी पुढाकार

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.१७ जुलै-**



संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्यावर अक्कलकोटमध्ये झालेला जीवघेणा हल्ला हा पुरोगामी विचारांवर झालेला प्रतिगामी हल्ला आहे. या घटनेच्या निषेधार्थ शुक्रवारी दि.१८ जुलै रोजी अक्कलकोट बंदची हाक देण्यात आली आहे. हा बंद दुपारी २ वाजेपर्यंत कडकडीत राहणार आहे. या बंदमध्ये सोलापूर जिल्हा तसेच शहरातील बहुजन चळवळीतील सर्व संघटना आणि नेते मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याची माहिती सकल मराठा समाजाचे समन्वयक माऊली पवार यांनी दिली.

सकल मराठा समाज बहुजन चळवळ आणि श्री फत्तेसिंह शिक्षण संस्था यांच्यावतीने या बंदचे आयोजन करण्यात आले आहे. गेल्या रविवारी अक्कलकोट येथे प्रवीण गायकवाड यांच्यावर शाई फेकून व अंगावर वंगण टाकून भ्याड हल्ला करण्यात आला. या प्रकाराचा निषेध करण्यासाठी बुधवारी श्री फत्तेसिंह शिक्षण संस्थेच्या सभागृहात तातडीची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी पवार बोलत होते. यावेळी पुरुषोत्तम बरडे, नाना काळे, राजन जाधव, राम गायकवाड यांच्यासह विविध संघटनांचे कार्यकर्ते उपस्थित होते. या बंदमध्ये शाळा, महाविद्यालये, दुकाने व अन्य व्यवहार बंद राहणार असून, केवळ दवाखाने आणि मेडिकलसारख्या अत्यावश्यक सेवा सुरू ठेवण्यात येणार आहेत. बाहेरून येणाऱ्या भाविकांची गैरसोय होऊ नये आणि स्थानिक जनतेला अडचण होऊ नये म्हणून बंद फक्त दुपारी २ वाजेपर्यंत असला तरी तो पूर्णतः कडकडीत असेल असेही पवार यांनी स्पष्ट केले. यावेळी मराठा सेवा संघाचे राम गायकवाड म्हणाले, मुळात हा कार्यक्रम फत्तेसिंह शिक्षण संस्था आणि सकल मराठा समाज यांच्यावतीने आयोजित करण्यात आला असताना काहीजण विनाकारण अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले आणि अमोलराजे भोसले यांची बदनामी करत आहेत. हे एक नियोजित षडयंत्र असून, आम्ही हे सहन करणार नाही. बाबा निंबाळकर यांनीही या प्रकरणात नाहक भोसले कुटुंबीयांची बदनामी केली जात असल्याचा ठपका ठेवत या कारस्थानाविरुद्ध निश्चित आवाज उठवला जाईल. हा बंद फक्त गायकवाड यांच्यावरच्या हल्ल्याचा नव्हे, तर या बदनामीचा निषेध म्हणूनही आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. सकल मराठा समाज बहुजन चळवळ आणि श्री फत्तेसिंह शिक्षण संस्था यांच्यावतीने या बंदचे आयोजन करण्यात आले आहे. या बंदला काही जणांनी तात्काळ पाठिंबा दर्शवला आहे. सर्वांनी पाठिंबा घोषित करावा,असे आवाहन फत्तेसिंह शिक्षण संस्थेच्या संचालक बाळासाहेब मोरे यांनी केले. दरम्यान या अक्कलकोट बंदला सर्व स्तरातून जाहीर पाठिंबा मिळत असून काँग्रेस नेते अशपाक बळोरगी, मुस्लिम समाजाचे प्रतिनिधी एजाज मुतवल्ली आणि शाकीर पटेल यांनी पाठिंबा दर्शविला आहे. यावेळी अरुण जाधव, अतुल जाधव, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष मल्लिनाथ साखरे, ॲड. सुरेशचंद्र सूर्यवंशी, मनोज निकम, अमर शिंदे, अभय खोबरे, शाम मोरे, लाला राठोड, दयानंद काजळे, तम्मा शेळके, प्रवीण घाडगे, शितल फुटाणे, वसंत देडे, वरूण शेळके, प्रवीण देशमुख, प्रसन्न हत्ते यांच्यासह अनेक कार्यकर्ते, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

#### ज्या चौकात हल्ला केला, त्याच चौकात सन्मान करणार

गायकवाड यांच्यावर ज्या चौकात हल्ला झाला त्याच चौकात त्यांचा भव्य नागरी सत्कार करून विचारांचा विजय साजरा केला जाईल, असेही माऊली पवार यांनी जाहीर केले. विचारांची लढाई ही विचारांनीच लढली पाहिजे, असा संदेश देत त्यांनी हा हल्ला संपूर्ण बहुजन चळवळीवर आहे, असे सांगत एकतेचा निर्धार व्यक्त केला.

## अंतरमशागतीच्या कामाला वेग

■ पिकांची वाढ थांबल्याने बळीराजाला चिंता

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. १७ जुलै-**



वैराग भागामध्ये वेळेवर चांगल्या प्रकारे पाऊस झाल्याने सोयाबीन, उडीद, तूर, मूग या पिकांची चांगल्या प्रकारे पेरणी झालेली असून बळीराजा सुखावला होता परंतू सध्या पावसाने उघडीप दिल्यामुळे चिंताही सतावू लागली आहे. पावसाअभावी पिकाची वाढ थांबल्याने वैराग भागातील बळीराजा दुहेरी संकटात सापडू लागला आहे. चार पैसे मिळवून देणारा खरीप हंगामच संकटात सापडल्यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढू लागली आहे.

सध्या पिकांची कोळपणी, खूरपणी ही अंतरमशागतीची कामे सुरू झाली असून ढगाळ हवामानामूळे पिकावर अळीचा प्रार्दुभाव झाल्याने शेतकरी किटक नाशकाची तसेच पिवळी पाने पडू लागल्याने टॉनिकची फवारणी करण्यात गुंतला आहे. त्यामूळे कांही शेतकरी बैलाऐवजी मजुराकडून खुरपणी तर अल्पभुधारक शेतकरी सायकल कोळप्याने पिकांची मशागती करू लागला आहे. पिकांची कोळपणी, खुरपणी वेळेत झाली तरच पिकांची जोमदार वाढ होऊन उत्पादन वाढू शकते मजुरांच्या टंचाईमूळे मशागतीला विलंब लागतो त्यामूळे शेतकरी सायकल कोळप्याच्या सहाय्याने सोयाबीनची कोळपणी करीत आहेत. सध्या शेतीची कामे घरातील माणसांनी घरच्या घरी केली तरच शेती परवडते नाहीतर वाढती मजूरी, मजुरांचा तुटवडा यामूळे वेळेला पिकांच्या मशागती होत नाहीत परिणामी उत्पादन घटून शेतकरी आर्थिक डबघाईला येतो.

## खासगी दवाखान्यात दरपत्रक लावण्यासाठी उपोषण

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. १७ जुलै-**



> कुर्डूवाडी शहरातील सर्व खासगी दवाखान्यात शासनाच्या निर्णयानुसार दरपत्रक लावणे बंधनकारक आहे. त्याबाबत सर्वांना लेखी सूचना दिल्या आहेत.
> **- डॉ. सुनंदा गायकवाड,**
> **प्रभारी वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय, कुर्डूवाडी**

कुर्डूवाडी शहरासह माढा तालुक्यातील खाजगी दवाखान्यात शासनाच्या निर्णयानुसार दरपत्रक लावणे बंधनकारक आहे तसे न केल्यास संबंधित दवाखान्याचे परवाने रद्द होतील, असे आदेश असतानाही प्रत्यक्षात मात्र तसे होताना येथे दिसून येत नसल्याने त्याची अंमलबजावणी संबंधित येथील आरोग्य विभागाने तातडीने करावी या मागणीसाठी कुर्डूवाडी शहरातील सामाजिक कार्यकर्ते जॉन नवगीरे यांनी येथील प्रांतअधिकारी कार्यालयासमोर सोमवारी दिवसभर आमरण एक दिवसीय उपोषण केले.

यावेळी प्रांत अधिकारी जयश्री आव्हाड यांनी संबंधित आरोग्य विभागाला याबाबत सूचना दिल्यानंतर सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास उपोषण मागे घेण्यात आले. तालुक्यातील अनेक खासगी दवाखान्यात दर पत्रक नसल्याने सर्वसामान्य व गरीब रुग्णांचे अवहेलना व हेळसांड होत आहे. त्याबाबत येथील सामाजिक कार्यकर्ते जॉन नवगीरे यांनी जिल्हा शल्यचिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याकडे मागणी केली होती. परंतू त्यांच्या कडूनही खासगी रुग्णालयाच्या दरपत्राबाबत शासनाचे कोणतेही परिपत्रक उपलब्ध नसल्याचे कळवल्याने नवगिरे यांनी प्रांत अधिकारी कार्यालयासमोर उपोषण केले. यावेळी शासनाचे परिपत्रक येथील प्रांत अधिकारी जयश्री आव्हाड यांच्याकडून उपोषणकर्त्याला देण्यात आले व त्याच बरोबर संबंधित आरोग्य विभागाला सूचना देखील देण्यात आल्या. यावेळी उपोषण मागे घेण्यात आले.

## शिवीगाळ करत चाकूने वार; एकजण जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १७ जुलै-**

मागील वादाच्या रागातून गल्लीतील युवकावर चाकूने वार करून गंभीर जखमी केल्याची घटना मंगळवारी (दि. १५ जुलै) दुपारी २ वाजण्याच्या सुमारास बार्शी शहरातील वडार गल्ली परिसरात घडली. याप्रकरणी विकास अंबादास ईटकर (रा. वडार गल्ली, बार्शी) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



याबाबत अधिक माहिती अशी की, गणेश ज्ञानेश्वर वसव (वय २७, व्यवसाय मजुरी, रा. वडार गल्ली, बार्शी) हा लक्ष्मीदेवी मंदिरात दर्शनासाठी जात असताना गल्लीतील हनुमान मंदिराजवळ विकास ईटकर याने त्याला अडवून मागील भांडणाचा राग मनात ठेवत तु माझ्या समोर येऊ नको, गल्लीत राहू नकोस असे म्हणत शिवीगाळ केली. त्यावेळी गणेशने प्रतिवाद केल्याने विकासने पळत जाऊन आपल्या घरातून चाकू आणला व गणेशच्या उजव्या हातावर वार करुन जखमी केले. या झटापटीत गणेश गटारीवर पडल्याने त्याच्या डाव्या हातालाही इजा झाली. गणेशच्या आरडाओरड ऐकून त्याची आई लक्ष्मीबाई व भाचा मंगेश नवगण यांनी धाव घेत भांडण सोडवले. मात्र, जाताना विकास ईटकरने पुन्हा माझ्या समोर आलास तर तुला जिवंत सोडणार नाही अशी धमकी दिली. घटनेनंतर जखमी गणेशने पोलीस ठाण्यात धाव घेतली असून, वैद्यकीय उपचार घेतल्यानंतर त्याने दिलेल्या फिर्यादीवरुन आरोपीविरुद्ध मारहाणी, शिवीगाळ आणि जिवे मारण्याच्या धमकीचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलिसांनी या प्रकरणी पुढील तपास सुरु केला आहे.

### वीरशैव विद्या संवर्धिनी मंडळातर्फे गुणवंत विदयार्थ्यांचा उद्या गौरव

**बार्शी, दि. १७ जुलै-**

वीरशैव लिंगायत समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणात मदतीचा हात देण्यासाठी कार्यरत असलेल्या वीरशैव विद्या संवर्धिनी मंडळ बार्शी यांच्यावतीने गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वितरण आणि जात व पोटजात प्रमाणपत्रासाठी लागणाऱ्या पुराव्यांचे वाटप हा कार्यक्रम शनिवार, दि. १९ जुलै रोजी सकाळी ११ वाजता वीरशैव लिंगायत बोर्डिंग, टाकणखार रोड, बार्शी येथे आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन एफ. आर. शेख, तहसीलदार, बार्शी यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थानी बाळासाहेब चव्हाण, मुख्याधिकारी, नगरपरिषद बार्शी हे असणार आहेत. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे अध्यक्ष बाबासाहेब मनगिरे तसेच संचालक मंडळ प्रयत्नशील असून सर्व मान्यवर, पालक आणि विद्यार्थ्यांना कार्यक्रमासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन रावसाहेब मनगिरे यांनी केले आहे.

## मेहतर समाजाच्या कुटुंबीयांसाठी सदनिकांचे बांधकाम पूर्ण करा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १७ जुलै-**

पंढरपूर शहरात वारीच्या निमित्ताने लाखो भाविक दरवर्षी येतात. या भाविकांचे तसेच तेथील रहिवाशांचे आरोग्य चांगले राहावे, या हेतूने १८८९ साली मेहतर समाज पंढरपुरात साफसफाईसाठी आणला गेला. या मेहतर समाजातील २१३ लोकांच्या कुटुंबीयांसाठी सदनिकांचे बांधकाम करण्याचा प्रस्ताव होता. हा प्रस्ताव उच्च न्यायालयाच्या समितीकडून आयुक्तांकडे गेला होता आणि आयुक्त समितीने त्याला मंजुरी देऊन शासनाकडे पाठवला. मात्र, तो प्रस्ताव अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे.

१८८९ सालापासून पंढरपूरच्या स्वच्छतेत मेहतर समाजाचे योगदान आहे, जे आजही अविरतपणे कार्यरत आहेत. या मेहतर समाजाच्या सदनिकांच्या प्रश्नांची सोडवणूक विहित वेळेत होणार का? आणि किती दिवसात या प्रश्नाची सोडवणूक होऊन या २१३ कुटुंबियांना सदनिका बांधून मिळणार? महाराष्ट्र विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात यासंबंधी प्रश्न उपस्थित करून सभागृहाचे व मंत्री महोदयांचे लक्ष वेधले.

या अनुषंगाने, सकारात्मक प्रतिसाद देत, वित्त व नियोजन मंत्री तथा उपमुख्यमंत्री मा.श्री. अजितदादा पवार यांनी सुधारित पंढरपूर तीर्थक्षेत्र आराखड्यामध्ये या प्रकल्पाचा समावेश केला असून या आराखड्यात एकूण १३ इमारती उभारण्यात येणार असून, त्यापैकी १२ इमारती ४ मजली, तर १ इमारत ५ मजली असेल. यामधील ७ इमारतींमध्ये एकूण २४ गाळे काढण्यात येणार आहेत.

यासोबतच, विधीमंडळाचे काम काज संपल्यानंतर सोलापूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांच्याशी संपर्क साधून, संपूर्ण आराखड्यातील हा प्रश्न लवकरच मार्गी लावण्यासाठी चर्चा केली जाईल, असे स्पष्ट केले.

## ऑनलाईन अभ्यासातून आयआयटीला मिळवला प्रवेश

■ माढा तालुक्यातील पडसाळीचा राज देशमुख ठरतोय आयडॉल

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि.१७ जुलै-**

इयत्ता बारावीनंतर आयआयटीला प्रवेश मिळवण्याचे विद्यार्थ्यांचे स्वप्न असते. त्यासाठी कोटा, दिल्ली, हैदराबाद, पुणे, बारामती या ठिकाणी लाखो रुपयांच्या शिकवण्या लावतात. यास अपवाद ठरला आहे पडसाळी (ता. माढा) येथील राज लालासाहेब देशमुख. कोणतीही शिकवणी न लावता घरीच ऑनलाईन अभ्यास करून त्याने जेईई परीक्षेत ९९.७३% पर्सेंटाईल मार्क मिळवत आयआयटीला प्रवेश मिळवला आहे.




इयत्ता बारावीत त्याला ६९ टक्के मार्क पडले या कमी पडलेल्या मार्कांची कसर त्याने जेईई परीक्षेत भरून काढली त्याला त्यात ९९.७३% पर्सेंटाईल मार्क पडले. ॲडव्हान्स परीक्षेला त्याला १८५ मार्क पडले. या परीक्षेत जर ७७ मार्क पडले तरी आयआयटी मध्ये प्रवेश मिळू शकतो. त्याला राज्य सीईटी परीक्षेत ९९% पर्सेटाईल मार्क पडले. यामुळे त्याला देशातील सर्वोच्च अशा आयआयटीमध्ये प्रवेश मिळू शकतो. भविष्यात केंद्राची यूपीसी परीक्षा देण्याचे त्याचे ध्येय असल्याचे त्याने बोलून दाखवले होते.

माढा तालुक्यातील पडसाळी हे तीन हजार लोकसंख्येचे खेडेगाव या गावांमध्ये लालासाहेब देशमुख या शेतकऱ्याला केवळ तीन एकर जमीन यामध्ये ते हंगामी पिके घेतात. हे करत असताना त्यांनी त्यांचा मुलगा राज देशमुख याला गावातीलच संत सावतामाळी विद्यालय येथे घातले. त्याला इयत्ता दहावीला ९६ टक्के मार्क मिळाले. वडिलांची केवळ चौथी झालेली घरामध्ये शैक्षणिक वातावरण नसताना सुद्धा गरीबाच्या व हलाखीच्या परिस्थितीमध्ये त्याने हे यश मिळवले. अकरावीत त्याने प्रवेश घेऊन प्रथम दोन महिने खाजगी शिकवणी लावली परंतु तेथे दर आठवड्याला नवीनच शिक्षक शिकवायला येत असल्यामुळे व शिकण्याची लिंक न लागल्यामुळे त्याने दोन महिन्यातच खाजगी शिकवणीला रामराम ठोकला व घरी अभ्यास करण्याचा निर्णय घेतला .नंतर त्याने सरळ आपले गावच गाठले. पहिली अडचण आली ती वायफायची गावात वायफाय नाही. तशी सोय ही नव्हती मग यातून मार्ग काढत त्याने मोबाईलच्या इंटरनेटच्या रेंजवर लॅपटॉपवर अभ्यास करायला सुरुवात केली. फिजिक्सवाला ऑनलाइन शिकवणी तसेच त्याने सिंगेज पब्लिकेशनचे मार्गदर्शनपर पुस्तके विकत आणून त्याचाही आधार घेतला.

#### सलग १६ तास अभ्यास

राज देशमुख याने स्वतःला खोलीमध्ये बंद करून घेऊन सलग सोळा तास तो अभ्यास करत होता. तो खोलीच्या बाहेरही येत नव्हता जेवायला सुद्धा त्याची आई त्याला फोन करून आठवण करून द्यायची व ताट त्याच्या खोलीमध्ये पाठवायची.

#### ए आयचा वापर लाभदायक

अभ्यासक्रमातील अवघड प्रश्न असतील तर शिक्षकच नसल्यामुळे तो सरळ हे प्रश्न ए आय तंत्रज्ञानाचा वापर करून त्यांना प्रश्न विचारत असे त्याला त्याचे उत्तर हे तंत्रज्ञान देत असे. चार ते पाच तास रोज तो याचा वापर करत होता.

#### यश तरुणांना मार्गदर्शनपर

अनेक विद्यार्थी दहावीनंतर तीन ते चार लाख रुपये वार्षिक खर्च करून अनेक क्लासेस लावतात. जर जिद्द व चिकाटी असेल तर घरीसुद्धा हे यश मिळू शकते हेच राज देशमुख यांच्या यशावरून दिसून येते.

## मुख्यमंत्र्यांनी करावी भगवंताची शासकीय महापूजा

■ आमदार सोपल यांची विधानसभेत मागणी

**बार्शी, दि.१७ जुलै-**

बार्शीचे ग्रामदैवत श्री भगवंत हे प्राचीन मंदिर आहे व पूर्ण भारतात भगवंताचे एकमेव मंदिर आहे. त्यामुळे पंढरपूरप्रमाणे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते बार्शीच्या भगवंताची शासकिय पूजा होण्याची मागणी आमदार दिलीप सोपल यांनी विधानसभेत केली. तत्कालीन मुख्यमंत्री मनोहर जोशी व तत्कालीन उपमुख्यमंत्री गोपीनाथ मुंडे यांच्या कार्यकाळामध्ये त्यांच्या मंत्रीमंडळाने बार्शीचे श्री भगवंत मंदिर हे तीर्थक्षेत्र म्हणून जाहीर केले. पूर्वीपासून मराठवाडा व विदर्भातील लाखो वारकरी पंढरपूर वारीला जाताना व वारीवरुन येताना भगवंताचे दर्शन घेतात. एकादशी पंढरपूर व द्वादशी बार्शीला येऊन उपवास सोडण्याची परंपरा आहे व धर्मग्रंथांमध्ये पण याचा उल्लेख आहे. अशा धार्मिक व प्राचीन भगवंताची शासकीय महापूजा माननीय मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पुढच्या वारीपासून व्हावी अशी आग्रहाची मागणी आमदार सोपल यांनी सभागृहात केली.



आपला जिल्हा
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# इंगळगीच्या हत्तुरे महिला पतसंस्थेची निवडणूक बिनविरोध

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ जुलै-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील इंगळगी येथील कै. शांताबाई हत्तुरे महिला बिगरशेती सहकारी पतसंस्थेची निवडणूक बिनविरोध झाली असून निवडणूक निर्णय अधिकारी व्ही. ए. शिंदे यांनी बिनविरोध संचालकांची नावे जाहीर केली आहेत. दक्षिण सोलापूर तालुका कार्यक्षेत्र असलेल्या शांताबाई हत्तुरे महिला पतसंस्थेसाठी सहकार निबंधक कार्यालयाकडून निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आले होते. त्यानुसार प्रक्रिया होऊन १६ जुलै रोजी निवडणूक निर्णय अधिकारी शिंदे यांनी बिनविरोध उमेदवारांची नावे जाहीर केली आहेत. ११ संचालकांसाठी १३ जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते. दोघांनी उमेदवार अर्ज मागे घेतल्याने निवडणूक निर्णय अधिकारी शिंदे यांनी निवडणूक बिनविरोध झाल्याचे घोषित केले आहे. निवडणूक बिनविरोध झाल्याने सोलापूर दक्षिणचे लोकप्रिय आमदार सुभाषबापू देशमुख, पतसंस्थेचे प्रवर्तक शिवानंद हत्तुरे, इंद्रजीत माने, व्यवस्थापक राजशेखर बंडगर, राहुल वंजारे यांनी नूतन संचालकांचे अभिनंदन केले आहे.

**बिनविरोध निवडलेले संचालक**

सर्वसाधारण महिला : स्वप्नाली दत्तात्रय माने देशमुख, निर्मला जगदेव दसाडे, अश्विनी शिवानंद हत्तुरे, रूपाली शशिकांत उपासे, अश्विनी भगवान रणखांबे, अनुराधा पंडित करजगे. महिला राखीव : मिनाज मौलाली शेख, सुनिता संजयकुमार वळसंगे. अनुसूचित जाती : पार्वती रखमाजी वंजारे, विशेष मागास प्रवर्ग : सरस्वती औदुसिद्ध कोटे. इतर मागास प्रवर्ग : रोहिणी राहुल राऊत.



## महत्वाचे...

### व्यसनमुक्ती मानसोपचार केंद्रात वृक्षारोपण

**सोलापूर, दि.१७ जुलै-**

एक पेड मां के नाम ही व्यापक वृक्षारोपण मोहीम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून प्रारंभ करण्यात आली असून, ही मोहीम भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय अंतर्गत मेरा युवा भारत या संस्थेमार्फत राबवली जात आहे. या अभियानाअंतर्गत मेरा युवा भारत अंतर्गत संचालित व्यसनमुक्ती मानसोपचार केंद्रात वृक्षारोपण कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमास मेरा युवा भारत सोलापूरचे जिल्हा युवा अधिकारी राहुल डोंगरे, लेखा अधिकारी भानुदास यादव, प्रकल्प संचालक अनिल हिंगे, व व्यसनमुक्ती केंद्राचे सर्व कर्मचारी उपस्थित होते., तसेच शेंडगे इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग कॉलेज, उमरगा (जि. धाराशिव) येथील विद्यार्थी यांचा सक्रिय सहभाग होता. कार्यक्रम अंतर्गत केंद्राच्या परिसरात विविध प्रकारच्या रोपांची लागवड करण्यात आली. प्रत्येक विद्यार्थ्याला एक रोप प्रदान करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. असल्याची माहिती जिल्हा युवा अधिकारी राहुल डोंगरे यांनी दिली.

### अक्कलकोट बंदला आंबेडकरवाद्यांचा पाठिंबा

**अक्कलकोट, दि. १७ जुलै-**

संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्यावर अक्कलकोट येथे कार्यक्रमासाठी आले असता त्यांच्यावर भ्याड हल्ला करण्यात आला. या हल्ल्याच्या निषेधार्थ सकल मराठा समाज व बहुजन समाजाच्या वतीने दि. १८ जुलै रोजी अक्कलकोट बंदची हाक देण्यात आली असून या बंदला अक्कलकोट शहर व तालुक्यातील आंबेडकरवादी चळवळीतील पदाधिकारी, कार्यकर्ते यांचा जाहीर पाठिंबा असल्याची माहिती माजी सरपंच तथा आंबेडकरी चळवळीतील नेते रमेश बनसोडे यांनी दिली. श्री गायकवाड यांच्यावर प्रियदर्शनी सांस्कृतिक भवन च्या आवारात शाही फेकून मारहाण करत भ्याड हल्ला करण्यात आला होता. या घटनेचा आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते व पदाधिकारी यांनी निषेध नोंदविला आहे. त्यांच्या संरक्षणाची जबाबदारी ही कार्यक्रमांच्या आयोजकाची असते. गाफिल राहिल्या मुळेच गायकवाड यांच्यावर भ्याड हल्ला करण्याची सराईत गुन्हेगारांची मजल गेली असे मत बनसोडे यांनी व्यक्त केले. गायकवाड दि. १८ जुलै रोजी पुकारण्यात आलेल्या अक्कलकोट बंदला तालुक्यातील आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांचा जाहीर पाठिंबा असणार आहे, असे बनसोडे यांनी सांगितले.

### महालक्ष्मी थंडी प्रसादाचा लाभ घ्या; उत्सव समिती अध्यक्ष श्रीकांत झिपरे यांचे आवाहन

**अक्कलकोट, दि. १७ जुलै-**



आषाढी थंडी यात्रा निमित्य वीरशैव लिंगायत गवळी समाज व गवळी व्यवसाय समिती व. कुरण महालक्ष्मी यात्रा महोत्सव निमित्त महालक्ष्मी थंडीमहाप्रसादाचे आयोजिन केले आहे यानिमित्य विविध धार्मीक कार्यक्रम महाप्रसाद भोजन याचा लाभ भाविकांनी घ्यावा, असे आवाहन उत्सव समिती अध्यक्ष श्रीकांत झिपरे यांनी केले आहे. कुरण महालक्षी अक्कलकोट शहराच्या बाहेर सोलापुर रस्त्यावर उंच टेकडीवर वसलेल महालक्ष्मी मंदिर जणू अक्कलकोट शहराच संरक्षण रयतेला सुखी समृद्ध संपन्न ठेवण्यासाठी येणार आरिष्ठ पिटाळून लावण्यासाठी दुर्जनांच्या नायनाट करण्यासाठी अखंड महालक्ष्मी माता उभी आहे. याचा उत्सव महालक्ष्मी थंडी दर वर्षी साजरी होते. पहाटे अभिषेक पूजा आरती व दुपारी अकरा वाजता मुरलीधर मंदिर येथून महालक्ष्मी उत्सव मूर्ती मिरवणूक शहरातील प्रमुख मार्गावरून वाजत गाजत आई कुरण महालक्ष्मी मंदिरा पर्यंत काढण्यात येणार आहे. वाद्याचा गजर पोतराजांच आकर्षण अनिष्ठावर आसुड ओढणार आहे. सकाळी दहा ते संध्याकाळी सहा वाजेपर्यंत महाप्रसादाचे आयोजन केलेले आहे. सर्व भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन वीर शिवा लिंगायत गवळी समाज व गवळी व्यवसाय समिती उत्सवाचे अध्यक्ष श्रीकांत झिपरे यांनी केले आहे .



### अवमानकारक विधान करणाऱ्यावर कारवाई करा; पिलीव पत्रकार संघाची मागणी

**पिलीव, दि.१७ जुलै-**

पिलीव (ता.माळशिरस) येथे सोशल मीडियाच्या माध्यमातून दोन ते तीन व्हाट्सअप ग्रुप वर 'पत्रकार हे भाजपचे रखेल आहेत अशा प्रकारचे वादग्रस्त मत पिलीव येथील अशोक बगाडे यांनी केले होते. यामुळे जनमाणसात पत्रकार बांधवांबद्दल जाणीवपूर्वक प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न केला असल्याची तक्रार निवेदनाद्वारे पिलीव पत्रकार संघाच्या वतीने पोलीस निरीक्षक यांना देण्यात आले. यावर पिलीव पत्रकार संघाचे अध्यक्ष शाहरुख मुलाणी, उपाध्यक्ष संजय रोकडे, सचिव गणेश देशमुख, कार्याध्यक्ष संजय पाटील, संघटक सतिश पारसे तसेच सदस्य दामोदर लोखंडे, रघुनाथ देवकर, प्रमोद भैस, अतुल नष्टे, सुजित सातपुते, विश्वजित गोरड यांच्या सह्या आहेत. सदरचे निवेदन हवालदार मरळे व पोलीस नाईक अमीत जाधव यांनी स्विकारले. तसेच ठोस कारवाईचे आश्वासन दिले. सदरच्या घटनेची माळशिरसचे पोलीस निरीक्षक दिंडोरी यांनी तात्काळ दखल घेत पत्रकारांना ठोस कारवाईचे आश्वासन दिले.

# स्थानिक निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागावे

**माजी खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांचे आवाहन**

**भाजपा कार्यकर्ता संवाद मेळाव्याचे आयोजन**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १७ जुलै-**



आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजप कार्यकर्ते यांनी गट तट बाजूला ठेवून एकादीलाने काम करावे, असे आवाहन माजी खासदार रणजिसिंह नाईक-निंबाळकर यांनी केले. ते माळशिरस व माढा तालुक्यात आयोजित भाजपा कार्यकर्ता संवाद मेळाव्यात बोलत होते. यावेळी माजी आ.राम सातपुते व जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत उपस्थित होते.

जिल्ह्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, पालकमंत्री जयकुमार गोरे, माजी खा.रणजीतसिंह निंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत यांनी भाजपची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्यावर भर दिला आहे. त्यानुसार माढा आणि माळशिरस विधानसभा मतदारसंघात बैठका घेण्यात आल्या. यावेळी सचिन शिंदे, आप्पासाहेब देशमुख, बाळासाहेब सरगर, शरद मदने, राहुल पदमन, शशि कल्याणी, सोपानकाका नारनवर, हनुमंत सुळ, बाजीराव काटकर, मंडल अध्यक्ष माळशिरसचे नितीन मोहिते, नातेपुतेचे संजय देशमुख, अकलूजचे सुजयसिंह माने-पाटील, माढा पूर्वचे योगेश बोबडे, माढा पश्चिमचे योगेश पाटील, कुर्डुवाडीचे अविनाश गोरे, करकंबचे हर्षल कदम, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष शिवराज पुकळे, लक्ष्मण धनवडे, माऊली हळणवर, अनंत राऊत, दत्ता जाधव, उमेश पाटील, धनाजी लादे, अमरजितसिंह शेंडे, नंदकुमार मोरे, जयसिंग ढवळे, माया माने, सुनंदा भगत, स्वाती गोरे, आशा घाडगे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> तळागाळातील लोकांमध्ये भाजपाचे ध्येय धोरण रुजविण्यासाठी पदाधिकाऱ्यांनी, कार्यकर्त्यांनी काम करावे. भाजप पक्षामध्ये पक्षसंघटनेला फार महत्त्व आहे. गावपातळीवरील कार्यकर्ता हा भाजपचा महत्त्वाचा दुवा आणि ताकद आहे. पक्षसंघटना बांधणीला सर्वाधिक महत्त्व असल्याने त्या माध्यमातून कार्यकर्त्यांना पदे देऊन काम करण्याची संधी दिली जाते. पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पक्षसंघटना वाढीसाठी आपला वेळ द्यावा.
> **-चेतनसिंह केदार सावंत, जिल्हाध्यक्ष, भाजपा**

## दत्तकला संस्थेला राष्ट्रीय पुरस्कार; केंद्रीय मंत्री गडकरी यांच्या हस्ते सन्मान

**करमाळा दि.१७ जुलै-**



विकसित भारत सन्मान २०२५ या राष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रमांतर्गत, दत्तकला शिक्षण संस्थेला ग्रामीण भागात तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षण क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल 'Excellence in Rural Education Development' हा राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते नवी दिल्ली येथे एका समारंभात प्रदान करण्यात आला. दत्तकला शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. रामदास झोळ यांनी हा पुरस्कार स्वीकारला. पुरस्कारामुळे संस्थेच्या कार्यास राष्ट्रीय स्तरावर मान्यता प्राप्त झाली. यापुढे प्रभावी शैक्षणिक प्रकल्प राबवण्याचा निर्धार अध्यक्ष प्रा. झोळ यांनी व्यक्त केला आहे.

## श्री भगवंत मंदिरात गोपाळकाल्याच्या किर्तनाने आषाढी उत्सवाची सांगता

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १७ जुलै-**

सालाबादप्रमाणे याही वर्षी आषाढी (देवशयनी) एकादशीनिमित्त येथील भगवंत मंदिरात येथील प्रसिद्ध किर्तनकार ह.भ.प. प्रसादबुवा सहस्रबुध्दे यांची नारदीय किर्तनमाला आयोजित करण्यात आली होती. आषाढ शु. दशमी पासून सुरु झालेल्या किर्तनमालेची सांगता पौर्णिमेच्या दिवशी गोपाळकाल्याच्या किर्तनाने झाली. यावेळी संवादिनीवर निलेश मांजरे, तुषार गदगी तबला तर सुहास जोशी यांनी मृदुंगाची साथसंगत केली.

काल्याच्या किर्तनाचे वेळी गोकुळीच्या सुखा अंतःपार नाही लेखा । या जगद्गुरु संत तुकाराम महाराज रचित अभंगाच्या अनुषंगाने अनेक दृष्टांतासह भगवान गोपाळकृष्णाचे चरित्र आणि लीलांच्या रसाळ वर्णनाने भाविक मंत्रमुग्ध झाले. तहसीलदार माळी यांचे हस्ते दहीहंडी फोडून सर्वांना काला वाटप करण्यात आले. यावेळी मंदिराचे पूजारी तसेच देवस्थान पंच कमिटीचे दिलीप बुडूख, प्रमोद कुलकर्णी, मुकुंद कुलकर्णी, नाना सुरवसे आदी मान्यवर उपस्थित होते.







## फॅबटेक मधील सिव्हिल इंजिनिअरिंग विभागात निरोप समारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १७ जुलै-**

फॅब्टेक टेक्निकल कॅम्पस कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च सांगोला येथील सिव्हिल इंजिनिअरिंग विभागात शेवटच्या वर्षातील विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

सिव्हिल इंजिनिअरिंग विभाग प्रमुख प्रा.शिवानंद माळी, डॉ.वागिशा मथडा, प्रा. सोनाली पाटील यांचेहस्ते सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी प्रा.शिवानंद माळी यांनी मनोगतात सिव्हिल इंजिनिअरिंगमध्ये करीअरच्या अनेक संधी आहेत. शासकीय, निमशासकीय तसेच उद्योग क्षेत्रात आपण स्वतःचे करिअर करू शकतात असे मत व्यक्त केले.याप्रसंगी ऐश्वर्या इंगोले, कृष्णा चांडोले, विजया माने, विनायक लिगाडे या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सिव्हिल इंजिनिअरिंग विभागातील प्रा.केंचप्पा दुधाळ, प्रा.विशाल भाकरे, प्रा.संजय जगताप, प्रा.सचिन शेंडगे, प्रा. विक्रम मुळे, प्रा. संदीप निर्मल, प्रा.क्षितिजा देशमुख यांनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक प्रा. क्षितिजा देशमुख यांनी तर सूत्रसंचालन साक्षी कदम हिने केले. आभार प्रा. वागिशा मथडा यांनी मानले.

## शासनाने लंपीग्रस्त जनावरांवर मोफत उपचार करावेत : संजय पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव,१७ जुलै-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव, कुसमोड, झिंजेवस्ती, सुळेवाडी या गावामध्ये सध्या लंपीचा प्रादुर्भाव आहे. पशुपालक शेतकरी खाजगी डॉक्टरांकडुन उपचार करीत आहेत. शासनाने ताबडतोब सदरच्या लंपीग्रस्त जनावरांवर मोफत उपचार करणयाची मागणी कुसमोडचे माजी उपसरपंच संजय पाटील यांनी तालुका पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडे केली आहे.

> **तालुका पशुवैद्यकीय अधिकारी प्रविण शिंदे यांना विचारले असता सध्या तालुक्यात लंपीची साथ आहे पण २०२२ च्या तुलनेत कमी आहे. शासनाकडून यासाठी आवश्यक असणारी औषधे उपलब्ध नाहीत पण आम्ही लंपीग्रस्त पशुपालकांना अत्यल्प दरात सेवा देत असल्याचे त्यांनी यावेळी बोलताना सांगितले.**



शासकीय पशुवैद्यकीय दवाखान्यातही पशुपालकाकडुन पैसे घेतले जात आहेत. याबाबत माजी आमदार रामभाऊ सातपुते यांच्याकडे तक्रार केली आहे. संबंधित खात्याचे मंत्री, जिल्हा पशुवैद्यकीय अधिकारी तसेच तालुका पशुवैद्यकीय अधिकारी यांना बोलुन हा विषय मार्गी लावणयाचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

# संत नामदेव समाधी सोहळ्यास पंजाबातील भाविक येणार पंढरीत

**महेश ढवळे यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१७ जुलै-**

संत शिरोमणी श्री नामदेव महाराज यांची कर्मभूमी असलेल्या श्रीक्षेत्र घुमाण (पंजाब) प्रांतातून असंख्य नामदेव भक्त संत नामदेव महाराज यांच्या ६७५ व्या संजीवन समाधी सोहळ्यासाठी श्री क्षेत्र पंढरपूरला येणार असल्याची माहिती संत शिरोमणी श्री नामदेव क्षत्रिय एकसंघचे राष्ट्रीय अध्यक्ष महेश ढवळे यांनी दिली.

ढवळे म्हणाले, यंदाचे वर्ष हे संत शिरोमणी श्री नामदेव महाराज यांचा ६७५ वा संजीवन समाधी सोहळा, संत ज्ञानेश्वर महाराज यांचा सप्त शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी सोहळा , जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांचा ३७५ वा वैकुंठ गमन सोहळा तर संत सावता माळी महाराज यांचा ७३० वा समाधी सोहळ्याचे वर्ष आहे. या चार संतांनी शांती, समता आणि बंधुता या तत्वाचा वापर करुन महाराष्ट्रासह देशात भागवत धर्माचा प्रचार व प्रसार केला. १२ ते १६ व्या शतकापर्यंत देशात मोगलांचे



राज्य असतानाही व हिंदू धर्म अडचणीत असतानाही सर्व जाती धर्माला बरोबर घेऊन भजन, कीर्तनाच्या माध्यमातून श्री विठ्ठलभक्ती जागवली. वारकरी संप्रदाय वाढविला. जगाच्या कल्याणासाठी पसायदान मागणाऱ्या व आम्हाला अहंकारापासून दूर ठेव म्हणणाऱ्या या संतांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून दि.२३ व २४ जुलै २०२५ रोजी श्री क्षेत्र पंढरपूर येथे देशभरातील विठ्ठल भक्तांचा मेळा आम्ही आयोजित केला आहे. या सोहळ्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित राहून संत पूजा करणार आहेत. या संत सोहळ्याचे निमंत्रण संत शिरोमणी श्री नामदेव महाराज यांची कर्मभूमी असलेल्या श्री क्षेत्र घुमाण येथील श्री नामदेव दरबार कमिटीच्या सदस्यांना देण्यात आले आहे . महाराष्ट्रासह पंजाब, हरियाणा, राजस्थान, गुजरात, उत्तरप्रदेश, दिल्ली, मध्यप्रदेश, कर्नाटक, गोवा, आंध्रप्रदेश येथील नामदेवभक्त सोहळ्यासाठी उपस्थित राहणार आहेत. राष्ट्रीय संघटक मनोज भांडारकर, प्रमोद शिंपी यांनी श्री नामदेव दरबार कमिटीचे प्रधान तरसेम सिंग बावा, संरक्षक अर्जिंदर सिंग बाबा, मुख्य सचिव सुखविंदर सिंग बाबा, उपसचिव मंजिलदर सिंग बाबा, संयुक्त सचिव सरबजीत सिंग बाबा व सदस्य सुधीर सिंग बाबा यांना कार्यक्रमाचे निमंत्रण दिले. अमृतसर येथे शीख धर्माचे तीर्थक्षेत्र असलेले श्री शिरोमणी गुरुद्वारा साहेब अमृतसर येथे गुरुद्वारा कमिटीचे मुख्याधिकारी सतवीर सिंग यांनाही समक्ष भेटून पंढरपूरच्या कार्यक्रमाचे निमंत्रण दिले आहे असे ते म्हणाले.



## बार्शी विभागातील ७० अंगणवाडी सेविकांचा सत्कार

**पोषण ट्रॅकरमध्ये १०० टक्के केली कामगिरी**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १७ जुलै-**

सक्षम अंगणवाडी व पोषण दोन अंतर्गत पोषण ट्रॅकरमध्ये फेस रेकग्निशन सिस्टीमद्वारे १०० टक्के कामकाज पूर्ण करणाऱ्या बार्शी विभागातील ७० अंगणवाडी सेविकांचा पुणे विभागीय उपआयुक्त संजय माने यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अंगणवाडी सेविकांना सन्मानपत्र आणि पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले.

येथील मानूरकर महाराज मठात बालविकास प्रकल्प अधिकारी अमृत सरडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम झाला. यावेळी जिल्हा महिला व बालविकास प्रकल्प अधिकारी दीपक ढेपे, डॉ. विजय खोमणे, बालविकास प्रकल्प अधिकारी सोलापूर शहर पूर्व किरण जाधव, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी रमेश काटकर, पर्यवेक्षिका शबिस्ता जमादार व सुनिता वरुडेकर उपस्थित होते. प्रास्ताविक अमृत सरडे यांनी केले. अंगणवाडी सेविका दीपमाला जाधव यांनी सूत्रसंचालन केले.

विभागीय उपआयुक्त माने यांनी सेविकांनी दाखवलेली निष्ठा आणि मेहनत प्रशंसनीय आहे. अशा प्रकारचे उपक्रम इतर विभागांसाठीही प्रेरणादायी असल्याचे सांगितले. मुख्य सेविका श्रीमती जमादार व वरुडेकर तसेच त्यांच्या सहकाऱ्यांनी काळजीपूर्वक नियोजन केले. अंगणवाडी सेविका शुभांगी शिंदे यांनी आभार मानले. या कार्यक्रमासाठी अंगणवाडीसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.